म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २८८२

निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

९।९९।८९

15 NOV 1981

5 DEC 1981

30 JUN 1982

18 JUL 1982

21 JUL 1982


28 JUL 1982

(क्र. मा. प.)
५०००-४-८०

संदर्भ
निबंध
२८८२
२३२७८
६५८९

आजचा दिवस









# आजचा दिवस

शिरीष पै






**प्रकाशक**

विष्णु गजानन परचुरे
परचुरे प्रकाशन मन्दिर
मेहता भवन
३११,
राजा राममोहन रॉय मार्ग
गिरगाव, मुंबअी ४
आवृत्ती पहिली
१४ नोव्हेंबर १९७४


**मुद्रक**

शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे - ३०
प्रकाशन क्र. ४५९

**मुखपृष्ठ / आतील चित्रे**

वसन्त सरवटे

मूल्य
रु. १२·५०



आजचा दिवस — जो मी जगले....

रोज दिवस उगवतो आणि मावळतो. रोज घडायच्या त्याच गोष्टी घडतात. क्वचित कधी काही विशेष घडतं. कधी रोजचंच ठराविक आयुष्य चाललेलं असतं. तरी पण प्रत्येक दिवस आपापल्या परीनं वैशिष्ट्यपूर्ण असतोच. पण केव्हा? मन आत जागं असेल, सावध असेल तर. जागृत मन रोज असे क्षण शोधीत राहातं की ज्या क्षणांतून जीवनाच्या प्रत्ययकारी जाणिवा स्पर्श करून जात असतात. अशा क्षणांतूनच आयुष्याचा, समग्र अस्तित्वाचा अर्थ उलगडत असतो. असे क्षणच आपल्या जगण्यातला हेतू सांगून जातात. असा प्रत्येक क्षण हळूहळू आयुष्याला आकार देत असतो. पण फक्त आपण जागरूक असायला हवं. प्रत्येक दिवस अशा क्षणांचं गुप्त धन घेऊन उजाडत असतो. एखाद्या घटनेचं निमित्त होतं आणि अकस्मात ते धन आपल्यासमोर उलगडतं. मात्र आजचा दिवस आपल्याला कोणता नवा प्रत्यय देऊन जाणार आहे ह्याबद्दलची उत्सुकता मनात सतत असायला हवी. अशाच जागरुकतेनं टिपलेले हे काही क्षण मी दैनिक ‘मराठा’च्या एका स्तंभामधून काही काळ वाचकांना रोज सादर केले. वाचकांनी आपला अनुकूल अभिप्राय सातत्यानं कळवल्यानं मला लिहायला अधिकाधिक स्फुरण येत गेलं.

त्या सर्व वाचकांचं कृतज्ञतापूर्वक स्मरण करून हे मला लाभलेले काही अमोल क्षण ह्या संग्रहातून एकत्रित स्वरूपात मी माझ्या प्रिय वाचकांसमोर विनम्र भावानं ठेवीत आहे.

शिवशक्ती
वरळी,
मुंबई १८

— **शिरीष पै**

**शिरीष साहित्य**

चैत्रपालवी
हेही दिवस जातील
अखेरचें पान
सुखस्वप्न
मयूरपंख
माझें नाव आराम
आंतला आवाज
मंगळसूत्र
कांचनबहार
संधिप्रकाश
हृदयरंग
खडकचाफा
कस्तुरी
एका पावसाळ्यांत
आईची गाणीं
एकतारी
सोन्याची खाण
हा खेळ सावल्यांचा
कळी एकदां फुलली होती
प्रियजन
पपा
आजचा दिवस

**आगामी**

रत्ना काळे

---



लता मंगेशकर

ह्यांच्या सुंदर गाण्याला—



## एक

‘ आज ’चा दिवस म्हणजे ‘ काल ’चे मूल आणि ‘ उद्या ’चा बाप. ‘ काल ’च्या पोटात ‘ आज ’ आणि ‘ आज ’च्या पोटात ‘ उद्या ’ अखंड सामावलेला आहे. काल मी हसत होते तेव्हा मला कुठे माहीत होते की, आज आपण रडणार आहोत. आणि आज रडण्याच्या भरात हेही विसरून गेले आहे की, कदाचित उद्या अकस्मात् आनंदाचा क्षण येईलही. म्हणून जितके कालचे हसणे खोटे होते तितकेच आजचे रडणेही कदाचित खोटेच असेल. खरा आहे तो फक्त आजचा दिवस, आणि खरा आहे तो फक्त आताचा क्षण— जो मला सांगतो आहे की, हसलीस काय किंवा रडलीस काय, दोन्ही एकच ! कालच्या हास्यात आजचे अश्रू मिसळून ठेव; पण आजच्या अश्रूंतून उद्याचे हास्य वजा करू नकोस.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2662
23408
निबंध
ध५८१
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# दोन

' दुरून डोंगर साजरे ' असं म्हणतात. डोंगर लांबूनच पहावेत. त्यांचं सौंदर्य लांबूनच न्याहाळावं. कारण त्या सौंदर्यानं मोहित होऊन डोंगरांच्या जवळ जाणाऱ्याला प्रत्यक्षात दिसतं ते त्यांचं ओबडधोबड अंग, त्यांच्यावरचे दगडधोंडे, काटेकुटे, त्यांची दुर्गम चढण, आजूबाजूच्या भीषण दऱ्या, त्यांच्या अंगाखांद्यावर सरपटणारे विषारी जिवाणू आणि त्यांच्या गुहांतून लपलेली हिंस्र जनावरं ह्यांची कल्पना दुरून त्यांचं सौंदर्य पहाणाऱ्याला कशी करता येणार ? दुरून पहाणाऱ्याच्या डोळ्यांना डोंगरांचे गहिरे रंग आणि आकार सुख देत असतीलही. पण निधड्या छातीनं ते पायांखाली तुडवीत शिखरापर्यंत जाऊन पोचल्याखेरीज त्यांच्या उंचीची खरी कल्पना कशी करता येईल ? आणि त्यांची उंची गाठण्याच्या नुसत्या कल्पनेनंच ज्याच्या अंगांतलं रक्त सळसळू लागतं त्याला ते पायाखाली तुडवीत असताना काटे बोचले किंवा दगड टोचले तरी तो चढायचा थांबणार आहे थोडाच. डोंगरांचं सौंदर्य दुरून पहाण्यात आनंद असेल, पण ते प्रत्यक्ष चढून बघण्यातच खरा पुरुषार्थ आहे.

## तीन

एका दफनभूमीचं दृश्य माझ्या डोळ्यापुढं तरळतं आहे. तिथली बहुतेक थडगी पडून झडून गेली होती. एखाददुसरं थडगं कुणा इमानदारानं अजून जपून ठेवलं होतं, त्यावर हिरवी चादर अंथरून वर धूपदानांत धूप जळत ठेवला होता. पण बाकीच्या थडग्यांच्या विटा कोसळल्या होत्या आणि वर होती ती नुसती माती. आता उरला होता फक्त एक अपरिहार्य शेवट. पण तिथल्या प्रत्येक उध्वस्त थडग्यामधल्या मातीवर सदाफुलीची रोपटी तरारून उगवली होती आणि प्रत्येक रोपट्यावर पांढरीशुभ्र फुलं दाटून फुलली होती. वाऱ्याच्या मंद मंद लहरींबरोबर डुलत होती. खिदळत होती, एका दिवसाचं जीवन जिवंतपणे जगत होती. थडग्याखाली एके काळच्या फुलांची माती झाली होती. आणि त्याच मातीत पुन्हा फुलं फुलली होती. फुलांचीही माती होते हे त्या फुलांना कुठं ठाऊक होतं. ती आपली फुलत होती, फुलत होती आणि फुलत होती. त्यांना पाहून मीही क्षणभर विसरले, की फुलांचीही माती होते. मला उलटच वाटलं— मातीतूनच फुलं उमलतात !

## चार

प्रत्येक मूल म्हणजे काही अंशी आई आणि काही अंशी बाप. ते आई-सारखं बोलतं, पण बापासारखं हसतं. किंवा बापासारखं बोलतं आणि आईसारखं हसतं. किंवा दोघांसारखंही बोलतं, दोघांसारखंही हसतं. कधी कधी तर तें बेमालूम बापाचेच शब्द वापरतं आणि आईचीच विशेषणं लावतं. आईबापांच्या चष्म्यातून ते जगाकडे पहातं आणि आपली मतं बनवतं. एकदा मी एक म्हातारं झालेलं मूल पाहिलं होतं. त्याचा चेहरा उमलावयाचाच थांबला होता. मी मनात म्हटलं, कुठल्या प्रकारचं जीवन त्याच्या मातापित्यांनी त्याच्या वाट्याला आणलं असेल हे परमेश्वराला ठाऊक. आईबापांची उदंड माया लाभलेल्या मुलाच्या चेहऱ्यावर विलक्षण शांती आणि प्रसन्नता आढळते. पण लाडावलेल्या मुलाच्या चेहऱ्यावर उग्र अहंकार असू शकतो. एक लहान मूल ! पण साऱ्या घराण्याचा इतिहास त्याच्या चेहऱ्यावर एखादा शिक्का मारल्या-प्रमाणे ठासून उमटलेला असतो.

## पाच

गेले तीन-चार दिवस सारखा पाऊस लागला आहे. सहासात वर्षांपूर्वीची गोष्ट. असाच जुलै महिना असावा. पाऊस असाच तुफान पडत होता. ताडदेवच्या रस्त्यावर पाणी साचून तुडुंब तलावच झाला होता. आमची गाडी नेमकी त्या तलावाच्या मध्ये जाऊन बंद पडली. भराभरा गाडीत पाणी शिरूं लागलं. गाडी काही केल्या चालूच होईना. त्या मुसळधार पावसात गाडी ढकलून ती तळ्याबाहेर काढायला हमाल तरी कुठून मिळणार ? तरी धीर करून आमचा ड्रायव्हर खाली उतरला आणि त्या तशा पावसातही रस्त्यावरून जाणाऱ्या माणसांना गाडी ढकलण्यास मदत करण्याबद्दल विनंती करू लागला. पण कोण कशाला थांबतोय ! तेवढ्यात रस्त्यावरल्या मौजा पहात. शीळ घालीत पायाखालचं पाणी तुडवीत बेगुमान भर पावसात तशीच भिजत चाललेली चार कलंदर पोरं तिथं येऊन ठेपली. त्यांच्या अंगावरचे कपडे फाटलेले, मळलेले होते. ती पोरं दरिद्री आणि बेकार होती हे तर उघडच दिसत होतं. कदाचित उपाशीपोटी असावीत. ड्रायव्हरनं त्यांना काही सांगायच्या आधीच त्यांनी गाडी ढकलावयास सुरुवात केली आणि मोठ्याने आरोळ्या ठोकीत हां हां म्हणता गाडी तळ्याच्या बाहेर आणून पोचवली. तेवढ्यात सुदैवानं गाडी सुरूही झाली. त्या पोरांच्या हातावर काही मोबदला ठेवावा म्हणून आम्ही त्यांना हाका मारतो तो ती मागे वळूनही न बघता गात गात केव्हाच पुढं निघून गेली होती.

०

## सहा

पावसाच्या पाण्यानं जमीन चिंब भिजली म्हणजे जमिनीत दडून बसलेली बीजं एकदम फोफावतात. जिथं काल काहीच नव्हतं तिथं आज हिरवं गार रान उभं रहातं. ‘ उगव....उगव....’ प्रत्येक बीजाला आपल्या ऊर्मी धडक मारून सांगतात. पावसाच्या स्पर्शानं प्रत्येक झाडातलं चैतन्य सळसळून जागं होतं आणि हिरव्या हिरव्या पानांच्या रूपानं उदंडपणे प्रगट होतं. पावसाची करुणा सर्व वनस्पतींना सारखीच मिळते. पाऊस भेदभाव जाणीत नाहीं. सगळ्या वृक्षांना आणि सगळ्या वेलींना त्याची माया सारखीच लाभते. इवलंसं क्षुद्र गवत. पण त्यावरही पावसाची माया भरभरून सांडते. हातभर उंचीचं दुबळं रोपटं आणि ऐसपैस वाढलेले महाकाय वृक्ष– पण पावसाचा हात पाठीवरून फिरताच सारखेच तरारून उठतात. साऱ्या सृष्टीला तिचा आत्माच जणू गवसतो. आता मागं राहून चालणार नाही. आता कुणीही थांबून चालणार नाही. आता उमललं पाहिजे. आता वाढलं पाहिजे. आता बहरलं पाहिजे...साऱ्या सृष्टीला जणू अस्तित्वाचा अर्थ गवसतो. एके दिवशी पावसाळा संपेल, वृक्षावर चढलेल्या वेली गळून पडतील, पृथ्वीवरली गवताची रानं सुकून जातील. परंतु बीजं पुन्हा जमिनीत घुसतील. पावसाची पुन्हा वाट पहातील. आणि त्याचा स्पर्श पुन्हा होताच पुन्हा अशीच आणि इतकीच बहरतील. प्रत्येक झाडाचा शेवट हा त्याच्या जीवनाचा आरंभच नाही का ?

## सात

रोज सकाळी आमच्या बागेत एक वृद्ध स्त्री अगदी उजाडताच येते आणि देवपूजेसाठी नाजुक हातांनी फुलं तोडून पदरात भरून नेते. तिच्यामागून एक तिच्याहूनही वृद्ध पेन्शनर येतात आणि तेही बरीचशी फुलं तोडून नेतात. त्यांना धड दिसतही नाही. फुलं तोडताना ते झाडांच्या फांद्या मोडून ठेवतात. खालच्या वाफ्यातली रोपे पायदळी तुडवतात. फुलं तोडतात ती देखील भसाभसा, धसमुसळ्या हातांनी. तोडता तोडताच किती तरी फुलं कुस्करली जात असतील. फुलं तोडताना सुद्धा त्यांच्या मनात प्रेम नाही तो देवाला तरी ती कितीशा शुद्ध भावनेने वाहणार ! पूर्वी मला त्या स्त्रीचा आणि ह्या वृद्ध पेन्शनराचा रागच यायचा. देवाची पूजा करायला चोरीची फुले कशाला ? एकदा तर मी त्या वृद्ध स्त्रीकडे खिडकीतून रागारागानं पाहिलं सुद्धा. त्या वेळी ती माझ्याकडे बघून इतकी गोड हसली की माझा राग जागच्या जागीच विरघळला. तिची नजर जणू मला सांगत होती— देवाचीच सृष्टि ना सारी ! झाडं उगवतात ती त्याच्याच कृपेनं ना ! तुम्ही लावली असली म्हणून काय झालं. त्यानं फुलं साऱ्यासाठीच निर्माण करून ठेवली नाहीत का ? त्या वृद्ध स्त्रीला मी त्या वेळी काही बोलू शकले नाही आणि आता पुढेही काही बोलणार नाही. पण आमच्या बागेत रोज उमलणारी हसरी फुलं मला म्हणतात, "आम्ही रोज फुलून त्याची इथं जिवंत पूजा करतो आणि तुम्ही रोज आमची पूजा मोडून त्याला नुसतं निर्माल्य वाहता. खरं की नाही ?"

# आठ

मत जा....मत जा...गुजरिया पनिया भरन मत जा....ट्रँझिस्टरमधून ठुमरीचे बोल कानी पडत होते. जाऊ नकोस...जाऊ नकोस....सुंदरी. पाण्याला जाऊ नकोस...पण का जाऊ नकोस? तिनं न जाण्याचं कारण काही मला समजलं नाही. कारण मी ट्रँझिस्टर सुरू केला तेव्हा ठुमरी संपत आली होती. तिचा मुखडा तेवढाच गायिका आळवून आळवून गात होती. तिच्या आळवण्यातही वेदना हृदयाला व्याकुळ करीत होती. कानी पडत होतं ते फक्त मत जा...मत जा...जाऊ नकोस जाऊ नकोस...तेवढ्यात गाणंच संपलं. सुंदरीनं पाण्यावर का जायचं नाही? ह्याचं कारण मात्र शेवटपर्यंत समजलं नाही. अजूनपर्यंत कानात रेंगाळताहेत ते फक्त आळवणीचे करुण शब्द. मत जा... पनिया भरन मत जा....पण का? संध्याकाळ फार झाली आहे म्हणून? तिचा प्रियकर आता येणारच नाही म्हणून? कुणास ठाऊक! आणि नाही तरी मी ती ठुमरी सगळी ऐकली असती तरी शेवटी लक्षात राहिलं असतं फक्त 'मत जा' एवढंच! शेवटी आपलं मन पकडून ठेवतं तेवढंच खरं. तेवढंच आपल्याजवळ शिल्लक राहतं. आणि बाकीचा सारा पसारा वाऱ्यावर उडून जातो. ट्रँझिस्टरमध्येच हरवलेल्या ठुमरीसारखा....

ø

## नऊ

एकदा मी बाजारात भाजी आणायला गेले होते. एका भाजीवाल्याकडून मी टोमॅटो विकत घेतले. त्याला मी पंचाहत्तर पैसे द्यायचे होते. तेव्हा पाकिटातून पन्नास पैशांचं एक आणि पंचवीस पैशांचं एक अशी दोन नाणी काढून मी त्याच्या हातात ठेवली आणि पुढं सरकले. पुढच्या भाजीवाल्याकडून पंचवीस पैशांची वांगी घेतली आणि जवळ सुटे पैसे नव्हते म्हणून रुपयाची नोट त्याच्या हातावर ठेवली. तेव्हा त्यानं शेजारच्या टोमॅटोवाल्याकडूनच रुपया सुटा करून घेतला. मग मी त्याला दिलेले पंचाहत्तर पैसे आणि वर स्वतःचे पंचवीस पैसे त्यानं वांगीवाल्याला दिले आणि तेच पंचाहत्तर पैसे वांगीवाल्यानं परत माझ्या हातात ठेवले. माझे पैसे माझ्या समोरच एक वर्तुळ फिरून परत माझ्याच हातात आले. आता हे माझ्या डोळ्यांना समोर दिसलं म्हणून समजलं. पण असे आपले किती तरी पैसे माणसामाणसामध्ये फिरत फिरत पुन्हा आपल्याचकडे येत असतील कुणास ठाऊक ! पैसेच कशाला ! आपले कित्येक शब्द, आपल्या भावभावना, आपल्या कृतीविकृती फिरून अशाच आपल्या अंगावर येऊन आदळतात. आपण एकाला गाढव म्हणतो. तो दुसऱ्याला तेच म्हणतो, दुसरा तिसऱ्याला म्हणतो आणि अंती कुणी तरी एकदा आपल्याला तेच म्हणतो— गाढव !

## दहा

कुणाला तरी टेलिफोन करण्याकरिता म्हणून मी रिसीव्हर उचलला आणि नंबर फिरवला तोच एक गंमतीदार संवाद माझ्या कानावर पडला. माझ्या टेलिफोनमध्यें कुणाचं तरी खाजगी – खरं म्हणजे अत्यंत खाजगी संभाषण पकडलं गेलं होतं. एक बारीक आणि नाजुक आवाज म्हणत होता. 'हॅलो...हॅलो....आहे नं लक्षात.' एका रुंद हुकमी आवाजानं काहीशा नरमाईनं उत्तर दिलं, 'आहे तर. विसरीन कसा.' 'मग येशील ना?' 'नक्की!' 'तीन वाजता. लक्षात आहे ना?' 'अग हो— अगदी बरोबर येतो.' 'अं...जरा लौकरच ये. मी अडीच वाजल्यापासून तिथं उभी राहीन.' 'खरंच?' 'अगदीं खरं....' आणि तितक्यात मीच शरमून फोन खाली ठेवला. तो प्रीति-संवाद एखाद्या रानपक्ष्याची गोडशी शीळ वाऱ्यावरून उधळत यावी तसा माझ्या कानी पडला होता. त्या गोड सुखसंवादात माझं काय काम होतं? मी त्यातून बाजूला हटणंच योग्य होतं. गंमत अशी की, काही दिवसांनी मी फोनवरून बोलत असताना कुणा तरी तिऱ्हाईत इसमानं माझ्या भाषणात तिसऱ्याच फोनवरून तोंड खुपसलं आणि तेव्हापासून मला सारखं वाटायला लागलंय की, आपण बोलतो ते कुणी ना कुणी तरी सारखं ऐकत असतं का? आणि कुणी कुणीही ऐकत नसतं त्या वेळी आपल्या हृदयात आपलेच शब्द ऐकणारे कुणी कान बसले आहेत असाच मला चमत्कारिक भास होतो. कुणाचे हे कान? आपले? की आपल्यापलीकडचे?

## अकरा

इतका रुक्ष आणि मलिन रस्ता मी आयुष्यात कधी पाहिला नव्हता. रस्त्यावरून गाड्यांची गजबज सतत चालू होती. गच्च माल भरलेल्या मोठमोठ्या लॉऱ्या सारख्या धडधडत येत-जात होत्या. त्यांच्या वेगामुळे रस्त्याच्या कडेला सांचलेली धूळ इतस्ततः उसळत होती. रस्त्याच्या कडेला सामानांची प्रचंड कोठारे बांधलेली होती आणि जुनाट, साचवलेल्या मालाचा उग्र दर्प सर्वत्र माजून राहिला होता. रस्त्यावर रहदारी होती ती फक्त थकलेल्या हमालांची, निर्विकार कारकुनांची, कावेबाज दलालांची आणि स्वार्थी व्यापाऱ्यांची. त्या गर्दीतल्या एकाही चेहऱ्यावर आनंद नव्हता की आशा नव्हत्या. सगळे चेहरे होते चिंताग्रस्त, खंगलेले, सुकलेले, दुर्मुखलेले. एका क्रूर व्यवहाराच्या प्रचंड चक्रातून भरडून निघालेले. कुठल्याही चेहऱ्यावर स्मिताची पुसटशी रेषाही नव्हती...आणि ह्याच गडबडगर्दीत रस्त्याच्या कडेला चुकून उगवलेल्या गवताच्या एका हिरव्यागार पात्यावर एक चिमुकले पिवळे फुलपाखरू उगीचच मजेने बागडत होते. गवतावरून मातीवर, मातीवरून हवेत. त्याचे चिमुकले पिवळे पंख लवलवत होते, थरथरत होते. त्याचे अखंड स्पंदन सांगत होते... मी जिवंत आहे ! त्याच्या चैतन्यपूर्ण बागडण्यातून प्रतीत होत होता त्या सबंध गर्दीचा हरवलेला आत्मा.

## बारा

कुणी तरी काल माझ्या टेबलावर सोनटक्क्याची सुगंधी कोमल फुलं आणून ठेवली. देणाऱ्यानं आपलं नाव काही जवळपास लिहून ठेवलं नाही. देणाऱ्याने प्रेमानं फुलं आणून ठेवली आणि देणारा निघून गेला. आज ती फुलं कोमेजली आहेत, पण अजूनही त्यांचा वास दरवळतो आहे. उद्या कदाचित हा वासही उडून जाईल, पण माझ्या मनात मात्र कुणी तरी दिलेल्या ह्या सुवासिक फुलांची सुवासिक आठवण अशीच दरवळत राहील. उद्या कालाच्या प्रवाहात ही आठवणही त्या वासासारखी वाहून जाईल. तरी पण हे माझं हृदय शिल्लक राहील आणि शेवटी एके दिवशी तेही धडधडायचं थांबेल. आणि मग...मग काय शिल्लक राहील? ह्या जगात चिरंजीव असं काय आहे? होय! एक गोष्ट. ते निरपेक्ष, शुद्ध प्रेम ज्याने ही फुलं माझ्या टेबलावर आणून ठेवली. देणाऱ्याच्या हृदयात कुणी तरी केव्हा तरी रुजवलेलं ते शुद्ध प्रेम, देणाऱ्याने घेणाऱ्याच्या हृदयात संक्रमित केलेलं ते शुद्ध प्रेम, घेणाऱ्याच्या हृदयातून काही ना काही निमित्तानं जगण्यासाठी जगात बाहेर पडलेलं ते शुद्ध प्रेम...कुणा ना कुणाच्या तरी शरीरात ते मात्र अखंड श्वासोच्छ्वास करीत राहील. ते शुद्ध, निरपेक्ष प्रेम! तेच केवळ जगेल. एका हृदयाकडून दुसऱ्या हृदयाकडे त्याचा हा प्रवास अखंड चालू राहील.

# तेरा

समुद्रकिनाऱ्यावरून फिरता फिरता, पायाखाली वाळू तुडवता तुडवता पूर्वी कितीदा तरी मी रंगीबेरंगी शंख आणि शिंपले, कवड्या आणि समुद्रातील किड्यांची रिकामी पडलेली घरं गोळा केली होती. विशेषतः शिंपल्या गोळा करताना शिंपल्यांचे दोन पंख चिकटून झालेली पेटी सापडली की, मला भलताच आनंद व्हायचा. शंखशिंपल्यांवरचे विविध रंग आणि नैसर्गिक रीत्याच चितारलेल्या गेलेल्या रेखाकृती पाहिल्या की, मन आश्चर्ययुक्त कौतुकानं भरून यायचं. समुद्र किनाऱ्यावरून गोळा करून आणलेले हे शंख-शिंपले मी कित्येक दिवस घरातल्या फडताळात सुरक्षितपणे ठेवून दिले होते. किती तरी वेळा मी ते शंखशिंपले पुन्हा पुन्हा काढून मोजले असतील. न्याहाळले असतील. त्यांच्या रूपानं सगळा समुद्रच मुठीत पकडून आणल्याचा गर्व मला त्या वेळी झाला होता. काही दिवसांनी माझ्या मनातलं शंखशिंपल्यांचं आकर्षण संपलं आणि मी त्या फेकूनही दिल्या. आजही समुद्रकिनारा तुडवताना हजारो शंख नि शिंपल्या किनाऱ्यावर पडलेल्या दिसतात तेव्हा माझे हात त्या गोळा करायला शिवशिवतात. पण मन सांगतं, खुळी नाही तर, गोळा करशील आणि मग फेकून देशील. शिंपल्यांवरची नजर काढ आणि हा विशाल समुद्र बघ. तो दोन मुठीत पकडता येईल का? त्याने रोजच्या रोज किनाऱ्यावर बेगुमानपणे फेकून दिलेल्या कोट्यवधी शिंपल्यांतल्या उचलून उचलून तू उचलशील किती? तर फक्त मूठभर! आणि शेवटी त्याही फेकून देशील त्या ह्याच्याच किनाऱ्यावर.

## चौदा

एकवीस-बावीस वर्षांचा तो भावनाप्रधान युवक समोर बसला होता आणि त्याच्यासमोर बसून मी त्याची कवितांची वही वाचीत होते. माझा अभिप्राय ऐकण्यास तो उत्सुक झाला होता. त्याचे डोळे माझ्या चेहऱ्यावर उमटणाऱ्या अनुकूल—प्रतिकूल प्रतिक्रियांच्या बारीकसारीक छटाही सावधपणे निरखीत होते. त्या त्याच्या कविता चांगल्या होत्या का ? कुठलीही कविता चांगली किंवा सामान्य ठरविणं मोठं कठीण असतं. कोणत्या ना कोणत्या निमित्तानं कवीच्या भावना दाटून येतात आणि काव्याचं रूप धारण करतात. त्या भावना खऱ्या असतात. पण ती कविता सामान्य असू शकते. शुद्ध भावना, शुद्ध कवितेचा आकार धारण करावयास समर्थ असतेच असे नाही. त्या तरुणाची दुःखे तीव्र होती, त्याने सोसलेल्या वेदना खऱ्या होत्या, त्याचे अंतःकरण शुद्ध होते. एक माणूस म्हणून तो श्रेष्ठ असेलही ! पण आपल्या भावना व्यक्त करावयास त्याने वापरलेले शब्द अगदी सामान्य होते.

त्याच्या कवितांना नीट आकारच आला नव्हता. पण त्याला मात्र वाटत होतं की इतकं दुःख मी सहन केलं— मग माझी कविता वाईट असेल कशी ? म्हणूनच त्याच्या कवितेला सामान्य म्हणून त्याला दुखवणंही माझ्या जिवावर आलं होतं. जाऊ द्या ! जगात खऱ्या भावनांना योग्य शब्द सापडत नाहीत आणि खोट्या भावना मोठ्या शब्दांचे बुरखे पांघरून जगाला सपशेल बनवतात !

## पंधरा

समुद्रकिनाऱ्यावर एक जोडपं एकमेकांना बिलगून भरतीच्या लाटांचा जल्लोष पहात केव्हापासून उभं आहे. या दिवसात लाटांचे आवेगपूर्ण उद्रेक खरोखरी बघण्यासारखे असतात. खूप खूप दुरून लाट उसळत येताना दिसते आणि तितक्या दुरूनही तिच्यात सळसळणारी एक दुर्दम्य ओढ प्रत्ययाला येते. हां हां म्हणता विलक्षण वेगाने ती गर्जना करीत किनाऱ्याकडे चाल करून येते आणि बघता बघता एक प्रचंड आणि उत्तुंग झेप घेऊन वाळूवर ताड्दिशी आदळते.
आदळता आदळता आपला चक्काचूर करून घेते. एकमेकांच्या प्रेमात तुडुंब बुडलेले किती तरी प्रेमिक या दिवसांत लाटांचा खेळ पहायला समुद्रावर येतात. लाटांचं तुफान पहात तासन् तास वाळूवर एका धुंदीत उभे राहातात आणि उसळत आलेल्या लाटा अंगावर झेलीत अथांग भिजून परत जातात. कदाचित ह्या उसळत्या लाटांमध्ये त्यांना आपल्या प्रेमामधल्या दुर्दम्य, असह्य आकर्षणशक्तीचं प्रतिबिंब पहावयास मिळत असावं. लाटांचं राक्षसी तांडव पहात हे प्रेमिक समुद्रकिनाऱ्यावर किती तरी वेळ उभेच असतात. पण जेव्हा पावसाळा संपतो, समुद्राच्या पृष्ठभागावरच्या ह्या अनिर्बंध लाटा शांत होतात आणि समुद्राच्या शांत स्वरूपातून त्याच्या तळाशी चिरंतन वसत असलेल्या खोल गांभीर्याची जाणीव होते त्या वेळी किनाऱ्यावर कुणीच प्रेमिक समुद्रावर लुब्ध होऊन त्याचे निरीक्षण करताना कसे दिसत नाहीत ? त्या वेळी किनाऱ्यावर कुणी कुणी एकाकी माणसंच चिंतनात गढून गेलेली काय ती दिसतात.

## सोळा

माणसे हरवल्याच्या बातम्या आपण वर्तमानपत्रांतून नेहमी वाचतो. कधी कधी अशा बातम्यांसह हरवलेल्या माणसांची छायाचित्रंही दिलेली असतात. कधी कुणाचा तरुण मुलगा किंवा मुलगी, कधी कुणाचे वृद्ध वडील किंवा आई, कुणाचा भाऊ, तर कुणाची बहीण— जगात कुणा ना कुणाचं कुणी ना कुणी तरी सारखं हरवतच असतं. बहुधा हरवल्याच्या बातम्यांसह व्याकुळ झालेल्या नातेवाईकांच्या 'परत ये काळजीत आहोत' अशा आर्त विनवण्याही प्रसिद्ध होत असतात. ही हरवलेली माणसं कशी आणि का हरवतात याची कारणं मात्र आपल्याला असल्या बातम्यांमधून समजत नाहीत. ही माणसं घरातून स्वेच्छेनं पळून जातात, की कुणी त्यांना पळवून नेलेलं असतं. की ती चुकून हरवलेली असतात हेही कळत नाही. आणि पुढं ही सापडतात की नाही याचाही पत्ता लागत नाही. हरवल्याच्या बातम्या देणारी माणसं पुन्हा सापडल्याच्या बातम्या का देत नाहीत हे एक नवलच नाही का ? हरवल्याचा केवढा गवगवा केला जातो. गेलेलं मिळेपर्यंत माणसं केवढी धडपड करतात. पण एकदा हवं ते मिळाल्यावर पुढं हीच माणसं त्याला खरंच आस्थेनं जपतात का ? कुणास ठाऊक.

## सतरा

रोज माझ्या टेबलावर असंख्य पत्रं येऊन पडतात. पत्रलेखक या शहरातले असतात तसेच बाहेरगावचेही असतात. पत्रलेखकांत पुरुष असतात आणि स्त्रियाही असतात, वृद्ध असतात आणि बालकेही असतात. काही पत्रे प्रेमभावनेने, आपुलकीने ओथंबलेली असतात. काहींमध्ये उपदेश असतो. ( काहींमध्ये शिव्याही असतात ! ) ही शेकडो माणसे पत्रांतून माझ्याशी ओळखीचे एक सूक्ष्म नाते जोडतात. ही पत्रे वाचल्यानंतर फक्त एक आश्चर्याची आणि कृतार्थतेची भावना मनात उरते— इतकी माणसे आपण त्यांना ओळखत नसूनही आपल्याला ओळखतात ! ( शिव्या देणारी माणसेसुद्धा आपल्याला मनातून ओळखूनच असतात ! ) माणसामाणसामधली असली नाती मोठी गंमतीची असतात. ह्या ओळखी न होताच घडतात. घडल्या तरी टिकवल्या पाहिजेत असं बंधन नसतं. एखादा क्षण असतो. एखादे निमित्त असते, माणसामाणसांना तेवढ्यापुरते का होईना. एकत्र आणते. असल्या ओळखी होतात आणि पुढे संपतातही. पण संपत नाही ती त्या क्षणातून जागी झालेली सहानुभूतीची भावना. या अफाट जगात जागोजागी विखुरलेली मनं अशा क्षणांनीच एकरूप होतात. त्यासाठी माणसांनी समोरासमोर आलं पाहिजे, एकमेकांचा सहवास घेतला पाहिजे, एकमेकांची पारख केलीच पाहिजे असं थोडंच आहे ! माणसांच्या एकरूपतेसाठी आवश्यक आहे तो फक्त सहानुभूतीचा एक क्षण. मन शुद्ध करणारा फक्त एक शुद्ध क्षण.

## अठरा

एका वसंत ऋतूत आमच्या बागेत भल्या सकाळी एक चिमुकले चुणचुणीत पाखरू अवतीर्ण झाले. हे चित्रविचित्र पाखरू कुणा दूर देशाहून आले होते कुणास कळे ! मुठीत मावेल इतके छोटे, तपकिरी रंगाचे, पिंगट डोळ्यांचे, पिवळ्या पायांचे, पांढुरक्या पोटाचे, चिमण्याशा चोचीचे. बागेमध्ये उतरल्यापासून एक क्षणसुद्धा ते स्वस्थ असे बसले नाही. ह्या झुडपावरून त्या झुडपावर आणि ह्या वेलीवरून त्या वेलीवर ते आनंदाने उड्या मारीत सारखे बागडत होते. मंजुळ आवाजात एकसारखे ते शीळ घुमवीत होते. त्याचे चिमुकले पंख उत्कंठेने सारखे थरथरत होते. त्याच्या इवल्याशा देहात सारा वसंत ऋतू मुसमुसत होता. फुलांफुलांमधला मध शोधीत, पिवळ्या कोवळ्या उन्हामध्ये ते आमच्या बागेत खेळ खेळ खेळले आणि मग हो हो म्हणता जसे आले तसेच भुर्र्रदिशी कुठे तरी उडूनही गेले. त्याचे नाव नि गाव न सांगता ते नजरेच्या पार पार निघून गेले पुन्हा न येण्यासाठी. अशाच...अशाच येत असतात सुंदर कविकल्पना. अनाकलनीय अज्ञातातून पंख पसरून येणाऱ्या आणि कवीच्या हृदयात हुरहूर लावणारा संचार करून पुन्हा त्याच अज्ञातात लुप्त होणाऱ्या. पाखरं येतात नि जातात. उरतात त्या त्यांच्या बागेमधल्या मुक्कामाच्या रम्य आठवणी. कल्पनाही येतात नि जातात. उरतात त्या कधी न पुसल्या जाणाऱ्या कविता. केल्यावरंही कविहृदयात धगधगणाऱ्या....जिवंत !

## एकोणीस

पुष्कळ दिवसांपूर्वी पुण्यामधल्या एका मोठ्या सार्वजनिक बागेमधून फिरत असताना एकाएकी एका चमत्कारिक, ओसाड वृक्षाला पाहून माझे पाय थबकले. सारी बाग कशी हिरवीगार, समृद्ध होती. दाट पालवीचे छत्र धारण केलेले मोठमोठाले वृक्ष, रंगीबेरंगी पानांची झाडेझुडपे, विविध रंगांचे फुलांचे ताटवे, कमळांनी भरलेली तळी, पायाशी उगवलेली हिरवीगार गवतांची शेते— साऱ्या बागेवर नजर फिरताच नजरेला एक प्रकारची सुखद शांती लाभत होती. पण हा एकच वृक्ष असा होता की, ज्याच्यावर एकही पान नव्हते आणि ज्याचे खोड सुकून पार वाळून गेले होते. त्याच्या निष्पर्ण फांद्यांवर तीन गिधाडे आपले अजस्त्र पंख अंगाभोवती गुंडाळून गप्प बसली होती. आणि त्या शुष्क वृक्षाभोवती एक प्रकारचा उग्र पण कुबट दर्प दरवळत होता. आकुंचित नजरेने जगातल्या घाणीचा विचार करीत ती गिधाडे ह्या वठलेल्या वृक्षावर कसली तरी कारस्थाने रचीत बसली होती आणि भोवतालच्या हिरव्यागार बागेशी सारे संबंध सोडून हा वृक्ष निर्विकार उभा होता. कधीच का फुटणार नव्हते ह्याला एखादेही हिरवे पान ? कधीच.... कधीच सळसळणार नव्हता का ह्याच्या फांद्याफांद्यांतून त्याला जिवंत करणारा जीवनरस ? एवढी सुंदर बाग, पण ह्या एका उध्वस्त वृक्षाचा कलंक तिलाही लागलाच होता !

## वीस

उन्हाळा आला की, बागेमधली झाडे दुपारच्या उन्हाच्या माऱ्याने कशी कोमेजून जातात. काही काही नाजुक रोपटी तर सबंध दिवसाचा ताप साहून संध्याकाळची तर माना मोडून आडवीच पडतात. सकाळी झारीमधून पुरेसे पाणी अंगावर सांडल्यावरच ती पुन्हा ताठ होतात. उन्हामुळे सुकलेल्या बागेकडे पहात मी मनात म्हणते, आता लौकरच पावसाळा येऊ दे. म्हणजे माझी बाग हिरवीगार दिसेल. थोड्याच दिवसांत पावसाळा येतो. पावसाच्या स्पर्शाने सारी बाग तरारून जाते. बागेत सर्वत्र हिरवी टवटवी पसरून ती प्रफुल्लित दिसू लागते. पण जेव्हा पावसाचाही मारा जोरात अखंड चालू राहतो, जेव्हा समुद्रावरून सोसाट्याचा वारा रात्रंदिवस सों सों वहात राहतो. तेव्हा बागेतील झाडांची पाने तुटून पडतात, फांद्या मोडून जातात आणि ऐन पावसाळ्यात बागेमधली रोपटी आग लागून जळल्यासारखी रखरखीत दिसू लागतात. ‘ कधी संपणार हा पाऊस ? ’ माझ्या मनात नवी चिंता जागी होते. थोड्याच दिवसांनी ऋतू बदलतो. कालांतराने हिवाळा सुरू होतो. प्रथम प्रथम सौम्यशा थंडीमुळे पुनश्च हिरवीगार झालेली बाग परत वाळल्यासारखी दिसू लागते. काही काही झाडांचे तर अक्षरशः खराटे होतात. नवी पालवी दिसेनाशी होते आणि मग कंटाळा येऊन एके दिवशी मी म्हणते, आता हा उन्हाळा येणार तरी कधी ?

## एकवीस

आज काय गंमत झाली, आमची गाडी एका रस्त्यावरून वेगानं वळसा घेऊन दुसऱ्या रस्त्यावर आली, तोच गाडीच्या नेमकी पुढे एक चार वर्षांची शेंबडी पोर उभी! ड्रायव्हरनं खर्र्‌कन ब्रेक दाबला म्हणून बरं, नाही तर तिथल्या तिथं...छे:! ती कल्पनासुद्धा सहन करवत नाही. गाडी जागच्या जागी थांबली आणि ती चिमुरडी पोर आपल्याच नादात हसत हसत, गाडीकडे टवकारून पहात गाडीपुढून निघूनही गेली. एवढीशी चिचुंद्रीसारखी पोरगी. कुठल्या तरी झोपडीत रहाणारी असावी. पिंगट केसांच्या जटा खांद्यावर लोंबताहेत, अंगावरचा मळका फ्रॉक ठिकठिकाणी फाटला आहे आणि इवल्याशा मुठीत कुणी तरी दया येऊन दिलेलं बिस्किट घट्ट धरून ठेवलंय. ते चघळत चघळत हा टीचभर जीव मोठ्या मजेत रस्ता ओलांडून चाललाय. दोन काळेभोर, चमकदार, वाटोळे डोळे भोवतालच्या जगाकडे कुतूहलाने बघताहेत. नुसत्याच कुतूहलानेही नव्हे. ऐटबाजपणे. शिवाय निरागसपणेही. एवढासा देह. त्यातले एवढेसे काळीज. पण गाड्या धडधडत अंगावर येताहेत तरीसुद्धा ते बेटे धडधडत नाही! मरणाची ओझरती कल्पनाही त्याला आजवर चाटून गेली नसावी. म्हणूनच एका चिमण्या बालिकेने मृत्यूलाही आज सहज जिंकून दाखवले आहे.

## बावीस

जोराचा पाऊस आला म्हणून घाईघानं धावत जाऊन पुढच्या खोलीचं दारं नि खिडक्या भराभरा घट्ट लावून घेतल्या. खोलीत एकदम अंधार दाटून आला. सारं वातावरणच सर्द आणि कुबट झालं. आता खोलीत सुरक्षित वाटत होतं. पण तितकंच खिन्न आणि उदासही. तेवढ्यात बाहेरचा पाऊस थांबला. मत्त जोराने कोसळणाऱ्या जलधारांचा ध्वनी बंद झाला. लगेच जाऊन खोलीचा पुढचा दरवाजा उघडला. एकदम थंडगार वाऱ्याचा झोत घोंघावतच खोलीत घुसला. अंगावरची वस्त्रे फडफडली. टेबलावरचे कागद फरफटत दूर उडून गेले. दरवाजाबाहेर पाऊल टाकताच बाहेरची चिंब भिजलेली हिरवीगार सृष्टी दृष्टीला पडली. पावसाळी मेघांनी ओथंबून खाली लवलेलं सावळं आकाश कसं जवळ आल्यासारखं भासलं. पलीकडच्या समुद्रावरच्या उसळत्या लाटांचे तुषार जणू इथपर्यंत अंगावर उधळत आले. बंद खोलीतून बाहेरच्या थंड मोकळ्या हवेत येताच उदासीनतेने आकसलेलं सारं शरीरच कसं मोकळं, हलकं झालं. पावसाच्या भीतीनं स्वतःला कोंडून घेतल्यामुळे, विचित्र विचारांच्या आहारी गेलेल्या मनाला बाहेरची खुली हवा सापडताच त्यावरची सगळी दडपणं दूर झाली आणि बाहेरच्या सौंदर्याशी ते तत्काळ एकरूप झालं. आणि... आणि लक्षात आलं की, ह्या भिंती माणसाचं केवढं नुकसान करतात!

## तेवीस

ह्या क्षणी मी इथं एकटी बसले आहे. पण बसल्या जागी असंख्य आवाजांचे आघात माझ्या कानावर आदळत आहेत. दूर रस्त्यावर मोटारी वेगाने धडधडत धावत चालल्या आहेत. मध्येच एखाद्या गाडीचा खर्र्‌कन ब्रेक लागतो आणि ती किंचाळून जागच्या जागी उभी राहते. मध्येच काही गाड्यांचे हॉर्न गरजत राहतात. दूर कुठे तरी झाडावर कावळे उगीचच तावातावाने कलकलाट करताहेत. अचानक एखादं कुत्रं वेड लागल्यासारखं भुंकत सुटतं. कुणाच्या तरी घरात आकाशवाणीवर हिंदी चित्रपटातली गाणी वाजताहेत. बाहेर मैदानावर मुले क्रिकेट खेळताना एकसारख्या 'आऊट', 'नॉटाऊट'च्या घोषणा करताहेत. फूटपाथवर केव्हाचा एक म्हातारा कण्हत, खोकत बसलाय. माझ्या खोलीतलं घड्याळ अखंड टिकटिकतंय. ह्या सगळ्या गजबजाटात माझं हृदय धडधडताना मला केव्हापासून ऐकू येतंय्. मनामधल्या उलटसुलट विचारांना आवाज नसून तेसुद्धा ऐकू येताहेत. कानात घुमतो आहे तो एकमेकांशी कसलाच संबंध नसलेल्या निरनिराळ्या अर्थशून्य आवाजांचा एक न संपणारा कोलाहल आणि हा सर्व कोलाहल शांत शांत करणारे एका दिव्य संगीताचे विश्वही माझ्यातच आहे— पण मी मात्र ह्या क्षणी त्याच्यात नाही!

## चोवीस

जाहिरातदारांना जाहिरातीमध्ये बोधवाक्य घुसडण्याचा एक नादच असतो. मग खरोखरी त्या बोधवाक्याचा जाहिरातीशी संबंध असो वा नसो. परवा एका चित्रपटाच्या जाहिरातीवर एक बोधवाक्य लिहिलेलं मी वाचलं. 'सत्य हे प्रीतीहून महान आहे.' 'भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ आहे.' ह्या बोधवाक्याचं हे वाक्य धाकटं भावंड असावं. कशापेक्षा काय मोठं हे शेवटी ठरवायचं कुणी, आणि भावना आणि कर्तव्य ह्यातही फरक करायचा कसा? कर्तव्य ही सुद्धा एक भावनाच नाही का? कर्तव्याविषयी भावना नसेल तर ते पार पाडण्यासाठी लागणारी चैतन्यशक्ती माणसाला लाभणार कशी आणि कुठून? तसंच हे दुसरं वाक्य. 'सत्य प्रीतीहून महान आहे!' म्हणजे नक्की काय? प्रेम हेच एक महान सत्य आहे किंबहुना प्रेम हे एक श्रेष्ठ जीवनसत्य आहे! प्रेमशून्य जीवन हे सगळ्यात मोठं ढोंग आहे. ज्याच्या हृदयात प्रेम नाही त्याची दृष्टी सदैव कलुषितच राहणार. मनुष्याच्या हृदयातले प्रेम वाढता वाढता त्याच्यात मावेनासं होतं. तेव्हाच त्याला सारं जग आपलंसं वाटू लागतं. आपपर भाव उरत नाही. दृष्टी स्वच्छ होते. आणि अशाच निर्मळ दृष्टीला सत्य दिसू शकते. एका प्रेमभावनेमुळे हे सारं घडतं आणि तरी देखील जाहिरातदार म्हणतात—
सत्य हे प्रीतीहून महान आहे

## पंचवीस

आज माझ्या आयुष्यात काय घडणार आहे हे मला कुठे माहीत असतं! म्हणजे आजचा साधारण कार्यक्रम मला माहीत असतो. किती वाजता कुठं जाणार आहे, काय काम करणार आहे, कधी परत येणार आहे, काय खाणार आहे हे मला ठाऊक असतं. साधारणपणे मला कोण कोण भेटणार ह्याचीही मला कल्पना असते. तरी पण प्रत्येक दिवशी असं काही तरी अनपेक्षित घडतंच की जे चिंतिलेलं नसतं— फार काय, जे इच्छिलेलंही नसतं. आज मला कुणाची पत्रं येणार आहेत, किंवा कुणाचे फोन येणार आहेत, हे मला कुठं माहीत असतं. आज मी काय ऐकणार आहे, किंवा आज माझे विचार कुठं भरकटणार आहेत ह्याची मला कल्पना तरी असते का ? फार काय, आज मी काय लिहिणार आहे हेही कधी कधी माझ्या डोक्यात नसतं. पुढ्यात कागद घेतले, हातात लेखणी घेतली की आपोआप सुचतं, स्फुरतं, आपोआप आरंभ नी आपोआप शेवटही होतो. केव्हा तरी, कुठं तरी, काही तरी पाहिलेलं असतं, डोक्यात घोळवलेलं असतं त्यालाच एकाएकी आकार येतो. अकल्पितामागेही कधी कधी पूर्वनियोजित असतंच. फक्त ते आपल्याला माहीत नसतं इतकंच. पण ते अनपेक्षितपणे घडण्यातच मौज आहे. त्यामुळेच आयुष्यात जिवंतपणा आहे, नाविन्य आहे, आपल्या कर्तृत्वशक्तीला त्यातूनच आव्हान आहे. मात्र आपली पूर्वतयारी हवी. मुख्य म्हणजे बुद्धी सावध हवी.

## सव्वीस

एकदा एका मासिकात मी एक लघुकथा वाचली. वाचायला सुरुवात केली नाही तोच त्या लघुकथेनं माझ्या मनाची बळकट पकड घेतली. वाऱ्याबरोबर पीस तरंगत दूर निघून जावं तशी मी लघुकथेसह तरळत एका स्वप्निल वातावरणात निघून गेले. आणि मग ज्या कुणी लेखकानं इतकी सुंदर कथा लिहिली होती त्याच्या लेखनशैलीचा मला इतका मोह पडला की मी तत्काळ त्याला एक प्रशस्तिपर सुंदरसं पत्रही लिहून टाकलं. कथा वाचून झाल्यावर एका क्षणाचीही वाट न पाहता ते पत्र लिहिलं. त्यानंतर त्या लेखकाकडून पत्राची पोच येईल म्हणून मी दुसऱ्या दिवसापासून सारखी वाट पहात राहिले. मला वाटत होतं की, तो देखील माझ्या पत्रामुळे तितकाच हुरळून जाऊन माझ्या तत्परतेचं आणि आपुलकीच्या भावनेचं कौतुक करील म्हणून. पण बरेच दिवस झाले. त्याच्याकडून उत्तर आलंच नाही. शेवटी मी कंटाळून वाट पहायचंच सोडून दिलं. नाही म्हटलं तरी माझं मन दुखावलं गेलंच. पुढे तब्बल सहा महिन्यांनी त्या लेखकानं पत्र पाठवलं. पण तेही अगदी त्रोटक, मोजकं आणि ‘ फारसं काही वाटलं नाही ’ असं सुचवणारं. क्षणभर मी संतापले. माझा तो संताप खूप दिवस टिकला. पण आता मात्र माझं मलाच हसू येतं. एखाद्याची प्रशंसा आपण मोकळ्या मनानं केली म्हणून त्याच्याकडून लगेच कृतज्ञतेची पावती मागावयाचा आपल्याला काय हक्क ? प्रशंसा म्हणजे निरपेक्ष दानच नव्हे काय ? ते फक्त द्यायचं असतं अन् देणाऱ्यानं फक्त देण्याचा आनंद लुटायचा असतो.

## सत्तावीस

रात्रीच्या प्रहरी घराघरांतले दिवे विझतात, माणसं गाढ झोपी जातात आणि सगळे ध्वनी शांत होतात. परंतु रस्ते मात्र कधीच शांत होत नाहीत. रस्त्यावरचे दिवे रात्रभर जळत असतात. मोटारींची तुरळक का होईना, पण भर रात्री सुद्धा रहदारी चालूच असते. आणि अचानक कुणी तरी भटके रात्रीच्या ऐन शांततेतही रस्त्यावरून बडबडत, आरडाओरड करीत जातात. अशा वेळी गल्लीतली कुत्री मात्र खडा पहारा करीत असतात. दुरून कुणाचं नुसतं पाऊल जरी वाजलं तरी एखादं कुत्रं चेव आल्यासारखं पिसाळून भुंकत उठतं. त्याच्या मागोमाग दुसरं कुत्रं त्याची री ओढीत दूर कुठं तरी भुंकायला लागतं. कधी कधी तर चार-पाच कुत्री एकदमच भुंकायला लागतात. आपल्या सरहद्दीत प्रवेश करू पहाणाऱ्या आगंतुकाला ती जणू त्वेषानं जाब विचारीत असतात, “ का ? का आलास आमची हद्द ओलांडून ? कुणाच्या परवानगीनं ? कुठल्या हेतूनं ? चल जा. तुझा काय संबंध. चल, दूर नीघ इथून. जा म्हणतो ना.” कोण शिकवतं कुत्र्यांना इतकं जागरूक राहून पहारा करायला ? कुणी दिलेली असते ही भूमीच्या संरक्षणाची जबाबदारी त्यांच्या मस्तकावर ? कुणी, कुणी नाही. ह्या कर्तव्यदक्षतेबद्दल त्यांना काय मोबदला मिळतो ? काही नाही. ह्या जागरूकतेबद्दल त्यांच्या वाट्याला कौतुकाचा एक शब्द तरी येतो का ? नाही– नाही. तरी सुद्धा कुत्री रात्रभर जागतात, पहारा करतात, आपले रस्ते सांभाळतात. कधी कधीही न कंटाळता. त्यांचे पगार केव्हापासून थकले आहेत. कोण देणार ते ? पण त्यांना तरी कुठं हवेत ते ?

## अठ्ठावीस

तिला मी प्रथम पाहिली त्या वेळी तिची माझ्यावर विशेष छाप पडली नाही. म्हणजे ती दिसायला चांगली होती. पण मला एकदम लक्ष खिळवून ठेवण्याजोगे तिच्यात काही आढळलं नाही. ती माझ्या समोरच्या खुर्चीवर येऊन बसली आणि मग आमच्या गप्पा सुरू झाल्या. थोड्याच वेळात गप्पा रंगात आल्या. आमच्यामधली अपरिचिततेची दरी एकदम ओळखीच्या सुरांनी भरून निघाली. मन मोकळं करून ती बोलू लागली. मोठ्यानं हसू लागली. तिच्या मनातले भाव आणि भावना ह्यांचा एक मनोरम विलास तिच्या चेहऱ्यावर मूर्तिमंत प्रगट होऊ लागला. गवयाचा सूर लागतो तसा तिचा बोलण्यातला आवाज लागला. क्षणात तिच्या चेहऱ्यावर उगवत्या सकाळची सुंदर सोनेरी प्रसन्न उन्हं चमकून जायची. तर क्षणात काळे-भोर मेघ तिच्या डोळ्यांत भरून यायचे. क्षणात वाऱ्यावर थरथरणाऱ्या फुलपाखरांच्या पंखांसारख्या तिच्या नाकपुड्या कंपित व्हायच्या, तर क्षणात तिचे ओठ संध्याकाळी झाडावरची पानं मिटून जातात तसे गप्प व्हायचे. जगामधल्या सौंदर्याच्या दर्शनासाठी ती कमालीची उत्कंठित झालेली होती. बस ! केवळ सौंदर्य ! मग ते सृष्टीतलं असो, शब्दातलं असो, सुरातलं असो की मानवी मनामधलं असो.
सौंदर्याच्या भेटीसाठी ती व्याकुळली होती. ह्या मुलीचं समग्र जीवन म्हणजे सौंदर्याची अखंड पूजाच होती. सौंदर्याविषयी बोलताना ती मला इतकी सुंदर भासली की, इतकी सुंदर स्त्री मी यापूर्वी कधीच पाहिली नाही असं मला क्षणभर वाटलं. सौंदर्याची ओढ मनात निर्माण होताच सुंदर नसणारं माणूस सुद्धा किती सुंदर दिसू शकतं !

## एकोणतीस

त्या चित्राकडे पाहून माझा मित्र म्हणाला, "ह्या चित्राचा काय अर्थ?" मी म्हणाले, "तुला काय वाटतं? तूच सांग." क्षणभर विचार करून तो म्हणाला, "खूप खूप काळोख आहे आणि त्यातून एकदम प्रकाशाचा झोत आला आहे असं वाटतं. ही प्रकाशपुष्पं आहेत, खरं ना?" मी म्हणाले, "मला निराळंच वाटतं. मला कोष फाडून उमलणाऱ्या कळ्यांचा आनंद ह्या चित्रात दिसतो. उमलण्याची सबंध क्रिया मला ह्या चित्रातून प्रतीत होते. आपल्या दोघांचेही अर्थ जवळ जवळ सारखेच आहेत. कारण कोषाच्या पोटात काळोखच असतो. पण जर तू ह्या चित्राच्या जवळ येऊन पाहशील तर तुझ्या लक्षात येईल की, चित्रकारानं फक्त पुष्पपात्रातली दोन लांब देठाची फुलं रंगवली आहेत. पण गडद तपकिरी रंगाच्या पार्श्वभूमीवर ही उजळ केशरी फुलं त्यानं अशा काही खुबीनं रंगवली आहेत की केवळ विरोधी रंगाच्या अपूर्व संगतीमुळेच ह्या चित्राला एक अकारण गूढता प्राप्त झाली आहे." दुसऱ्या दिवशी आणखीनच गंमत झाली. माझ्या मित्राची एक मैत्रीण ते चित्र पाहून म्हणाली, "असं वाटतं की ज्वालामुखीचा स्फोट होऊन वरच्या ज्वाळांचं पुष्प तयार झालंय्." चित्रकारानं गडद पार्श्वभूमीवर नुसती दोन फुलं रंगवली, पण चित्र बघणाऱ्या निरनिराळ्या व्यक्तींना निरनिराळे अर्थ प्रतीत झाले. जातिवंत कलेची हीच तर मौज आहे. तिच्या निर्मितीला एखादं लहानसं कारणही पुरतं पण तिच्यातून उलगडणारं अर्थाचं विश्व हे अनंत आणि अमर्याद असू शकतं. वेगवेगळे रसिक वेगवेगळा आनंद तिच्यातून लुटू शकतात.

## तीस

कधी कधी काही केल्या वेळ जाता जात नाही. शरीरही काम करून कंटाळलेलं असतं. त्यामुळे काही करण्याची इच्छा पण होत नाही. अशा वेळी वाटतं की, नुसत्या गप्पा कराव्यात. ज्यात कसलाही अर्थ नाही असं काही तरी बोलत रहावं. पावसाच्या दिवशी रस्त्याच्या कडेला वाहणाऱ्या बारक्याशा ओहोळात लहान मुलं कागदी नावा करून सोडतात आणि त्या जशा प्रवाह वाहील तशा भरकटत जातात तसंच बोलणं निरुद्देश वहात रहावं असं वाटतं. पण नेमकं अशा वेळी कुणीच येत नाही. साध्या गप्पागोष्टी करायलाही कधी कधी कुणी जवळपास नसतं. आपण एकटेच चरफडत बसतो. मन भरकटतच असतं. नाना विचारांच्या जाळ्यात मन गुंतून पडलेलंच असतं. ते काही गप्प होत नाही. आपल्याला हवे असतात कशाचाही ताण न देणारे काही मनमोकळे, निर्भर क्षण. पण मन मात्र आपल्यावरची ओझी काही केल्या दूर भिरकावून द्यायला तयार नसतं. यातून आपली सुटका करू शकेल असं कुणी— अगदी कुणीही येत नाही. मोठे विचित्र असतात हे क्षण. सगळ्या आयुष्याचंच प्रतीक होऊन बसतात असे काही क्षण. या ना त्या कारणाने सदैव टाळत आणलेला एक अजस्र कंटाळा शेवटी समोर येऊन उभा राहतोच. अशा वेळी आठवावा कुणी तरी केव्हा तरी दिलेला— लहानसा का होईना— आनंद. अशा वेळी मन फक्त कृतज्ञ करावं. फार फार हलकं वाटतं मन कृतज्ञ झाल्यावर. शरीर आनंदाच्या दिशेनं अलगद तरंगत जातं...

# एकतीस

एकदा आमच्या इमारतीत एक चोर शिरला. तो जिन्यामधल्या दिव्याचे बल्ब चोरीत होता. कुणी तरी त्याला ते चोरताना पाहिलं. त्यानं आरडाओरडा केला. चोर पळून जाऊ लागला. आसपासची माणसं धावत आली. चोराला पकडण्यात आलं. मग इमारतीसमोरच्या पटांगणात एका खांबाला त्याला सर्वांनी बांधून टाकलं. भराभर आणखी माणसं गोळा झाली. चोराभोवती ' ही ' गर्दी जमली. चोर होता एक सतरा-अठरा वर्षांचा हडकुळा पोरगा. तो भेदरला होता. मान खाली घालून उभा होता. पण भोवतालच्या गर्दीला मात्र चेव आला होता. चोरी करतो म्हणजे काय ! माणसं त्वेषानं नुसती पेटली होती. कुणी त्याच्या गालफडात हाणीत होतं. कुणी त्याच्या नाकावर गुद्दा मारीत होतं. कुणी त्याच्या पोटात ठोसा देत होतं, कुणी त्याचा दरिद्री सदरा ओढून फाडीत होतं. चोर ' नको, नको ' म्हणत होता. सगळा रक्तबंबाळ झाला होता. माणसं कायदा हातात घेऊन त्याला आपल्या मनाला येईल ती शिक्षा करीत होती. गुन्हा तर घडला होता. पण त्याला मिळत असलेली ही शिक्षा भयानक होती. तिचं अमानुष स्वरूप, बघवत नव्हतं. जणू माणसं कुणावर तरी उगवायचा सूड त्या चोरावर उगवत होती. मनात दडपून ठेवलेला क्रोध, द्वेष, तिरस्कार, त्वेष सारा त्या अठरा वर्षांच्या एका पोरावर एकाच वेळी ओकीत होती. ही कसली न्यायबुद्धी ! खरा न्याय नेहमी विवेकातून निर्माण होतो. ही तर होती भ्याड माणसांची दुष्ट इच्छापूर्ती.

## बत्तीस

खरं म्हणजे त्या दिवशी मी खिन्न नव्हते आणि निराशही नव्हते. भोवताली तीन-चार स्नेही मंडळी गप्पा करीत बसली होती. परंतु त्या क्षणी विशेष बोलण्याजोगं माझ्याजवळ काही नसल्यामुळे मी गप्प बसले होते. आता मला काही बोलायचं नव्हतं हे कबूल. पण निदान इतर माणसं काय बोलतात हे तरी मी लक्षपूर्वक ऐकावयास हवं होतं. पण त्या क्षणी का कुणास ठाऊक, गप्पांमध्ये माझं लक्षच लागेना. कान एक ऐकत होते. मन दुसराच विचार करीत होतं. मी गप्प होते, पण खिन्न नव्हते, उदास नव्हते. कुणी तरी आस्थेवाईकपणे मला पुनः पुन्हा विचारू लागलं, “ आज तुम्ही गप्प गप्प का ? तुम्हांला काही तरी होतंय खास. ” “ नाही हो, ” मी हसून म्हटलं. “ नाही कसं ? मग तुम्ही बोलत का नाही ? ” त्यांनी पुन्हा विचारलं. कमाल आहे की नाही ! मी बोलत नव्हते. म्हणजे मी दुःखी होते असं मुळीच नव्हे. ‘ मौनं सर्वार्थ साधनं ’ असलं तरी असला अर्थ त्यातून निघावा म्हणजे कमालच ! पुनः पुन्हा मला तोच तोच प्रश्न विचारला जाऊ लागला आणि मग इतरांच्या संभाषणात उगीचच खंड पडला. त्यांच्या गप्पांचा आनंद एकदम भंगून गेला. मला शरमल्यासारखं वाटलं. खरंच, आपली लहानशीच लहर असते. पण अकारण दुसऱ्यांचा केवढा हिरमोड होतो. ( बोलायचं नव्हतं तर नव्हतं— ऐकायला तुझं काय जात होतं ? )

## तेहेतीस

खूप खूप उंचावर जाऊन उभं रहावं. एखाद्या टेकडीवर किंवा हवं तर मोकळ्या माळरानावर आणि मान वर करून वरच्या विशाल आकाशाकडे बघावं. ढगांचे चुकार तांडे मजेत भटकत असतात. वारा वाहील तसे वहात चाललेले असतात. वाहता वाहता त्यांचे आकार हा हा म्हणता बदलतात. एखाद्या प्रचंड आकाराचे बघता बघता लहान लहान खंड होतात आणि इतस्ततः विखुरले जातात. कधी कधी वरच्या वर हे तुकडे विरूनही जातात. हे ढग कुठून येतात आणि कुठे जातात ह्याचा पत्ता लागत नाही. सारखे आपले वहातच असतात. वहाताना किती, कसे बदलतात हेही सांगता येत नाही. सारखं वहाणं, सारखं बदलणं हेच ढगांचं जीवन. वारा देईल ती दिशा. बाष्प घेईल तो आकार. ढगांच्या हातात काय आहे ! ना आपला आरंभ, ना अंत. आपल्या डोळ्यांना दिसतात ते त्यांचे रमणीय आकार आणि मनोरम रंग. पण त्याच्या अस्तित्वामधली अनिच्छा आणि अनिश्चितता आपल्या कुठं लक्षात येते. ढग आपले येतात न् जातात. वर आकाशात थोडे थबकतात. तेवढ्या वेळात त्यांचं सौंदर्य आपण न्याहाळून घ्यावं. दूर जाऊ लागले की, त्या दिशेला बघूच नये. कशाला ? उगीच डोळे मात्र निष्कारण पाण्यानं भरायचे !

८

## चौतीस

एकदा कुणी तरी माझ्याजवळ एका सिद्ध पुरुषाच्या आत्मचरित्राची अतोनात स्तुती केली. मला ते पुस्तक वाचण्याची जबरदस्त इच्छा झाली, पण ते पुस्तक काही केल्या माझ्या हाती येईना. ज्यांनी त्या पुस्तकाची स्तुती केली होती त्यांनी ते कुणाला तरी वाचावयास दिलं होतं. ती त्यांची प्रत एका वाचकाकडून दुसऱ्या वाचकाकडे फिरत राहिली. बरं, इतर कुठंही ते पुस्तक मिळण्यासारखं नव्हतं. कारण लिहिणाऱ्यानं त्याच्या मोजक्याच प्रती काढल्या होत्या. त्या लेखकाला हिमालयात आलेल्या काही दिव्य अनुभूतींचं वर्णन त्यानं त्या पुस्तकात केलं होतं म्हणे. मीं तर त्या पुस्तकाच्या ओढीनं पुरतीच वेडावले होते. त्याचा एकसारखा ध्यास मला लागून राहिला होता. केव्हा एकदा तो दिव्य अनुभूतींचा ठेवा माझ्या हाती पडतो असं मला झालं होतं. निरनिराळ्या कल्पना आणि निरनिराळी काल्पनिक दृश्ये माझ्या मनःचक्षूंसमोर तरळत होती. शेवटी एकदाचं ते पुस्तक माझ्या हाती आलं— तर नेमकं ते वाचावयास सवडच सापडेना. चक्रवाक-चक्रवाकींचा वियोग एका कमळाच्या पानानं करावा तसा परिस्थितीनं माझा त्या पुस्तकाशी दुरावा घडवला होता. एखाद्या मीलनोत्सुक प्रेयसीसारखी मी तडफडत होते की, कधी एकदा मी ते वाचीन. आणि शेवटी एकदा मी ते वाचलं! अगदी दारंखिडक्या बंद करून. पूर्ण एकान्त साधून, समग्र चित्त एकवटून. पण माझी घोर निराशा झाली. पुस्तक अगदी सामान्य होतं! आणि मग असं वाटलं— ह्या मीलनापेक्षा ती ओढच बरी होती! तेव्हाच मी हे पुस्तक खऱ्या अर्थानं वाचून काढलं होतं.

## पस्तीस

बाईंच्या घरासमोर एक बाग आहे. त्या बागेत एक बदामाचं सुंदरसं झाड आहे. रुंद हिरव्या पानांनी ते नेहमी डंवरलेलं असतं. जणू दिव्य हिरवा प्रकाशच त्याच्या पानांतून सदैव फाकलेला असतो. मग अधूनमधून त्याची पानं पिकू लागतात. कशी लालबुंद होतात. गळून पडण्यापूर्वीही एक आगळीच तांबुस झळाळी पानांवर चमकू लागते. म्हातारपणातही काही काही वृद्ध माणसं अधिकच तेजस्वी दिसावीत ना तशी. विशेषतः हिवाळ्यात तर बदामाच्या झाडावर तांबड्या पानांचंच प्राचुर्य अधिक आढळतं. अशाच एका हिवाळ्यातल्या संध्याकाळी मी बाईंच्या घरी गप्पा करायला गेले होते. बाईंचं आता बरंच वय झालं आहे. त्यामुळे त्यांना मी भेटले की प्रथम त्या तब्बेतीची कुरकुरच बराच वेळ करतात. कुठे गुडघेच दुखताहेत, तर कुठं भूकच लागत नाही. एक न् दोन. त्या संध्याकाळीही बाईंनी बराच वेळ कुरकुर केली आणि मग एकाएकी त्या समोरच्या बदामाच्या झाडाकडे बघून आनंदानं म्हणाल्या, “ अग, बदामाच्या झाडाला किती सुंदर पालवी आली आहे–पाहिलीस का ? ” आणि मग अनिमिष नेत्रांनी लाल पानांचं सौंदर्य त्या न्याहाळीत राहिल्या. ती पानं गळून पडायला झाली आहेत असं त्यांना सांगायचं धैर्य मला झालं नाही. कारण त्या एकाच बदामाच्या झाडावर मला दिसत होता विनाश, पण त्यांना दिसत होता विकास.

## छत्तीस

सहज मनात आलं म्हणून एके दिवशी एका चिमुकल्या कुंडीत एक चिमुकलं पानफुटीचं हिरवंगार रोप लावून माझ्या टेबलावर मी ती कुंडी ठेवली. काम करता करता मध्येच त्या रोपाकडे नजर जाई आणि मनाला खूप प्रसन्नता वाटे. तेवढ्यात एक चित्रकार मित्र उपस्थित झाले. आल्याबरोबर प्रथमतः त्यांची नजर त्या कुंडीकडे गेली. आणि ते उत्स्फूर्तपणे जवळ जवळ ओरडलेच, " वाहव्वा ! आयडिया !! सर्व ऑफिसर लोकांनी आपापल्या कामाच्या टेबलावरच अशा बागा लावल्या तर त्यांच्या कामातली सारी रुक्षताच नष्ट होऊन जाईल." त्या रोपावर आणि त्या कुंडीवर बराच वेळ चर्चा करून माझे चित्रकार मित्र एका धुंदीतच निघून गेले. ते गेले नाहीत तोच समोर उभे राहिले एक ख्यातनाम टीकाकार. माझ्या टेबलावरच्या रोपाकडे पाहून त्यांनी कुठूनशी दुर्गंधी आल्याप्रमाणे नाक मुरडले आणि ते म्हणाले, " केवढा अन्याय ह्या रोपावरती ! खुल्या रानात मोकळ्या हवेवर मुक्तपणे वाढू न देता त्याला खुरटून टाकण्याची ही कुठली अघोरी कल्पना !" मी मुकाट्याने ती कुंडी उचलली आणि गड्याबरोबर बागेत पाठवून दिली. टीकाकार खुशीत निघून गेले. आणि ते बिचारे रोप बाहेरच्या कडक उन्हाचा मारा सहन न होऊन त्याच दिवशी कोमेजून खाली पडले.

## सदतीस

सगळा दिवस जबाबदाऱ्या संभाळण्यात उलटून जातो. एकामागे एक महत्त्वाच्या कामांची रांग लागून राहिलेली असते. ती वाटेला लावता लावता नाकी नऊ येतात. सबंध दिवस मी ( माझ्या मते ) अत्यंत समजुतदारपणानं आणि शहाणपणानं वागलेली असते. पण शहाणं असण्याचाच एक चमत्कारिक ताण पडत राहतो आणि मग संध्याकाळी मन विलक्षण थकून जातं. संध्याकाळच्या लांब लांब सावल्या पडू लागतात. बाहेर काळोख गोळा होऊ लागतो. फार उदास वाटतं. सगळं जीवन सक्तीनं घडवल्यासारखं वाटू लागतं. आणि एकाएकी जाईजुईचा सुगंधी गजरा कुणी तरी अंगावर अलगद फेकून द्यावा तसा त्या दोघींच्या मनमोकळ्या खिदळण्याचा आवाज कानावर पडतो. वाऱ्याच्या झुळकीसारख्या त्या दोघी माझ्या खोलीत तरळत येतात. वातावरण एकदम बदलतं. आम्ही तिघी मिळून चिक्कार बडबड करतो. खूपशी निरर्थक. कदाचित आज बोललेलं उद्या लक्षातही राहणार नाही असंच खूपसं बोलतो. खूप खूप हसतो. खूपसा आनंद लुटून लुटून घेतो. मग त्या दोघी जायला उठतात. माझं मन एव्हाना विलक्षण हलकं, विलक्षण मोकळं झालेलं असतं. त्या क्षणी एकदम वाटतं जगातला सगळा शहाणपणा हा एक मूर्खपणा आहे आणि जगातल्या सगळ्या मूर्खपणात बराच शहाणपणा आहे.

## अडतीस

सगळ्या सृष्टीकडे मी पाहते तेव्हा मला प्रत्येक झाडात एक स्वतंत्र व्यक्तित्व आढळत. काही काही झाडं जणू आकाशाला भेटावयाच्या इच्छेनं कशी उंचच उंच वाढलेली असतात, तर काहींचा विस्तार इहलोकीचंच सौंदर्य शोधीत आडवाच्या आडवा पसरलेला असतो. काही झाडांच्या फांद्या जणू कुणाला तरी आलिंगन देण्याच्या अनिवार ओढीनं उभारल्यासारख्या वाढलेल्या असतात. तर काही झाडं कोणत्या तरी अनामिक लज्जेनं आपल्याभोवती आपली पानं गुंडाळून तिथल्या तिथंच आकसलेली राहतात. कुणाची फुलं, कुणाचे काटे, कुणाची पानं. कुणाचा गंध. काही ना काही वैशिष्ट्य प्रत्येक झाडापाशी आहे. काही झाडं महापुरुषासारखी प्रचंड वाढतात आणि वर्षानुवर्षं टिकतात. तर काही झाडं फक्त हंगामापुरती उगवतात आणि झडून जातात. काही काही माणसांना उपजतच एखादं व्यंग असावं तशी काही झाडं उगवता उगवताच किडतात आणि कोसळतात. काही माणसं आयुष्यात काहीच न करता कालाच्या ओघात नष्ट होऊन जावीत तशी बरीचशी झाडं न फुलता-फळताच सुकून जातात. माणसाच्या सारखं झाडांचही एक जग आहे. त्यातल्या प्रत्येक झाडाला एक स्वतंत्र रूप आहे. रंग आहे, आकार आहे आणि स्वतःचं असं एक अस्तित्व आहे, पण ह्या दोन जगांत फरक एवढाच की, झाडांच्या जगात एक असीम मौन आहे, परम शांती आहे, अपरंपार सहनशीलता आहे. आणि माणसांच्या जगात...

## एकुणचाळीस

आमची गाडी रस्त्यावरून वेगानं चालली होती. तेवढ्यात पाठीमागून एक गाडी जोराजोरानं हॉर्न वाजवीत 'वाट करून द्या 'चा इषारा देत अगदी नजीक येऊन धडकली. आमच्या ड्रायव्हरनं गाडीचा वेग मंदावून त्या गाडीला पुढं वाट करून दिली. एखादा अग्निबाण रों रों करीत हवेला कापत वातावरणातून निघून जावा तशी ती गाडी शर्यत जिंकण्याच्या उन्मादानं जणू पेटून आवेशातच आम्हांला बाजूला टाकून पुढं चालती झाली. ती आमच्या गाडीच्या इतक्या जवळून गेली की क्षणभर वाटलं की हे केसभर अंतर तुटलं असतं तर आमच्या गाडीचा चक्काचूर झाला असता. त्या गाडीतल्या माणसांनी तर आमच्यावर मिळवलेल्या विजयाच्या आनंदानं आम्हाला खिजवीत जोराचा गिल्लाही केला. पण पुढं जाण्याच्या नशेनं त्या गाडीचा ड्रायव्हर इतका आंधळा झाला होता की रस्त्यावर आराम करीत पडलेलं एक सुंदरसं वासरू त्याला दिसलंच नाही आणि त्या वासराला गाडीची जोराने धडक देऊन आपल्या गाडीसकट चांगलं दहा पावलं त्यानं ते वासरू फरपटवत दूर नेलं. वासरू जागच्या जागी ठार झालं. ड्रायव्हरला गाडी थांबवावीच लागली. भर गर्दीत आमच्या गाडीच्या पुढं आपली गाडी नेण्याची एक क्षुद्र ईर्षा. पण तिच्यापायी एक निष्पाप जिवाची निर्घृण हत्या घडली. स्पर्धा... स्पर्धा.... सगळी क्षणिक विजयासाठी— त्यासाठी वाटेत ती हत्या— आणि मग शेवटी हातात काय ? मिळालेल्या गतीचा शेवट.

## चाळीस

काही ना काही वैशिष्ट्यामुळे आपण समाजात ओळखलं जावं असं सर्वसाधारणपणे बहुतेकांना वाटत असतं. त्यासाठी माणसांची केवढी धडपड चाललेली असते. कुणी तरी असण्यापेक्षा कुणी तरी म्हणून ओळखलं जाण्यात एक और नशा असते. नटाला नट म्हणून, लेखकाला लेखक म्हणून, खेळाडूला खेळाडू म्हणून समाजानं ओळखावं ह्यासाठी कधी कधी तो वागण्याच्या काही विशिष्ट पद्धती समाजात वावरताना अवलंबितो. कलावंत आपल्या लहरीपणाचं प्रदर्शन करील, कवी आपल्या काव्यात्मकतेचं, तर खेळाडू आपल्या तरतरीतपणाचं. पण हेही खरंच, की कुणी तरी दिसण्याकरिता आधी माणसाला कुणी तरी असावं लागतंच. आणि कुणी तरी असण्यासाठी दीर्घ साधनेची आवश्यकता आहे. प्रसंगी नामशेष होण्याची पाळी आली तरी नाउमेद न होता श्रम करीत राहण्याची जरूरी आहे. पण आपलं नाव कुठं नाही, आपल्याला कुणी ओळखत नाही, हे कुणी तरी असणाऱ्यांना बहुधा सहन होत नाही. म्हणूनच जे कुणीहि नसतात त्यांच्या गर्दीत आपण एकदा तरी मिसळावं, गर्दीच्या खांद्याला खांदा भिडवून आपलं अस्तित्व माणसांच्या प्रचंड प्रवाहात मिसळून टाकून एकदा तरी जगावं. अगदी कुणी कुणी नसण्यात. कोट्यवधी सामान्यांमधील एक असण्यास समस्त ‘ मी ’ पणाचा, अहंबुद्धीचा, त्यातून निर्माण होणाऱ्या मनस्तापाचा एक सहज विलय आहे.

## एकेचाळीस

आमची गाडी कंपौंडच्या बाहेर पडते ना पडते तोच गाडीसमोरून सुमारे बारा ते पंधरा वर्षे वयाच्या मुलांचा घोळका गोंगाट करीत वेगानं धावत गेला. बाजूनं एक गाडी आपल्या अंगावर चाल करून येत आहे याची दादही त्या घोळक्याला नव्हती. त्या पोरांना एकच नशा चढली होती आणि ती म्हणजे आकाशात उंच तरंगत असलेला एक ऐटबाज पतंग काटण्याची. त्यांच्या म्होरक्याच्या हातात त्यांच्या कंपूनेच वर उडवलेल्या पतंगाची दोरी होती. हवा मोठी सुंदर होती. आकाश स्वच्छ होतं. वारं मस्त वहात होतं. त्यांचा पतंग डौलानं झोके घेत घेत उंच चालला होता. आणि तो उडवीत उडवीत पोरांचा घोळका एका मस्तीत धुंदपणे पोहत होता. सगळ्यांचे डोळे आकाशातल्या पतंगाकडे लागले होते. त्या पतंगाच्या कलाकलानं पोरं रस्त्यावरून सुसाट धावत होती. साऱ्या शरीरभर पतंगाच्या उड्डाणाची नशा खेळत होती. त्यांच्या मनात फक्त पतंगाचा विचार होता. इतकी सगळी पोरं एका कागदाच्या रंगीत तुकड्यापायी पागल झाली होती. बेफाम धावत सुटली होती. त्यांना रस्त्यावरची गर्दी आणि गाड्या मुळी दिसतच नव्हत्या. पतंग... पतंग... पतंग.... बस, त्यांचं आयुष्य ह्या क्षणी पतंगमय झालं होतं. आज अनेक मनं एका लहानशा पतंगामागं बेहोष होऊन धावत आहेत. पण त्यांच्याकडे पाहून आनंद वाटण्याऐवजी भयच मात्र वाटतंय्. कशावरून हेच हात उद्या लुटालूट आणि जाळपोळ करताना असेच बेहोष होणार नाहीत? गर्दीचं काय, वेड लागायचाच काय तो अवकाश.

## बेचाळीस

‘ फूटपाथ ’ नावाचा एक चित्रपट काही वर्षांपूर्वी निघाला होता. अर्थात तो चित्रपट मी काही पाहिला नाही. परंतु मुंबईमध्ये फूटपाथ नावाचा एक चित्रपट मला रोजच्या रोज दिसतो. फूटपाथ हा मुंबईमधल्या निराधारांचा आधार आहे. फूटपाथवरच्या तुटपुंज्या सावलीत ज्यांना जगात कुणी कुणी नाही अशी बेकार आणि दरिद्री माणसं उभं आयुष्य कंठतात. तिथंच ती जगतात, खातात, पितात, झोपतात, विचार करतात आणि... आणि प्रेमही करतात. कधी कधी एखादं कुटुंबच्या कुटुंब एखाद्या इमारतीचा आडोसा घेऊन फूटपाथवर मुक्काम थाटून राहतं आणि उत्पादनाचं काम पुढं चालू ठेवतं. फूटपाथवरच त्यांची रोजची शेगडी पेटत असते. फेरीवाले आणि टोपलीवाले फूटपाथच्या आश्रयानेच आपला धंदा थाटतात. जुगारी फूटपाथवर खडूनं आकडे मांडून जुगार खेळतात. शरीराची आणि हृदयाची तहान भागवायला हातभट्टीच्या अड्ड्यावर गेलेले तळमळणारे जीव कधी कधी दिवसाढवळ्या फूटपाथवर आडवे तिडवे बेहोष पडून असतात. त्यांच्याकडे पाहिल्यावर कधी कधी भय वाटतं की ही माणसं नक्की जिवंत आहेत ना? की हे बेवारशी मुडदे आहेत? मुंबईमधल्या फूटपाथवर काय वाटेल ते घडते. आणि ‘ फूटपाथ ’ नावाचा हा एक जिवंत चित्रपट पहात मुंबईमधली लाखो माणसं फूटपाथवरून अखंड धावत असतात. धडपडत असतात. कधी कधी भर रस्त्यावरून वेगानं जाणारी एखादी गाडी वाट चुकून नेमकी फूटपाथवरच चढते आणि ‘ फूटपाथा ’शी कसलाही संबंध नसलेल्या एखाद्या पादचाऱ्याला शेवटी फूटपाथवरच कायमची आडवी पाडते.

# त्रेचाळीस

माझ्या मित्रानं मला बऱ्याच दिवसांत फोन केला नाही म्हणून मी मनातून त्याच्यावर बरीच नाराज होते. त्यातून त्याच्या इतर मैत्रिणींना तो फोन करतो आणि मला मात्र करीत नाही हे समजून आल्यावर तर मी नाही म्हटलं तरी जरा दुखावलेच गेले होते. आमची गट्टी जमली त्या काळात त्याचा फोन आला नाही असा दिवस जात नसे. मी सुद्धा त्याला फोन केल्याशिवाय कामाला सुरुवात करीत नसे. कुणी तरी प्रेमानं आपली चौकशी करण्यात आणि आपण कुणाची तरी करण्यात केवढा आनंद असतो. सगळ्या कामात एक प्रकारचं चैतन्य आपोआप सळसळू लागतं. पण अलीकडे त्यानं फोन न केल्यानं काही तरी हरवल्यासारखं वाटत होतं. मीही हट्टानं त्याला फोन करीनाशी झाले होते. (तू विचारीत नाहीस तर मी तरी काय म्हणून विचारायचं?) बऱ्याच दिवसांनी तो एकदा भेटला तेव्हा माझ्या लक्षात आलं की, तो देखील माझ्यावर रागावलाय. कारण मी त्याला फोन करीत नाही म्हणून. आम्ही एकमेकांना वाटेल तसे बोललो—एकमेकांवर सगळ्या रागाचं उट्टं काढून घेतलं. अर्थात् हा रुसवा सगळा लटकाच होता. मग दोघांचीही चूक दोघांना समजली. दोघंही दोघांवर उगीचच रागावलो होतो. मित्र खुशीत निघून गेला. पण त्याचा फोन बंद झाला तो झालाच. नंतर तो मला पुन्हा एकदा भेटला ह्या वेळी फोनचा विषयच निघाला नाही. पण भेटल्यावर आनंद व्हायचा तो झालाच. मी मनात म्हटलं, प्रत्यक्ष भेटल्यावर आनंद होणं हेच मैत्रीचं एक लक्षण. यत्किंचित फोनसाठी का ही मैत्री थांबेल? खरं म्हणजे एकमेकांना भेटलो नाही, बघितलं नाही तरी ही मैत्री नाहीच संपायची.

## चव्वेचाळीस

रस्त्यामधून एखादा आंधळा हातातल्या काठीनं पुढची वाट चाचपडत जाताना दिसला की नकळत डोळे पाण्यानं भरून येतात. कुणाचे तरी आंधळे डोळे पाहिले की आपले डोळे नकळत अश्रूंनी आंधळे होतात. रस्त्यावरच्या गर्दीतून असा एखादा असहाय्य आंधळा वाट शोधीत एकटाच चाललेला पाहिला की छातीत धस्स होतं. वाटतं, हा आपणहूनच एखाद्या भरधांव गाडीपुढे बळी तर जाणार नाही ना ? गाड्या तुफान वेगानं रस्त्यावरून चाललेल्या असतात. माणसं आपापल्या कामासाठी आपापल्या चिंतेत चूर होऊन धावत असतात आणि एखादा आंधळा त्याच गजबजटात एकटा काठी आपटीत चाललेला असतो. तेवढ्यात कुणी तरी मन द्रवून चटकन् पुढे होतं. आंधळ्याला मदतीचा हात देतं. रस्त्यावरच्या गोंधळातून त्याला पार करून पलीकडे नेऊन पोहोचवतं. मी सुटकेचा निःश्वास सोडते. आंधळ्याच्या चेहऱ्यावर कृतज्ञतेच्या छटा उमटून येतात. तो आनंदानं हसतो, पण ते त्याचं डोळ्यावाचूनचं हसणं सुद्धा केविलवाणं वाटतं. मन काही क्षण विषण्ण होऊन जातं. एक असं दुःख दिसलेलं असतं की ज्यावर उपाय नसतो, पण आपल्याला खिन्नता वाटते तशी त्या आंधळ्यालाही वाटत असेल का ? कदाचित् आपण त्याच्या आंधळेपणाचा जितका विचार करतो तितका तो स्वतः करीतही नसेल. किंबहुना आपण फक्त त्याच्या अंधत्वाबद्दल नुसता विचारच करतो. बाकी आपण काय करतो ? आणि तो...तो एका कधीही न संपणाऱ्या भयाण अंधारात शोधत असतो लहानशा समाधानाचा एखादाही किरण— जो आपल्याला डोळे असून दिसत नाही— सापडत नाही.

## पंचेचाळीस

आज आकाश कसं स्वच्छ आहे. निळंभोर ! पावसाचे ढग मावळले आहेत. पावसाळा संपला ! पावसाळा संपला ह्या जाणिवेनं कसंसंच वाटतंय. घशात आवंढा दाटून येतोय. ज्याची वर्षभर वाट पाहिली तो पावसाळा आला केव्हा— गेला केव्हा. वैशाख संपत आला होता तेव्हा ढग दाटून येण्याची सारखी वाट पाहिली होती. कधी एकदा काळे काळे ढग आकाशात भरून येतील, कधी एकदा त्याचा कडाडकन् स्फोट होईल, कधी एकदा विजा लखाखतील, कधी वारं भिन्नाट वाहत सुटेल आणि कधी एकदा मुसळधार वर्षाव होईल म्हणून पर्युत्सुक होऊन दिवसचे दिवस वाट पाहण्यात घालवले होते आणि मग पावसाळा आला तेव्हा ती एक रोजचीच बाब होऊन बसली होती. रोजच ढग भरून येत होते. रोजच पाऊस पडत होता. पण आता पावसाळा संपला आहे आणि आता मात्र मनाला हुरहूर वाटते आहे की अरे, ज्याची वाट आतुरतेनं पाहिली तो पावसाळा आला कधी नि गेला कधी ? काय केलं आपण ? पावसासाठी थोडं सुद्धा थांबलो नाही, त्याचं सौंदर्य न्याहाळलं नाही, त्याची मौज लुटली नाही.
आता पहा वाट. तब्बल आठ महिने. हां हां म्हणता चकवून गेलेला पावसाळा आता आठ महिने येणार नाही. आता बसा त्याच्या आठवणी काढून झुरत. होता तेव्हा दिसला नाही— नाही तेव्हा तोच दिसत राहील !

## सेहेचाळीस

खूप वर्षांपूर्वीची एक आठवण आहे. दुपारची वेळ. मी घरात अभ्यास करीत बसले आहे. बाहेर ऊन मी म्हणतंय्. ऐन उन्हाळ्याचे दिवस आहेत. डोक्यावर नजीक आलेल्या परीक्षेचा ताण आहे. एवढ्यात पेटीचे आर्त सूर वातावरणाला कापीत येतात. अभ्यासातलं लक्ष उडतं. मी खिडकीपाशी धावते. भिकाऱ्याची दोन पोरं पेटीवर एक फिल्मी गीत वाजवीत रस्त्यावरून भीक मागत फिरताहेत. दुपारचं जळजळीत ऊन आणि पेटीचा तो दुःखी सूर. हृदय वेदनेनं कंपित होतं. विलक्षण उदासीनता अंतःकरणात पसरत जाते. भिकाऱ्याची पोरं पेटी वाजवून तार स्वरात गाताहेत. फारसं सुरेल नसलेलं गाणं नुसतं दुःखच ओकतंय, किती तरी दिवस होऊन गेले त्या गोष्टीला. पण तेव्हापासून कुठल्याही बाजाच्या पेटीकडे नजर गेली की मला फक्त त्या भिकाऱ्याचं दुःखच आठवतं. कधी तरी अचानक रस्त्यावर पेटीचे सूर वाजत असलेले ऐकू येतात. बहुधा भर दुपारीच ते ऐकू येतात. बहुधा एखादा भिकारी कर्कश आवाजात, पण तरीही हृदयाला भिडणारं एखादं फिल्मी गीत गात चाललेला असतो. तो जशी पेटी वाजवतो तशी ती कुणाकुणाला वाजवता येत नाही. त्याच्या पेटीतून जे सूर निघतात ते कुणालाच काढता येत नाहीत. कारण भिकाऱ्याची बाजाची पेटी नुसती वाजत नाही. ती मुसमुसून रडत असते, गदगदून हुंदके देत असते आणि तिच्यातून बाहेर पडतात ते सूर नव्हेत, तर भिकाऱ्याच्या डोळ्यांतले अश्रू.

## सत्तेचाळीस

कधी कधी टेलिफोनवरून बोलणाऱ्याचं नाव नीट ऐकू येत नाही आणि मग मोठी गंमत उडते. केळकरच्या ऐवजी केरकर ऐकू येतं. केळकर परिचित असतात. केरकर नसतात. केळकर नेहमीच्या सलगीनं बोलू लागतात. पण माझा गैरसमज झालेला असतो. हे कधीसुद्धा न पहिलेले केरकर एकदम लाडात येऊन का बोलताहेत हेच कळत नाही. मी रागात विचारते, "कोठचे केरकर आपण?" "अहो, मी केळकर." पलीकडून हसून उत्तर येतं. गैरसमज दूर होतो आणि मी शरमून जाते. त्याच्या उलट कधी कधी दोशीच्या ऐवजी जोशी ऐकू येतं आणि मीच एकदम सलगीनं विचारते, "कमाल करता जोशी! किती दिवस झाले. भेटलाच नाहीत!" पलिकडे दोशी चमकतो. तो बोलत नाही. मी विचारते, "अहो, बोलत का नाही?" दोशी गप्पच रहातो. "कोण बोलताय् तुम्ही?" मी रागारागात विचारते. "दोशी... मी दोशी बात करतो." दोशी घाबऱ्या घाबऱ्या बोलतो. मी पट्कन फोनच बंद करून टाकते. पुन्हा दोशीचा फोन आल्यावर मी तो उचलतच नाही. माझं मलाच आश्चर्य वाटतं की केळकरांना मी केरकर समजते आणि दोशीला जोशी– तेव्हा मला त्यांचे आवाजसुद्धा ओळखता येत नाहीत म्हणजे माझी कमाल आहे नाही का? फक्त एक अक्षर चुकीचं ऐकू येतं. पण त्यामुळे एका व्यक्तीची संपूर्ण ओळखच मला पटू शकत नाही. जेव्हा थोडा वेळ जातो आणि गैरसमज दूर होतो तेव्हा खरी ओळख पटते. मग केरकर म्हणजे केळकर हे कळतं आणि दोशी हे जोशी नाहीत हे समजतं. टेलिफोनवरचे हे लहानसे गैरसमज– पण सगळ्या आयुष्यात हेच चाललेलं असतं...

## पन्नास

आज सकाळच्या प्रहरी मी बाहेरच्या बागेत उभी होते तोच वरून दहा-पंधरा पोपट कलकलाट करीत फडफडत निघून गेले. सबंध पावसाळ्यात त्यांचा कुठं पत्ता नव्हता. समोरच्या राईत गेल्या हिंवाळ्यात ते मुक्काम ठोकून होते. सकाळ झाली नाही तोच त्यांचा कळप कलरव करीत उत्तरेला निघून जाई आणि दुपार उतरू लागली की राईकडे परत येई. सकाळच्या पहिल्या प्रकाशात त्यांचं हिरवंगार दर्शन झालं, आणि त्यांचा कर्कश पण आतुर कलकलाट कानी पडला की, सभोवतालच्या सगळ्या सृष्टीतलं चैतन्य त्यांच्यात एकवटून राहिल्याचा प्रत्यय येई. पावसाळ्याला आरंभ झाला तेव्हा समोरच्या राईतला मुक्काम उठवून पृथ्वीच्या पाठीवर हिंवाळ्याचा शोध घेत ते दूर देशी निघून गेले होते. त्यांना हवी असलेली हवा शोधण्यासाठी, त्यांना हवी असलेली फळं हुडकण्यासाठी. आता पावसाळा संपला आहे, पोपटांना हवी असलेली हवा पुन्हा दरवळू लागली आहे आणि हिरवे रावे पुन्हा समोर मुक्कामाला आले आहेत. आपण कॅलेंडर पाहून ऋतूंचे हिशोब करतो; पण त्यांच्या आत्म्याला ऋतू आतूनच कळतात. कुठं रहावं, कुठं जावं, काय खावं, कसं जगावं... आपोआप उमगतं त्यांना. वर्षानुवर्षं, एक पुरातन ज्ञान त्यांच्या रक्तात तसंच जोपासून ठेवलं गेलं आहे. शुद्ध मोकळं जीवन सकाळच्या स्वच्छ हवेत मोकाट तरंगतं आहे. खाली जमिनीवर काय चाललंय हे त्यांना दिसत नाही, कळत नाही हेच बरं—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८८२
२३२८९
निबंध
६४५८
मं. शाखा (स्थान मं.)

## एक्कावन्न

ऐन गर्दीत ती कधी कधी अचानक मला भेटते. खरं म्हणजे तिचं नाव मला ठाऊक नाही. पण ती हसते म्हणून मी हसते. ठरवून अशी कधी ती मला भेटलेली नाही की तिनं माझी ओळखही करून घेतलेली नाही. पण ती मला ओळखते. एखाद्या सभेत बायका जिथं गर्दी करून बसलेल्या असतात तिथं ती मला एकदम दिसते. ती हात हलवून ओळख देते. कधी कधी एखाद्या नाट्यगृहात दुरून कुठून तरी तिचा हसरा चेहरा प्रेक्षकांतून मान उंचावून माझ्याकडे बघतो. कधी रस्त्यावरच्या रहदारीत, कधी भरबाजारात ती मला भेटते. कधी कधी मी मोटारीतून चाललेली असते, ती रस्त्यावरून पायी जात असते. मी तिला बघते. तेव्हा तिचं माझ्याकडे लक्ष नसतं. मग मी तिला चांगली न्याहाळून घेते. ती अगदी साधी साधी मुलगी आहे. फक्त गोड हसते इतकंच. ‘ कसं काय ? ’ असं कधी कधी मंजुळ बोलते. ती खूप स्वच्छ राहते, स्वच्छ दिसते, स्वच्छ वाटते. एखादी साधीच पांढरी वॉईल नेसलेली असली तरी तीवर तिनं गुलाबी किंवा निळ्या फुलांचा नाजुकसा कशिदा भरलेला दिसतो. ती जे काही करीत असेल ते स्वच्छ सुंदरच असेल असं वाटतं. तिचे सरळ वळणाचे केसही ती नेहमी नीटनेटके विंचरून बांधते आणि केव्हा पहावं तेव्हा केसांत एखादं तरी सुगंधी फूल वा गजरा माळलेला असतोच. सदैव हसरी, सदैव बोलकी अशी ती मला नेमकी गर्दीत भेटते आणि वाटतं ही रानातली सुवासिक जाई इथं माणसांच्या काटेरी जंगलात वाट चुकून कशाला भटकते आहे ?

## बावन्न

माणसांचा जसा दवाखाना असतो तसाच कुत्र्यांचाही एक दवाखाना असतो. आजारी कुत्र्यांचे मालक त्यांना तपासायला तिथं घेऊन येतात. कुणी प्रेमळ मालक गाडीतून आपलं कुत्रं मांडीवर घेऊन तिथं येतात. कुणी नोकराचाकरांबरोबर रस्त्यावरून फरफटतही पाठवतात. बहुधा कुत्री काही खात नाहीत हीच तक्रार असते. (बरोबरच आहे! अन्नाच्या नावाखाली माणसं जो कचरा पोटात कोंबतात तो कुत्री कशी खातील!) कुणा कुत्र्याच्या तोंडातून लाळ गळते, कुणाला ताप आलेला असतो, कुणी अपघातात सापडून जखमी झालेलं असतं, कुणी सारखं अंग खाजवून ते रक्तबंबाळ करून घेतात. कुत्र्यांच्या जशा नाना जाती असतात, तसेच नाना रोग असतात. कुत्र्यांनाही डॉक्टर इंजेक्शन देतात आणि कुत्र्यावरही शस्त्रक्रिया होतात. काही काही फॅशनेबल बायका आपली नाजूक कुत्री दवाखान्यात आणतात आणि लहान मुलांच्या तक्रारी डॉक्टरांना सांगाव्यात तशा आपल्या कुत्र्यांच्या कर्मकथा डॉक्टरांना सांगतात. आणि मग डॉक्टर त्यांच्या शोभेच्या नाजूक कुत्र्यांना इंजेक्शन टोचू लागले की त्या माना फिरवून हुंदकेही देतात. श्रीमंताच्या कुत्र्या प्रसूतीसाठी दवाखान्यात येतात. कुत्री फारच आजारी पडली तर मग त्यांना रुग्णालयात दाखल व्हावं लागतं. आणि खाटांवर आजारी माणसं कण्हत पडतात तशी दुखणाईत कुत्री आपापल्या पिंजऱ्यात विव्हळत पडलेली असतात. त्यांचे डोळे पाण्याने भरलेले असतात. चेहरे उदास असतात आणि ती मालकांच्या नावानं टाहो फोडतात, कुत्र्यांचं काय किंवा माणसांचं काय— शेवटी दुःख एकच नाही का?

## त्रेपन्न

तिची आणि माझी जेव्हा प्रथम ओळख झाली तेव्हा मला इतका आनंद झाला. एक मोठी समाजकार्यकर्ती म्हणून ती चांगलंच नाव मिळवून होती. पहिल्याच भेटीत आमचं सूत जमलं. आम्ही खूप बोललो. तिनं धर्मविषयक प्रश्नांचा बराच अभ्यास केलेला होता. नव्हे, तो तिच्या आवडीचा विषय होता. तिच्याशी बराच वेळ बोलल्यानंतर ती एक उत्तम उपदेशक असल्याचीही माझी खात्री पटली.
पहिल्या ओळखीनंतर आमच्या अनेकदा भेटीगाठी होऊ लागल्या. तिचा साधेपणा, धर्मविषयाचं तिचं सखोल ज्ञान, तिचा गोड उपदेश, तिचं पवित्र आचरण ह्या सर्वांमुळे माझ्यावर तिची एकदमच छाप पडली आणि मला तिचं फार आकर्षणही वाटू लागलं. एकदा मी खूप त्रासलेली होते. मन खिन्न होतं. डोकं कामातून गेलेलं होतं. त्या वेळी मला तिची अनिवार आठवण आली. वाटलं, तिच्याकडे जावं. आणि मन मोकळं करावं. तिलाच आपलं दुःख समजू शकेल.
मी धावतच तिच्याकडे गेले आणि आपलं दुःख तिच्यासमोर उघड करू लागले. मी माझी वेदना पुरतेपणी सांगायच्या आतच ती गंभीर होऊन बोलू लागली, " हे बघ, त्याचं असं आहे. जीवनात दुःख कुणाला चुकलंय. प्रत्येकाला वाटतं आपणच दुःखी. पण जगात सगळ्यांनाच त्यांची दुःखं असतात. आपलं दुःख आपण असं उगाळत बसावं का? वगैरे वगैरे. ती बरीच बोलत राहिली, मी मनात म्हटलं— बाई, तू म्हणतेस ते सारं खरंय्. ते सारं मला माहीत आहे. पण ह्या क्षणी मला उपदेश नको आहे. ह्या क्षणी मला हवा आहे मला बोलू देणारा आणि मी बोलेन ते ऐकणारा फक्त एक सहृदय श्रोता.

## चोपन्न

अलीकडे अलीकडे संध्याकाळ झाली की दिव्यांवरचे लहानमोठे पतंग एकाएकी भिरभिरत घरात येतात. पावसाळ्यात ते कुठं गायब झाले होते कुणास ठाऊक. पण आता अचानक हे पुन्हा उपस्थित झाले आहेत. उघड्या खिडकीमधून आपले इवलाले पंख फडफडवीत ही नाजुक पाखरं घरात शिरतात ती एकदम कुठं तरी अंधारा कोपरा शोधीत भिंतीला चिकटून बसतात. मुलखाची भित्री असतात ! जरा खुट् झालं की खोलीभर गरागरा गरागरा फिरत राहतात, आणि मग पुन्हा कुठं तरी कोपरा शोधून भिंतीला बिलगून मुकी बसतात. घरात दिवे लागले म्हणजे त्यांची कोण धांदल उडते. मग फटाफटा दिव्यावर झेप घेतात. ह्या धडपडीत प्राणालाही मुकतात. मात्र ह्या जातीतले मोठे पतंग असतात ते भारी लबाड असतात. उच्चवर्णीय घरंदाज मंडळीप्रमाणे ते आपले स्थान सहसा सोडीत नाहीत. आणि दिव्यावर पंख आपटून मरतही नाहीत. त्यांच्या पंखांवर इतके विलक्षण रंग असतात, इतकी तऱ्हेतऱ्हेची नक्षी असते, इतकी मजेची मऊ लव असते, की त्यांनी ह्या सर्वांचा गर्व वाहिला तरी नवल वाटू नये. विशेषतः त्यांच्या पंखांवरचे ते काळेभोर डोळे. ते तर फारच सुरेख दिसतात.
पण काही झालं तरी पाखरांची जात भित्री ती भित्रीच. उच्चवर्णीय झाले म्हणून काय झालं. रक्तातला भ्याडपणा कुठं जातो का. जरा बोट लावून पहा पंखाला. गेलीच उडून भिर्र्कन. ह्या अफाट संकटमय दुनियेत ही भ्याड पाखरं देवानं का निर्माण केली आहेत कुणास ठाऊक. पण क्षुद्रांनाही ईश्वर जन्म देतो, वाढवतो आणि सांभाळतो !

## पंचावन्न

रोज सकाळी ती आमच्या घराचं आवार झाडायला येते. तिचे केस विस्कटलेले असतात. डोळे तारवटलेले असतात. मुद्रा क्लान्त असते. साऱ्या रात्रीच्या जागरणाचा शीण तिच्या चेहऱ्यावर उमटलेला असतो. बहुधा तिचं मूल अजूनही आजारीच असावं. त्यानं रात्रभर रडून तिला जागरण घडवलं असावं. शिवाय तिला फिरून दिवस गेलेले दिसताहेत ! तिला वाकवत नाही तरी उजव्या हातात झाडू आणि डाव्या हातात टोपली घेऊन ती सारं आवार साफ झाडून काढते. मी व्हरांड्यात उभी असते. मध्येच तिचं लक्ष माझ्याकडे जातं. ती मला हसून सलाम करते. तिच्या हसण्यातही एक प्रकारचा दीनवाणेपणा आहे. " काय ग, बरं नाही का ?" मी तिला विचारते. मग ती मान खाली घालून बोलते, " सारी रात जागवलं लेकरानं. मी बी बीमार हाये. शिर दुखतंय. अन्नबी जात नाय." कसंबसं तेवढंच बोलून ती पुन्हा कामाला लागते. एकामागे एक कामाची रांग लागलेली असते. संडास नि मोऱ्या धुवायच्या असतात. जमीन पुसायची असते. बाग साफ करायची असते. ती कमरेत वाकून कामं करीतच राहते. ' येऊ नको ' म्हटलं तरी येते. घरापेक्षा इथंच बरं वाटतं तिला. खूप दुःखी आहे ती. तिचा सारा चेहराच तसं सांगतो. पण काय तिची दुःखं आहेत ते ती कधी कुणाला सांगत नाही. आणि इथं कुणाला वेळ आहे तिच्या कर्मकटकटी ऐकायला ! त्यावर उपाय कुठं आहेत ? मोठ्या माणसांच्या लहान लहान दुखण्यांचं इतकं कौतुक होतं जगात; पण लहान माणसांची मोठमोठाली दुखणी अशीच पडली आहेत कुजत नि सडत.

## चोपन्न

अलीकडे अलीकडे संध्याकाळ झाली की दिव्यांवरचे लहानमोठे पतंग एकाएकी भिरभिरत घरात येतात. पावसाळ्यात ते कुठं गायब झाले होते कुणास ठाऊक. पण आता अचानक हे पुन्हा उपस्थित झाले आहेत. उघड्या खिडकीमधून आपले इवलाले पंख फडफडवीत ही नाजुक पाखरं घरात शिरतात ती एकदम कुठं तरी अंधारा कोपरा शोधीत भिंतीला चिकटून बसतात. मुलखाची भित्री असतात ! जरा खुट् झालं की खोलीभर गरागरा गरागरा फिरत राहतात, आणि मग पुन्हा कुठं तरी कोपरा शोधून भिंतीला बिलगून मुकी बसतात. घरात दिवे लागले म्हणजे त्यांची कोण धांदल उडते. मग फटाफटा दिव्यावर झेप घेतात. ह्या धडपडीत प्राणालाही मुकतात. मात्र ह्या जातीतले मोठे पतंग असतात ते भारी लबाड असतात. उच्चवर्णीय घरंदाज मंडळीप्रमाणे ते आपले स्थान सहसा सोडीत नाहीत. आणि दिव्यावर पंख आपटून मरतही नाहीत. त्यांच्या पंखांवर इतके विलक्षण रंग असतात, इतकी तऱ्हेतऱ्हेची नक्षी असते, इतकी मजेची मऊ लव असते, की त्यांनी ह्या सर्वांचा गर्व वाहिला तरी नवल वाटू नये. विशेषतः त्यांच्या पंखांवरचे ते काळेभोर डोळे. ते तर फारच सुरेख दिसतात.
पण काही झालं तरी पाखरांची जात भित्री ती भित्रीच. उच्चवर्णीय झाले म्हणून काय झालं. रक्तातला भ्याडपणा कुठं जातो का. जरा बोट लावून पहा पंखाला. गेलीच उडून भिर्र्कन. ह्या अफाट संकटमय दुनियेत ही भ्याड पाखरं देवानं का निर्माण केली आहेत कुणास ठाऊक. पण क्षुद्रांनाही ईश्वर जन्म देतो, वाढवतो आणि सांभाळतो !

## पंचावन्न

रोज सकाळी ती आमच्या घराचं आवार झाडायला येते. तिचे केस विस्कटलेले असतात, डोळे तारवटलेले असतात. मुद्रा क्लान्त असते. साऱ्या रात्रीच्या जाग्रणाचा शीण तिच्या चेहऱ्यावर उमटलेला असतो. बहुधा तिचं मूल अजूनही आजारीच असावं. त्यानं रात्रभर रडून तिला जाग्रण घडवलं असावं. शिवाय तिला फिरून दिवस गेलेले दिसताहेत ! तिला वाकवत नाही तरी उजव्या हातात झाडू आणि डाव्या हातात टोपली घेऊन ती सारं आवार साफ झाडून काढते. मी व्हरांड्यात उभी असते. मध्येच तिचं लक्ष माझ्याकडे जातं. ती मला हसून सलाम करते. तिच्या हसण्यातही एक प्रकारचा दीनवाणेपणा आहे. "काय ग, बरं नाही का ?" मी तिला विचारते. मग ती मान खाली घालून बोलते, "सारी रात जागवलं लेकरानं. मी बी बीमार हाये. शिर दुखतंय. अन्नबी जात नाय." कसंबसं तेवढंच बोलून ती पुन्हा कामाला लागते. एकामागे एक कामाची रांग लागलेली असते. संडास नि मोऱ्या धुवायच्या असतात. जमीन पुसायची असते. बाग साफ करायची असते. ती कमरेत वाकून कामं करीतच राहते. 'येऊ नको' म्हटलं तरी येते. घरापेक्षा इथंच बरं वाटतं तिला. खूप दुःखी आहे ती. तिचा सारा चेहराच तसं सांगतो. पण काय तिची दुःखं आहेत ते ती कधी कुणाला सांगत नाही. आणि इथं कुणाला वेळ आहे तिच्या कर्मकटकटी ऐकायला ! त्यावर उपाय कुठं आहेत ? मोठ्या माणसांच्या लहान लहान दुखण्यांचं इतकं कौतुक होतं जगात; पण लहान माणसांची मोठमोठाली दुखणी अशीच पडली आहेत कुजत नि सडत.

## छप्पन्न

तिची बरीचशी किरकोळ कामं मी करून दिली म्हणून म्हणा, किंवा एकंदरीत मी तिच्याशी चांगली वागले म्हणून म्हणा, तिलाही माझ्यासाठी काही तरी करावं असं वाटलं आणि तिनं अल्पशी भेट म्हणून एक सुरेखशी साडी मला विकत आणून दिली. मला अर्थातच आनंद झाला. साडीचं पुडकं माझ्या हातात देऊन ती किती तरी वेळ त्या साडीबद्दलच बोलत राहिली. त्या एका साडीकरता ती किती दुकानं हिंडली, मला शोभेल असा रंग तिला कसा कुठंच मिळेना, खूप आजारी असूनही त्या दिवशी ती त्या साडीसाठी उन्हात कशी भटकली. इत्यादी, इत्यादी. साडीचं पुडकं तसंच हातात धरून मी तिचं म्हणणं ऐकून घेतलं. तेवढ्यात ती म्हणाली, " अग, साडी तशीच हातात धरून काय बसलीस, उघडून तरी पहा. " मग मी ते पुडकं सोडवलं. साडी सुंदर होती. तिनं बराच वेळ आपण दिलेल्या साडीचं कौतुक केलं. आणि मग ती निघून गेली. दोन-तीन दिवसांनी ती मला अचानक भेटली. पहिला प्रश्न तिनं हाच केला, " माझ्या साडीची घडी मोडलीस की नाही ? " मी ' अजून नाही ' म्हणताच तिनं चेहरा एकदम टाकला. " उद्या नक्की घडी मोडीन. " मी तिला आश्वासन दिलं. त्यानंतर अनेक दिवस गेले. तिची ती साडी मी खूप वापरली, जुनी झाली तेव्हा कुणाला तरी देऊनही टाकली. पण ती मात्र अजूनही भेटली की त्या साडीची मधूनच आठवण करून देते. ती साडी कुठंही गेली, फाटली, तिच्या चिंध्या झाल्या तरी खऱ्या अर्थानं त्या साडीची घडी मी अजूनही मोडलेली नाही. कारण खऱ्या अर्थानं तिनं ती साडी अजूनही मला कुठं दिलीय ? तिनं ती साडी आपल्या स्मरणशक्तीच्या कपाटात जशीच्या तशी राखून ठेवलीय, कोरी करकरीत !

## सत्तावन्न

" एकंदरीत अलीकडे ह्या पोरांना फार जपायला हवं. " दोन वृद्ध गृहस्थ रस्त्यातून आपापसात बोलत चालले होते. रस्त्यावरून मीही नेमकी त्यांच्या मागूनच चालले होते. साहजिकच त्यांचं बोलणं माझ्या कानावर येऊन पडत होतं. त्यातले एकजण वरील वाक्य म्हणाले. त्यावर दुसरे उत्तरले, " तर काय. आता परवाचीच गोष्ट सांगतो. आमच्या बहिणीचा नातू मित्राबरोबर पिक्चर पहायला जातो म्हणून गेला. ह्या वयात एकटं— दुकटं पोराला कशाला पाठवायचं ? पण आजकाल कोण कुणाचं ऐकतंय. जातो म्हणाला आईला. तिनंही जा सांगितलं. तिकिटांच्या रांगेत उभा होता तर कुणी भूल घालून जो पळवला तो दोन दिवस पत्ता नाही त्याचा. कुठं मालाडच्या पुढं जंगलात नेऊन टाकला होता त्याला. हातातलं घड्याळ, अंगठी, पैशांचं पाकीट लंपास केलं चोरांनी. आईबापाचा जीव कोण घाबरा झाला होता. " " ह्या तर रोजच्याच गोष्टी झाल्या आहेत. ", दुसरे गृहस्थ पुन्हा बोलू लागले, मुलांना काही समजत नाही, आईबापांना अकला नसतात. एकूण काय अगदी विसावं वर्ष लागेपर्यंत मुलांवर कडक नजर पाहिजे. जरा सैल सोडता कामा नये; डोळ्यांत तेल घालून जपायला पाहिजे. ह्याच वयात अपघात व्हायचा संभव जास्त. पोरांची डोकी असतात कुठं ताळ्यावर. " तावातावाने बोलत ते दोघेही वृद्ध गृहस्थ तिरमिरीनं रस्ता ओलांडू लागले. तोच एका टॅक्सीनं जोरानं येऊन त्यांच्यातल्या एकाला चांगलाच धक्का दिला. आणि रस्त्यावर ही गर्दी जमली. कुणी तरी एकदम ओरडून म्हणालं, " हे म्हातारे रस्त्यावरून जपून का चालत नाहीत ? "

## अठ्ठावन

स्नानगृहामध्ये मी स्नानासाठी पाणी उपशीत होते तोच खिडकीवर कुणी तरी टक् टक् केलं, म्हणून दचकून वर पाहिलं. ‘ कोण आहे ? ’ मी विचारलं. उत्तर आलं नाही. पुन्हा आपलं खिडकीवर ‘ टक् टक् ’ झालं. मी खिडकीकडे निरखून पाहिलं, तोच खिडकीच्या काचेतून एक चिमणी पलीकडून काचेवर चोच मारताना दिसली. पुन्हा पुन्हा ती काचेवर चोचीनं ‘ टोक टोक ’ करीत होती. बहुधा तिला आत यायचं होतं आणि वाट सापडत नव्हती. ‘ हुं ! बहुतेक बेत दिसतोय ’ मी मनाशी म्हटलं. पण खिडकी उघडायला गेले असते तर घाबरून भुर्र्कन उडून गेली असती. मला माहीत आहे तिला खिडकीच्या आतल्या भागात वरच्या झडपेच्या आणि गजांच्या जाळीच्या आधारानं घरटं बांधायचंय आणि सुंदरशा बाळांना योग्य वेळी जन्म द्यायचा आहे. दर वर्षाची ही हकीगत आहे. ते धांदल करून घरटं बांधणं, मग ती अंडी घालून राखत, उबवत बसणं आणि नंतर पिलांना जपणं, भरवणं, सांभाळणं अन् उडायला लावणं. बस ! संपलं कर्तव्य. थोड्याच दिवसांचा खेळ. पण ते प्रेम किती निरपेक्ष, किती मनःपूर्वक ! ‘ मुलगीच का झाली ? मुलगा नाहीच का ? ’ म्हणून रुसवा-फुगवा नाही. ‘ कुलदीपक ’ म्हणून बाळावर नसत्या जबाबदाऱ्या टाकणं नाही, नसत्या अपेक्षा बाळगणं नाही, भविष्यात काय होणार ह्या मुलांचं म्हणून चिंता नाही. फक्त एक शुद्ध आनंद !
जीव जन्माला आला ह्या एका महान् घटनेचा निरामय आनंद.
चिऊताई, चिऊताई तुम्ही म्हणजे अगदी ग्रेटच आहात बाकी !

## एकुणसाठ

काही दिवसांपूर्वी ह्याच घरी मी काही कामानिमित्त आले होते. तेव्हा ही बैठकीची खोली कशी स्वागतशील वाटली होती. जमीन झाडून पुसून साफ केलेली होती. फर्निचरवरची धूळ झटकून तेही कसं लख्ख करून ठेवलं होतं. बैठकीवरील रंगीत उशा नीट कोन साधून लावून ठेवलेल्या होत्या. फडताळावरली पुस्तकं रांगेनं जुळवून ठेवली होती. मधल्या टेबलावरील पुष्पपात्रात ताज्या फुलांची सुबक रचना करून मांडली होती. खिडक्यांना लावलेले जाळीदार पडदे प्रसन्नतेनं फडफडत होते. कोपऱ्यातल्या स्टॅंडवरील नटराजाच्या मूर्तीसमोर लावलेली उदबत्ती सुगंध उधळीत होती. खोलीत पाय ठेवताच असं वाटलं की, ही खोली येणाऱ्याचं मन:पूर्वक स्वागत करण्यासाठी जय्यत तयार होऊन बसली आहे. माणसांच्या भेटीसाठी उत्सुक झालेली आहे. 'या, बसा. मनमुराद गप्पा करा. मनाचे दरवाजे खुले करा.' साऱ्या खोलीतून जणू काय एक प्रेमळ हाक घुमत असल्यासारखं वाटलं आणि आज... जमिनीवर कचरा तसाच पडलाय. फर्निचरवरची धूळ गेल्या दोन-तीन दिवसांत पुसली गेलेली नाही. बैठकीवरच्या उशा विस्कटल्या आहेत. पुस्तकं वेडीवाकडी पडली आहेत. पुष्पपात्रातली फुलं कोमेजून माना टाकून पडली आहेत. खिडक्यांची दारं बंद आहेत. पडदे निर्जीवपणे लोंबकळत आहेत. साऱ्या खोलीत कुबट वास मारतोय. ही खोली आज खिन्न आहे, विमनस्क आहे, अबोल आहे. हिला कुणाला भेटायचं नाही. कुणाशी बोलायचं नाही. माणसं बोलली नाहीत तरी त्यांच्या घरातल्या वस्तू बोलतात ना! काय त्यांच्या मनात आहे ते त्यांच्या घरातली वस्तू न् वस्तू सांगते. नव्हे— सगळी वास्तूच तिच्यात वस्ती करून राहिलेल्या माणसाची हकीकत सांगत असते.

## साठ

रात्री बराच वेळ झोप येईना म्हणून करमणुकीखातर ट्रँझिस्टर सुरू केला. रात्रीचे जवळ जवळ बारा वाजून गेले होते. मुंबईचं आकाशवाणी केंद्र तर केव्हाच बंद झालं होतं. म्हणून निरनिराळी केंद्र ट्रँझिस्टरमध्ये पकडण्याचा प्रयत्न करून पाहिला. सगळीकडे सामसूम होती. तोच अचानक कुठलं तरी दूरदेशीचं आकाशवाणी केंद्र लागलं.

एक अनोखी भाषा कानावर पडली. कुणी पुरुष रुंद खोल आवाजात बोलत होता. बातम्या सांगत होता किंवा भाषण देत होता. काय ते कळायला काही मार्ग नव्हता. ती भाषा, तिच्यातले शब्द, त्या शब्दांचे उच्चार, सगळंच अपरिचित होतं. त्यामुळे अर्थ हाती गवसत नव्हता. तरी पण रात्रीच्या शांत वेळी सारं जग गप्प झालं असताना एक अनोळखी आवाजही ह्या क्षणी सहवास देत होता ह्याचीच मौज वाटली.

इथं शांतता होती. पण जगात कुठं तरी जाग होती. कुठं तरी माणसांचे व्यवहार जोरात चालूच होते. पृथ्वीच्या एका बाजूवर काळोख होता. पण दुसऱ्या बाजूवर प्रकाश होता. ही परकी भाषा समजत नव्हती. तिच्यातून अर्थबोध होत नव्हता. मी कान टवकारून ऐकत होते. मध्येच एखादा शब्द ओळखीचा वाटायचा आणि आनंद व्हायचा की समजलं रे समजलं ! एकदा तर चक्क संस्कृत ‘ हन्त ’ मला ऐकू आला. एकदा मराठी ‘ जीवन ’, तसाच उर्दु ‘ शमा ’, आणि तेवढ्यात इंग्रजी ‘ फिश ’हि कानी पडला. अखेर ही भाषा तरी कोणती होती ? जगाच्या पाटीवर कुठं बोलली जात होती ? समजा, अशीच एक वेळ आली की माझी भाषा बोलणारं जिथं कुणीच नाही आणि जिथली भाषा मला समजत नाही तिथं मी फेकले गेले तर ? काय भयानक कोंडमारा होईल जिवाचा ! ट्रँझिस्टर चालूच होता. मी अर्थ शोधण्याचा व्यर्थ प्रयत्न करीतच होते आणि एकाएकी वाटलं की, समजा, अशी वेळ आलीच की आपली भाषा बोलणारी आपल्याला ओळखणारी कुणी कुणी माणसं जिथं नाहीत अशा ठिकाणी आपण फेकले गेलो तर... तर मग नुसता माणसाचा आवाजही शिल्लक आहे हेच समाधान फार मोठं वाटेल.

## एकसष्ट

खंडाळ्याचा घाट चढून आपण अर्ध्या वाटेवर आलो म्हणजे रस्त्याच्या कडेला एक म्हातारं जोडपं भीक मागत बसलेलं अलीकडे दिसतं. दुरून गाडी येताना दिसली की म्हातारी अशाळभूतपणे गाडी थांबेल म्हणून बघत राहते. म्हातारा तर अर्धवट उभा राहून चमत्कारिक आरोळीही मारतो. म्हातारीच्या पुढ्यात एक मळकट फाटकं फडकं अंथरलेलं असतं. म्हाताऱ्याच्या पाठीवर भगव्या पटकुऱ्याचं निशाण फडकवणारी एक काठी बांधलेली दिसते. म्हातारीच्या डोक्यावरचा केसन् केस पिकलाय. म्हाताऱ्याच्या वाढलेल्या पांढऱ्या दाढीवर एक मळकट पिवळी छटा चढलीय. दोघांच्या अंगावरचे कपडे पार फाटून गेले आहेत. ना घर, ना दार; ना पोर, ना बाळ; ना कसला आधार. खंडाळ्याच्या वेड्यावाकड्या घाटात उघड्यावर म्हातारा-म्हातारी सदैव भीक मागत बसलेली दिसतात. काय ह्यांच्या आयुष्याची शोककथा आहे ? की म्हातारपणात कुणी ह्यांना घराबाहेर हाकलून दिलंय कुणास ठाऊक. त्यांच्याकडे पाहून क्षणभर मन उद्विग्न झालं तरी असं वाटतं, इतक्या खडतर परिस्थितीतही म्हातारी म्हाताऱ्याला सांभाळते आहे, म्हातारा म्हातारीचं संरक्षण करतो आहे. ह्यातही एक गोडवा आहे. इतक्या बिकट आयुष्याला तोंड देतानाही म्हातारा-म्हातारी म्हणावे तितके दुःखी दिसत नाहीत. आता प्रश्न एवढाच आहे की त्यातलं एक कुणी तरी दुसऱ्याच्या अगोदर दगावलं तर...मागे उरलेला तो दुसरा जीव उरलेलं भयाण आयुष्य एकट्यानं ओढत नेऊ शकेल ? छेः छेः, न्यायचंच असेल तर देवानं दोघांना एकदमच न्यावं. पण बहुधा ही म्हातारा-म्हातारी देवासाठी थांबणारच नाहीत. असल्या दारिद्र्यातही एकमेकांच्या जवळ त्यांना समाधानात बसलेलं पाहिलं म्हणजे वाटतं, दोघांची शरीरं वेगळी असली तरी प्राण एकच आहे आणि जाते वेळी तो दोघांनाही एकदमच घेऊन जाईल.

## बासष्ट

सभा होती बायकांची आणि आम्हा काही निवडक कथालेखिकांना कथाकथनासाठी बोलावण्यात आलं होतं. समोर जमलेल्या स्त्रिया बहुतेक मध्यमवर्गातल्या, त्यातल्याही बऱ्याचश्या गरीब मध्यम वर्गातल्याच होत्या. त्यांना आवडतील आणि पटतील अशाच कथा वाचून दाखवायला हव्या होत्या. त्या तर बिचाऱ्या घरातली कामं आटोपून घरातली नेसूची पातळंच झटकून घटकाभर करमणुकीला येऊन बसल्या होत्या. वाचलीच तर रोजची वर्तमानपत्रं वा मासिकं वाचणाऱ्यांचा हा वर्ग होता. खरं म्हणजे वाचायला जगात पुष्कळ आहे, पण ते विकत घेऊन वाचायची ऐपत किती जणांची असणार? आणि सारा दिवस घरातल्या कामाचा रामरगाडा आटोपता आटोपता मोठमोठाली पुस्तकं त्या वाचणार तरी केव्हा न् कितीशी? त्यातल्या त्यात चार शब्द कानी पडले तर तेवढाच बौद्धिक उत्कर्ष साधला ह्या भावनेनं बहुतेकजणी सभेला आल्या होत्या. आमच्या कथाकथनाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. बहुतेक कथालेखिकांनी विनोदी कथाच निवडल्या होत्या. घरगुती प्रसंगातले विनोद होते सारे. कथालेखिका कथा सांगत होत्या नि बायका पोट धरधरून हसत होत्या. माना मागे टाकून आणि खांदे गदगदा हलवून अगदी असहाय्यपणे हसत होत्या. साधे साधे गंमतीचे प्रसंगही त्यांना हसवायला पुरेसे होते. त्यांना हसायला फारसं मोठं कारण लागतच नव्हतं. फक्त हसायला काही तरी निमित्त हवं होतं इतकंच. आपलं वय आणि काळज्या विसरून एकाच वेळी शंभर बायका खदखदून हसत होत्या. त्या हास्याच्या लाटांची भरती पहाता पहाता एकदम मी चमकले. क्षणभर भास झाला की ह्या बायका हसत नाहीत तर गदगदून हुंदके देताहेत, स्फुंदून स्फुंदून रडताहेत. त्या हसण्याच्या कल्लोळातून ऐकू येत आहेत ते त्यांच्या हृदयातले उसासे आणि सुस्कारे—

## त्रेसष्ट

त्या दिवशी एकाएकी दुपारचे चार वाजले नाही तोच आभाळ खूप भरून आलं. आकाशात मोठमोठाले काळेकुट्ट ढग जमले. कोणत्या क्षणी पाऊस पडेल ह्याचा नेम सांगवत नव्हता. एकाएकी जोराचा वारा सुटला. त्याबरोबरच धूळही उधळत आली. रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांची एकच धांदल उडाली. कारण ह्या वेळी पावसाची अपेक्षा कुणी केली नव्हती. प्रत्येक जण घाईघाईनं पावलं उचलून मार्ग आक्रमू लागला. रस्त्यावरच्या गर्दीला एकदम वेग आला. फूटपाथवरून एकमेकांना बाजूला ढकलीत माणसं पुढं पुढं धावू लागली. सबंध रस्त्यावर फक्त एकाच माणसाला आता कुठंच जाण्याची घाई उरलेली नव्हती. कारण आता त्याची जीवनाची यात्राच संपलेली होती. तो एक खिश्चन माणूस होता! त्याचं प्रेत काळ्या गाडीमध्ये उघड्या पेटीत ठेवून गाडी कबरस्थानाकडे हळूहळू चालवण्यात येत होती. गाडीच्या काचेतून त्याचा शांत चेहरा स्पष्टपणे दिसत होता. छातीवरती त्याचे दोन हात एकमेकांवर जुळवून ठेवण्यात आले होते. आयुष्यभर केलेली धावपळ आता संपली होती. भोवतालचे लोक जीवनाच्या गजबजाटात गुंतले होते आणि ह्याच्या जीवनाची गुतागुंत आता मोकळी झाली होती. रस्त्याच्या कडेला क्षणभर थांबून मी त्याच्या कलेवराकडे निरखून पाहिलं आणि त्याच्या मृत्यूतूनही प्रत्ययाला येणारा एक शांत भाव पाहून नकळत नम्र झाले. क्षणभर वाटलं, आता ह्याला कुठं जायचं काही कारणच उरलं नाही. आता संपली सारी धडपड....... मग रस्त्यावरच्या गर्दीत मिसळून वेगानं चालायला लागले. अंगातलं रक्त वेगानं चालत राहिल्यामुळं गरम होऊ लागलं. तेवढ्यात पाऊस टपटपू लागला आणि एकदम वाटलं, पण काही झालं तरी त्या मृत शांतीला ह्या जिवंत धडपडीची सर कशी येईल?

## चौसष्ट

रस्त्याच्या मध्यभागी एक वेडा उभा आहे. अंगानं आडवातिडवा वाढला आहे. रंगानं काळाकुट्ट. डोळ्यांत चमत्कारिक तांबड्या छटा. सबंध चेहऱ्यावर खुनशी छटा. त्याच्या हातात एक जाड दोरखंड आहे. पण त्याला मात्र वाटतंय की ती एक तलवार आहे. तलवार फिरवून कुणा तरी शत्रूचा निःपातच करीत असल्यासारखा तो दोरखंड फिरवतोय. आजूबाजूला रहदारी वेगानं चालू आहे. माणसं आणि वहानं एकसारखी येताहेत नि जाताहेत. पण वेड्याला कशाचंच भान नाही. स्वतःला तो कोण समजतोय कुणास ठाऊक ! तानाजी मालुसरे की बाजी प्रभू देशपांडे ? त्याचं त्यालाच ते माहीत ! एवढं मात्र खरं की तो ह्या युगात नाही. ह्या जगात नाही. लोक त्याला हसताहेत ह्याची त्याला पर्वा नाही. प्राण पणाला लावून तो एकसारखा लढतोय आणि लढतोय. कुणाशी ते त्यालाच ठाऊक किंवा कुणाशीच लढत नसेल. स्वतः स्वतःशीच लढत असेल. स्वतःमधल्या काही दुर्दम्य विकृतींवर मात करण्यासाठी त्याची ही धडपड चालू असेल. ह्या वेड्याची ही एकाकी, वरवर वेडी भासणारी लढाई खरोखरी वाटते तितकी वेडी नसेलही. ह्याचं तारुण्य, ह्याची ताकद, ह्याचा उत्साह सगळ्या शक्तीची वाट ह्याच्या एका वेडानं लावली आहे. किंवा तो वेडा आहे हे कदाचित् जगावर उपकारच म्हणावे लागतील. कारण त्याच्या वेडानं त्याला बरंच निरुपद्रवी ठेवलंय. तो शहाणा असता तर ! त्यानं केवढा भीषण संहार केला असता ह्याची कल्पनाच करवत नाही.

## पासष्ट

इतकी वर्षं होऊन गेली तरी एका माणसाची मातीवर जनावरासारखी वाजत असलेली पावलं अजून माझ्या कानांत घुमताहेत. घाम गाळीत तो माणूस मातीवरून धपाधप धावतो आहे. एखाद्या थकलेल्या म्हाताऱ्या घोड्यासारखा. आणि त्या आठवणीनं मन शरमेनं चूर होतंय की आपण आपला भार त्याच्या पाठीवर ठेवून डोंगर चढलो, उतरलो. माथेरानला घडलेली गोष्ट. आम्हांला 'पॅनोरमा पॉईंट' बघायला जायचं होतं. आम्ही बाजारात वाहनाची आणि मार्गदर्शकाची चौकशी करीत होतो तोच तो दात पडका आनंदी चेहेऱ्याचा हाडकुळा म्हातारा पुढं आला आणि म्हणाला, "ताईऽ, मी नेतो तुम्हांला. कसं अगदी अलगद फुलावानी. बसा तर खरं माझ्या गाडीत." त्याच्या मालकीची एक रिक्षा होती. आणि त्या रिक्षाचं वाहन तो स्वतःच हाकीत होता. त्याच्या पाठीवर पाय ठेवून बसायचं अगदी जिवावर आलं. 'नको....नको...' मन आत आक्रंदू लागलं. पण तोच ऐकेना. रडकुंडी आला, "ताई, गरीबाला दोन पैसं मिळू द्या की." शेवटी बसलो एकदाचे आम्ही त्याच्या रिक्षात. आणि तो आनंदानं, गाणं गात, रिक्षा ओढीत वेगात पळत सुटला. डोंगरावरच्या उंच, विस्तीर्ण पठारावर त्यानं आम्हांला हां हां म्हणता नेऊन पोचवलं. "ताई, सुर्वे पघा कसा मावळतोय. वा ! लई मोठा मोठा दिसतुया." तो आनंदानं सूर्यास्त पहात राहिला. खोल दऱ्याखोऱ्यांवर निळं धूसर धुकं जमू लागलं, गूढ संध्याकाळ काळोखात मिसळू लागली तेव्हा त्यानं आम्हांला निघायची जल्दी केली. "चला, चला. नाय तर त्यो 'मामा' भेटायचा वाटंमंदी." तो हसून म्हणाला. चढणीपेक्षा डोंगराचा उतार अवघड होता. कुठच्याही क्षणी रिक्षा कलंडेल की काय अशी भीती वाटत होती. पण त्यानं ज्या सहजपणे वर नेऊन पोचवलं, त्याच सफाईनं खाली उतरवून आणलं. जाताना त्याच्या हातावर आम्ही पैसे ठेवले तेव्हा त्यानं डोळे भरून कृतज्ञ मुद्रेनं आमच्याकडे पाह्यलं. आता इतके दिवस होऊन गेले त्या

गोष्टीला, पण मला ' पॅनोरमा पॉईंट 'वरचा तो रम्य सूर्यास्त काही केल्या आठवतच नाही. आठवताहेत त्या फक्त माणूस नावाच्या एका इमानी जनावराच्या मातीवरच्या टापा.

## सहासष्ट

त्या दिवशीची हवा अगदी खराब होती. आकाशात मळभ दाटून आलं होतं. साऱ्या वातावरणावर उदास करड्या रंगाची पुटं दाटून आली होती. वर पहावं तर मळक्या बांझोट्या मेघांच्या तुकड्यांनी सारं आकाश व्यापून टाकलं होतं. खाली जमिनीवर पहावं तर सर्वत्र धूळ तरंगत होती. हवेत एकंदरीत उष्मा अधिक होता आणि तोही त्याच्यामधल्या विचित्र दमटपणामुळे श्वास गुदमरवीत होता. पाऊस पडेल म्हणावं तर पाऊस पडण्याची चिन्हंही दिसत नव्हती. पण दूर कोठे तरी पाऊस पडत होता हे नक्की. कारण मधूनच जोराचा वारा सुटे आणि वाहताना आपल्याबरोबर धुळींचे आणि पाल्यापाचोळ्याचे लोटच्या लोट उधळीत आणी. रस्त्यावर माणसं नुकतीच उकिडवी बसून राहिली होती. नुसती काड्यांनी दात कोरीत गप्प बसली होती. कारण बोलावंसंच वाटत नव्हतं. हसू नये, बोलू नये, काही करू नये असं वाटायला लावणाराच तो दिवस होता. कारण सूर्याला मेघांनी झाकळून टाकलं होतं आणि प्रकाश हरवला होता. अशा त्या मृतवत् वातावरणात एकाएकी एक विलक्षण दृश्य बघायला मिळालं. सूर्य पश्चिमेकडे कलंडायला थोडा अवकाश होता. इतक्यात सूर्यावर पसरून राहिलेले ढग किंचित विरळ झाले आणि त्याचे सहस्र तेजोयुत किरण विरळ मेघांमधून वाट काढीत पृथ्वीवर पसरले. सूर्य दिसत नव्हता, पण त्याचे हजारो बाहू मातीला स्पर्श करण्याच्या उत्सुकतेने आवेगाने पृथ्वीवर पसरले. किरणांचा दिव्य पिसारा मेघांमधून अकस्मात उलगडला गेला. उलट्या जपानी पंख्यासारखा. सूर्याच्या हजारो हजारो हातांतून शुद्ध, पवित्र, सोनेरी आणि मुलायम उन्हाची बरसात होऊ लागली. मळकट आकाशातून एकाएकी जिवंत झालेल्या सूर्यप्रकाशाच्या चैतन्यमय सहस्रधारा पृथ्वीवर उतरल्या तेव्हा प्रकाशाचा लखलखीत पाऊस पडत आहे असा साक्षात्कार झाला. आणि असं वाटलं की त्या अद्भुत प्रकाशाचा दाता दिसत नसूनही आहे... ह्या क्षणी पृथ्वीवर प्रेमाचा आवेगपूर्ण वर्षाव करीत आहे. मग आपण ही उदासीनता का धरावी ?

## सदुसष्ट

जितके हात तितक्या चवी ह्या जगात असतात. परंतु हातगुण ही एक अद्‌भुत गोष्ट आहे. पदार्थ तेच असतात, अन्न शिजायला वापरलेल्या जिनसा त्याच असतात, प्रमाण जवळ जवळ तेच असण्याचाही संभव असतो, पण हाताचा गुण ही एक अशी चीज आहे की, तीच अन्नाच्या चवीला अनोखा ढंग देऊन जाते. मध्यंतरी एकीकडे आम्ही जेवावयास गेलो होतो. यजमानीणबाई चांगल्याच सुग्रण होत्या. त्यांच्या हातचे पदार्थ विलक्षण चवदार होते. पण त्यांच्या लोणच्याचा रंग आणि चटका काही और होता. मी कुतूहलानं आणि कौतुकानं त्यांची लोणचं घालायची पद्धत विचारून घेतली आणि त्या पद्धतीनं घरी लोणचं घालून पाहिलं. पण ' ती ' चव काही ह्या लोणच्याला आली नाही. मात्र ज्यांनी ज्यांनी माझं लोणचं खाल्लं त्यांना त्यांना त्याची चव अतिशय आवडली, पण माझं काही समाधान झालं नाही. हे लोणचं मला काही ' तसं ' लागलं नाही. तो हातगुण काही निराळाच होता. काही दिवसांपूर्वी माझी एक मैत्रीण आमच्या घरी पाहुणचाराला आली होती. मागं तिनं केलेला चवदार ' पनीर मटार ' आठवून मी तिला तो पदार्थ परत करायचा आग्रह केला. ती एकदम घाबरून म्हणाली; " नको ग बाई, माझी ख्याती अशी आहे की, माझ्या हातून एखादे वेळीच जिन्नस चांगला साधतो. पुन्हा करायला गेले की तो बिघडतो. " पण मी आग्रह सोडला नाही. तिनं भीत भीत ' पनीर मटार ' केला, पण तिच्या मते तो बिघडला. ती साफ वैतागली. तिचा ' हातगुण ' ह्या वेळी कामाला आला नाही. माझ्या अती काळजीपूर्वक करण्यानं माझं लोणचं जमलं नाही आणि तिच्या अती घाबरण्यानं तिचा ' पनीर मटार ' बिघडला. आमचे दोघांचे हातगुण तसे एकंदरीत वाईट नसून आमचे पदार्थ साधले नाहीत. आणि मग माझ्या लक्षात आलं की, हातगुण हा हाताचा गुण नसून तो अंतःकरणाचा गुण आहे. अन्न शिजवताना हात हळुवार पाहिजेत, पण त्यापेक्षा आपलं अंतःकरण शांत पाहिजे. कारण राग, लोभ, द्वेष,

भय हे आपले सारे दोष आपण शिजवीत असलेल्या अन्नात संक्रमित करीत असतो.

# अडुसष्ट

समोरच्या झाडाखाली दोन गरीब मुली खेळत बसल्या आहेत. एक आहे पाच वर्षांची आणि एक आहे दोन वर्षांची. दोघींच्या अंगावरचे कपडे फाटके आणि विटकेच आहेत. मोठीनं बापाचा जुना सदरा घातला आहे. धाकटीनं एक जुना परकर अर्धा फाडून कमरेभोवती गुंडाळला आहे आणि वर एक ढगळ पोलक उलटंच चढवलंय. दोघांच्या भुऱ्या केसांचा गुंता झालाय. बऱ्याच दिवसांत त्यांना तेल लागलेलं नाही. दोघींची पोटंही खपाटीला गेली आहेत. पण दोघी आनंदात खेळताहेत. मोठीनं कुठून तरी एक बांबूची चिरकलेली काठी पैदा केली आहे आणि तिला एक रबराचा तुकडा बांधला आहे. तो रबर ओढून ती परत सोडते तेव्हा त्या बांबूच्या काठीचा फटक् असा आवाज होतो आणि मग दोघी बहिणी मिळून मोठ्या मोठ्यानं हसतात. बराच वेळ हा खेळ खेळल्यानंतर दोघी बहिणी मातीत बसतात. आणि मातीचे डोंगर तयार करतात. आजूबाजूच्या झाडांची पानं आणि फुलं गोळा करून त्या डोंगरावरती त्या झाडी लावतात. एका डबड्यातून कुठून तरी पाणी भरून आणतात आणि डोंगरावरून वाहणारा झरा तयार करतात. त्या दोघी खेळत बसल्या आहेत तिथं वरच्या झाडामधून कोवळं सोनेरी ऊन झिरपतंय आणि त्या दोघी अंगावर ऊन घेत मातीवर केव्हाच्या मजेत खेळत बसल्या आहेत. मध्येच त्या दोघींचं माझ्याकडे लक्ष जातं आणि त्या लाजून हसतात. त्यांचे स्वच्छ निष्पाप डोळे आनंदानं लुकलुकतात आणि पिवळ्या कोवळ्या उन्हात त्यांचे मळके चेहरेही प्रसन्न हास्यामुळे अतीव सुंदर दिसतात. वाटतं की दोन पवित्र देवदूत उन्हाच्या शिडीवरून घसरत घसरत पृथ्वीवर खेळाची मौज लुटायला क्षणभर अवतरले आहेत.

## एकुणसत्तर

फोर्टमधला हा एक गजबजलेला रस्ता. मोठ्या मोठ्या इमारतींत मोठमोठ्या आर्थिक उलाढाल्या करणाऱ्या कचेऱ्यांतून काम चालू आहे. रस्त्यावरून वेगानं माणसं येत आहेत, जात आहेत. ऑफिसर लोक आणि धंदेवाईक मंडळी आपापल्या गाड्यांतून वा टॅक्सीमधून. कारकून, पट्टेवाले, हमाल, हातगाडीवाले आणि इतर सामान्य माणसं पायी चालली आहेत. स्त्रिया फारशा दिसत नाहीत, दिसल्याच तर त्या रुक्ष, करड्या चेहऱ्याच्या धिप्पाड पार्शी स्त्रियाच दिसतात. कुणाकुणाच्याच चेहऱ्यावर हास्य नाही, कसल्याही भावनाच नाहीत. तळपत्या उन्हात तापलेल्या चेहऱ्यावरून दिसून येत आहे ती फक्त कामं आटोपून घेण्याची अनिवार घाई. एका वेगवान आर्थिक शक्तीनं ही सारी माणसं रबरासारखी ताणून, खेचून ठेवली आहेत. ह्यांचं चालणं, बोलणं, ह्यांच्या चेहऱ्यावरचे भाव, ह्यांचं सारं जीवनच जसं पिळवटून शुष्क करून टाकलंय. आणि त्या माणसांचाही नाईलाज आहे. कुणाचा कुणाशी संबंध नाही, कुणाचं कुणाकडे लक्ष नाही. हजारो माणसं नुसती जात आहेत, येत आहेत. रस्त्यावर माजली आहे ती फक्त एक न थांबू शकणारी गजबज, एक अव्याहत गतिमानता, एक कोरडी वर्दळ. जेव्हा ह्या एकत्र आलेल्या पण एक नसलेल्या माणसांकडे लक्ष खिळतं, तेव्हा असं वाटतं की ही आहे फक्त एक गर्दी— हिला काही समाज म्हणता येणार नाही. ज्या वेळी सगळ्यांच्या गतीची दिशा एक असेल, जाण्यातला हेतू एक असेल, आणि साध्यही साऱ्यांचं एकच असेल, तेव्हाच सगळ्यांचा मिळून होईल एक समाज. मग माणसांची रूपं वेगवेगळी का असेनात. त्यांची भाषा, त्यांची जात, भिन्न भिन्न का असेना, पण साऱ्यांच्या जीवनाचं उद्दिष्ट एक निश्चित झाल्यावाचून माणसांचा समाज निर्माण होणार नाही. राहील ती फक्त माणसांची गर्दी. वेगवेगळ्या हेतूंनी, वेगवेगळ्या ठिकाणी धावणारी. एकमेकांशी वेगळे वेगळे कोन करून राहिलेली. एका तणावाखाली चिरडली जाणारी. फक्त गर्दी ! सगळ्या व्यक्तींना समांतर, समीप,

समोर एका आवेगानं, खळखळत्या उत्साहानं घेऊन जाणारा हा समाज नव्हे.

ø

## सत्तर

रस्त्यावरून एक माणूस आनंदानं मोठमोठ्यानं गात गात चाललाय.
'हा माझा भारत देश...मी...राजा ह्या देशाचा....मी मालक ह्या
भूमीचा...आ ऽ ऽ ऽ ऽ' इतका खुषीत आहे म्हणून सांगू—
हसत हसत गातोय आणि गात गात हसतोय. तानावर ताना मारतोय.
रस्त्यावर आसपास माणसं आहेत ह्याची त्याला दादच नाही.
तो आपल्याच धुंदीत गात चाललाय. आता तो वेडा आहे की शहाणा
आहे हे कळायला काही मार्ग नाही. बहुधा वेडा असावा. पण तो जे
गाणं म्हणतोय ते आपल्या देशाविषयीच्या प्रेमानं इतकं ओथंबलेलं
आहे आणि तो त्या प्रेमात इतका डुंबून डुंबून गातोय की त्याला वेडा
म्हणणं हा मला तरी त्याचा अपमान वाटतोय. काही दिवसांपूर्वी
एक वेडा— अगदी खरोखरीचा वेडा सकाळ उजाडते ना उजाडते तोच
आमच्या घरासमोरच्या रस्त्यावर येऊन उभा राहिला. आणि त्यानं
जोरात व्याख्यान सुरू केलं. स्वतःला तो बहुतेक पंडित जवाहरलाल
नेहरूच समजत होता. तो आपल्या व्याख्यानातून सांगत होता—
ह्या देशाचा अधःपात मी कदापीही होऊ देणार नाही. देशात आज
सर्वत्र फुटीर वृत्ती माजली आहे. दिवसेंदिवस देशातलं दारिद्र्य आणि
बेकारी वाढत चालली आहे. अशा परिस्थितीत मी आपल्यापैकी
प्रत्येकाकडे त्याच्या घामाची याचना करीत आहे. आपण मला
घाम द्या, मी आपणाला स्वातंत्र्य देईन. इत्यादी इत्यादी.
त्या वेड्याच्या शब्दाशब्दांमागे आत्मिक वेदना होती आणि त्या
वेदनेमुळे त्याचा कंठ रुद्ध झाला होता, आवाज पिळवटून निघत होता
सुमारे तासभर तो बोल बोल बोलला आणि तोंडाला फेस येऊन
तिथंच रस्त्यावर बेशुद्ध पडला. ह्या वेड्याला वेडा तरी कसं म्हणायचं.
सबंध देशाची जबाबदारी आपल्या डोक्यावर येऊन बसल्यामुळे तो
पार थकून गेला होता. हे असलं वेड रस्त्यातून फिरताना पाहिलं की
वाटतं, आपल्यातल्या प्रत्येकाला असं वेड लागत नाही, आपल्या
प्रत्येक कृतीमागे ही उत्कटता येत नाही आणि ह्या वेड्याजवळ

नुसतंच वेड आहे, नुसतीच उत्कटता आहे आणि त्याचा त्याला काही उपयोग करता येणार नाही हीच सगळ्यात मोठी शोककथा आहे !

०

## एक्काहत्तर

ह्या बंगल्याच्या आवारात मी बसले आहे. वेळ रात्रीची आहे. समोर दूर दूर 'हाय वे' पसरला आहे. मोटारी एकसारख्या येताहेत नि जाताहेत. त्यांना खंड नाही. अंधारातून प्रकाशाचे झोतामागून झोत वेगानं सरकत सरकत येतात आणि पुन्हा अंधारात लुप्त होतात. अबब ! केवढ्या मोटारी ह्या ! इतक्या मोटारी ह्या महानगरीत आहेत ह्या कल्पनेनंच डोकं गरगरायला लागतं. ह्या एवढ्या मोटारी येतात कुठून, जातात कुठं ? ह्यांचा प्रवास न थकता, न थांबता चालूच आहे. रात्र पडली तरीसुद्धा. आणि मोटारींचा प्रवास म्हणजे पर्यायानं माणसांचाच प्रवास. ज्यांच्यापाशी मोटारी आहेत ते मोटारीनं जातात, ज्यांच्यापाशी नाहीत ते पायी जातात. एकूण काय, रस्त्यावरची गर्दी कायमच आहे. प्रचंड इमारतींच्या विस्तृत वसाहती पाहिल्या की मन असंच आश्चर्यानं थक्क होतं. केवढी माणसं येऊन राहिली आहेत ह्या इमारतींमधून ! ही कोण, कुठली ? ह्या सर्वांची नावं, गावं, त्यांचे उद्योगधंदे, त्यांचा जीवनक्रम, त्यांची सुखदुःखं ह्यांची पूर्ण कल्पना आपल्याला कधीच येणार नाही. ह्यातल्या प्रत्येक माणसाला स्वतःचं वेगळं जीवन आहे, स्वतःच्या म्हणून काही आनंदवेदना आहेत आणि आपापल्या कोषात ही सारी माणसं वेगवेगळी जगताहेत. ह्या सगळ्यांची आयुष्यं कुणाही एका व्यक्तीला जाणता येणं अशक्य आहे. शेवटी आपल्याला एकंदरीत जगातल्या माणसांबद्दल फार फार थोडं समजतं, आणि त्यांच्यासाठी करायचं म्हटलं तरी तेही फार अवघड आहे. संतपुरुषांनी जरी खूप मनात आणलं, तरी त्यांच्या समाजसेवेलाही फार मर्यादा आहेत. मग सामान्य माणसांची काय कथा ! आपल्या हातात शेवटी इतकंच उरतं की आपण फक्त आपल्यालाच जाणून घ्यावं, आपण आपल्याच व्यक्तिमत्त्वाचं विश्लेषण करावं, आपल्याला नीट ओळखावं. आधी आपल्याला सुधारावं, आपल्यापासून इतरांना जेवढा कमी उपद्रव होईल तेवढं बरं. शेवटी आपल्याला इतरांसाठी एवढंच करणं शक्य आहे.

## बहात्तर

मांजर मत्सरी असतं असं म्हणतात. आमच्याकडे एक मांजरी आहे आणि एक कुत्री आहे. आमची मांजरी काही आमच्या कुत्रीचा मत्सर करीत नाही, पण आमची कुत्री मात्र आमच्या मांजरीचा विलक्षण मत्सर करते. मांजरीला आम्ही कुरवाळायचा अवकाश की ती शेपटीच्या देठापासून भुंकून भुंकून सारं घर डोक्यावर घेते. तिच्याखेरीज इतर कुणाकडे आम्ही अधिक लक्ष दिलेलं तिला सहन होत नाही. असा तीव्र मत्सर करायला तिला शिकवलं कुणी ? कुणीही नाही ! मत्सर तिच्यात उपजतच आहे. सहज प्रेम करावं तसा ती सहज मत्सर करते. जनावराला काय किंवा माणसाला काय, मत्सर शिकवावा लागतच नाही. तो जन्मतः त्यांच्या रक्तातच असतो. मनुष्य जनावराच्या पुढे पाऊल केव्हा टाकतो ? तर जेव्हा तो विवेकबुद्धी वापरून, मत्सर वा हेवा करणं अंती हितावह नाही हे जाणून स्वतःच्या मत्सरभावावर विजय मिळवतो तेव्हा ! एरवी मत्सर करताना तो जनावरांच्याच पातळीवर असतो, किंबहुना त्याहूनही खालच्या पातळीवर जाऊ शकतो. जन्मापासून माणसं अगदी सहज प्रवृत्तीनुसार मत्सर करीत असतात. आईला दुसरं मूल होताच पहिलं मूल आईच्या प्रेमाचा सगळा वाटा आता सर्वस्वी आपल्याला मिळणार नाही म्हणून धाकट्या भावंडाचा मत्सर करतं. भावंडांत एकाचं कौतुक अधिक झालं की, दुसरं त्याचा हेवा करतं. शाळेत सामान्य दर्जाचा विद्यार्थी हुषार विद्यार्थ्यांचा मत्सर करतो. एक कलावंत दुसऱ्या लोकप्रिय कलावंतावर, एक व्यापारी दुसऱ्या यशस्वी व्यापाऱ्यावर, एक सत्ताधीश दुसऱ्या बलवंत सत्ताधीशावर सतत जळत असतो. हुषारीचा, सौंदर्याचा, गुणवत्तेचा, उत्कर्षाचा, यशाचा ह्या जगात नित्य हेवा केला जातो. मनुष्यस्वभावाची आणखी एक गमंत अशी की तो नुसत्या सुखाचाच नव्हे तर दुःखाचाही मत्सर करतो. ‘ माझं डोकं दुखतंय ’ असं तुम्ही एखाद्याला म्हणून पहा, की ‘ माझंही डोकं दुखतंय ’ असं तुम्हांला यत्किंचितही सहानुभूती न

दर्शविता त्यानं म्हटलंच म्हणून समजा. सुख काय किंवा दुःख काय, सदैव मत्सराच्याच आधीन गेलेल्याला सारखंच खुपतं. आणि म्हणूनच बक्षीस एकालाच मिळतं, पण बक्षीस न मिळालेले अनेकजण जेव्हा कौतुकानं टाळ्या पिटतात तेव्हा मला माणसानं मत्सरावर मिळविलेल्या विजयाचाच महान साक्षात्कार होतो.

०

## त्र्याहत्तर

रस्ते उकरण्याचं काम चाललंय. ते बाराही महिने चाललेलं असतं म्हणा. मातीचे उंचच उंच ढिगारे उपसून ठेवले आहेत. रस्त्यावर छोट्या छोट्या मातीच्या टेकड्याच निर्माण झाल्या आहेत.
त्या मातीकडे माझं लक्ष जातं आणि एक गंमत माझ्या लक्षात येते. रस्त्याच्या खालून उपसून काढलेली ही साधी माती नसून ती समुद्रकिनाऱ्यावर असते ती बारीक रेती आहे. आणि मग एकदम लक्षात येतं की पूर्वी हा भूभाग म्हणजे समुद्रकिनारा असला पाहिजे. समुद्र मागे हटवून ही जमीन कोरडी केली असावी आणि त्या नंतरच इथं रस्ता आणि इमारतीची योजना अमलात आणली असावी. म्हणजे कमाल आहे ! ज्या रस्त्यावरून आपण रोज येतो आणि जातो त्या रस्त्याखाली एक समुद्रकिनारा गाडला गेला आहे, आणि आपल्याला ते ठाऊकही नाही. खरोखर आपल्या पायाखाली काय दडवलं गेलं आहे ह्याची आपल्याला कल्पना तरी असते का ? आपल्या पायाखालचा रस्ता तेवढा आपल्याला दिसत असतो. अर्थात तोही कधी कधी नीटसा दिसत नाही म्हणा ! पण त्या रस्त्याखाली पृथ्वीच्या पोटात काय आहे हे आपल्याला कधी कळूच शकत नाही. आपल्या पायाखाली आग आहे की पाणी आहे, राख आहे की माती आहे हे न कळताच आपण आपले चालत असतो.... चालतच राहतो. पण आपल्याला ते माहीत नाही हेच एका अर्थी बरं आहे, नाही तर आपण एवढ्या निर्धोकपणे ह्या पृथ्वीच्या पाठीवर वावरू शकलो असतो का ? आपल्या पायाखाली जिवंत लाव्हा रस धगधगत आहे हे आपल्याला दिसू शकत नाही हे ह्या मातीचे आपल्यावर फार मोठे उपकार आहेत. फार कशाला ज्या पृथ्वीवर आपण वावरत आहोत ती अंतराळात अधांतरी आहे आणि सारखी फिरते आहे हे आपल्याला जाणवत नाही हे सुद्धा केवढे उपकारच आहेत. ते आपल्या देहाला जाणवलं असतं तर आपण जगताना क्षणोक्षणी भ्यालो असतो. दचकलो असतो. असे किती किती उपकार डोक्यावर घेऊन आपण ह्या पृथ्वीवर

वावरतो आहोत. आणि उपकरकर्ता मात्र दिसत नाही, सापडत नाही आणि माहीतही नाही.

## चौऱ्याहत्तर

कडडम् कडाम्....कडडम् कडाम्....ढोलकं वाजतंय. कसं तरी विचित्रच वाजतंय. ढोलकं बडवणारा ते असं काही बडवतोय की ऐकणाऱ्याला वाटावं कुणी आपली छाती बडवून आक्रोश करीत चाललंय. आणि वस्तुस्थिती तशीच आहे. रस्त्यावरून प्रेतयात्रा चाललीय. कुणा गरीब, अडाणी जमातीत मयत झालंय. हातगाडीवर प्रेत घालून गाडी ढकलीत स्मशानाकडे चालवलीय. प्रेत कुणा नुकतंच लग्न झालेल्या तरुणाचं असावं. कारण गाडीच्या मागून त्याच्या नूतन परिणीत पत्नीला मुंडावळ्या बांधून नेण्यात येत आहे. ती रडत रडत मान खाली घालून जड पावलांनी गाडीबरोबर फरफटत चाललीय. प्रेताबरोबर स्त्री-पुरुषांचा मोठा जमाव चाललाय. अत्यंत दरिद्री माणसं आहेत सारी. सगळ्यांच्याच अंगावरचे कपडे फाटके-तुटके आणि मळके आहेत. साऱ्यांच्या चेहऱ्यावर एक मूढ भाव आहे. सगळ्यांच्या मुद्रेवर शून्यपणाची आणि हताशपणाची कृष्णछाया पसरली आहे. गाडीवरल्या प्रेतासारखेच सगळ्यांचे चेहरे भकास आहेत. जणू ह्या जमावातील प्रत्येकाचीच ही प्रेतयात्रा आहे. ह्या प्रेतयात्रेत शांतपणा नाही, धीरगंभीरता नाही. आहे ते फक्त जीवनाविषयीचं संपूर्ण अज्ञान. आणि हीच कशाला, अशा किती तरी प्रेतयात्रा मी पाहिल्या आहेत, ज्यांच्यात सामील झालेली माणसं जणू दोरीनं खेचून नेल्यासारखी अगतिकपणे जातात. त्यांच्या चेहऱ्यावरले ते मूढ भाव मनाला खरोखर विषण्ण करतात. अशीच मूढता मी एकदा एका देवळातल्या गर्दीच्या चेहेऱ्यावर पाहिली होती. समोरच्या मूर्तीकडे पाहताना माणसांच्या चेहऱ्यावर कसलाही आनंद उचंबळून आलेला दिसत नव्हता. देवाच्या दर्शनामुळे त्यांना कसलीच मनःशांती लाभलेली दिसत नव्हती. त्यांच्या चेहऱ्यावर होता फक्त दुःखाचा काळोख एक निर्जीव भकासपणा. सगळ्या अवयवांतून पसरलं होतं एक शैथिल्य आणि दुर्बलता. अज्ञान हे मृत्यूलाच काय पण ईश्वराला सुद्धा धैर्यानं सामोरं जाऊ शकत नाही. ईश्वरामधला ईश्वरही त्याला दिसत नाही मग तो मृत्यूतून कसा प्रतीत होणार ?

## पंचाहत्तर

अंधार बराच पडला होता. आमची मोटर घाटातून खाली उतरत होती. घाट अवघड होता. ब्रेक चांगला ताब्यात ठेवून आणि नजर घाटाच्या वळणाकडे पक्की रोखून ड्रायव्हर काळजीपूर्वक गाडी खाली उतरवीत होता. तेवढ्यात एका वळणावरून एक प्रचंड लॉरी वेगानं पुढं दौडत येताना दिसली. तिचा भयकारी घुंकारनाद वातावरणाला कापीत कानात घुसला. ड्रायव्हरनं आमच्या गाडीचा वेग एकदम मंद केला. समोरची गाडी इतक्या वेगानं वर चढत होती की एखादं क्रूर श्वापद डरकाळ्या फोडीत अंगावर चाल करून यावं असाच भास क्षणभर झाला. तोच आणखी एक अकल्पित घटना घडली. दुसरी एक प्रवासी फियाट गाडी ह्या लॉरीच्या मागून वेगानं आली आणि डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोच त्या लॉरीला 'ओव्हरटेक' करून लॉरीच्या उजव्या बाजूनं एकदम पुढं आली. आमची गाडी आता त्या लॉरीच्या अगदी नाजिक आली होती. इतकी की आमची गाडी आणि ती लॉरी ह्यांच्यामधून फक्त ती फियाट गाडी घुसून पुढं जाऊ शकेल इतकंच अंतर बाकी उरलं होतं. बरं, त्या फियाट गाडीनं आपण पुढं येत असल्याची कुठलीही सूचना हॉर्न वाजवून दिली नव्हती. रों रों करीत वेगानं ती गाडी लॉरीला मागं टाकून पुढं घुसली आणि मधल्या फटीतून सुळकन घुसून आमच्या गाडीच्या उजव्या हातानं घाटावर चढून गेली सुद्धा. इतक्या वेगानं ही घटना घडली की ती गाडी निघून गेल्यावर ती गाडी निघून गेल्याची जाणीव झाली. क्षणभर मनात आलं, जर का आमची गाडी आणि ती लॉरी ह्यांच्यामध्ये आहे ह्यापेक्षा थोडं जरी अंतर कमी असतं तर...काय घडू शकलं असतं ह्याची कल्पनाच करवत नाही. कारण डाव्या बाजूला खोल दरी आ वासून पसरली होती. आणि मग वाटलं आयुष्यात जितके अपघात होत आहेत त्याहून शतपटीनं अधिक अपघातांच्या शक्यताही आहेत. हे होऊ शकणारे अपघात होत नाहीत म्हणूनच जग शिल्लक आहे. आपण समजतो त्यापेक्षा किती तरी पटीनं आपण नशीबवान आहोत. म्हणूनच अद्यापी आपण शिल्लक आहोत !

## शहात्तर

एवढ्या मोठ्या समारंभात त्याच्याकडे कुणाचेच लक्ष जात नव्हते. तो एका कोपऱ्यात उदासवाणा उभा होता. किती तरी तरुण मुले समारंभाला आली होती आणि आकर्षक तरुणींचे लक्ष आपल्याकडे वेधून घेत होती. पण त्याच्याकडे कुणाही तरुणीचे लक्ष जात नव्हते. उलट त्याला बघताच त्या तोंड फिरवून निघून जात होत्या. त्याचा खिन्न चेहरा पाहून त्याचा एक मित्र त्याच्याजवळ आला आणि म्हणाला, " क्युं मेरे दोस्त ! तुझे हुवा क्या है ? " त्याच्याकडे निरखून बघताच त्याच्या खिन्नतेचे कारण त्याच्या मित्राच्या लक्षात आले, तो म्हणाला, " आलं ध्यानात. अरे, त्यात काय ? तुझ्या केसांना तू चांगले वळण दिलेले नाही म्हणून तुझ्याकडे कुणाचं लक्ष जात नाही. येथून पुढे केसांची निगा राखण्यासाठी ×××× वापरीत जा. " आपल्या मित्राचा सल्ला मानून त्याने केसासाठी ×××× वापरावयास सुरुवात केली, तो काय आश्चर्य, जेथे जेथे तो जाईल तेथे तेथे तो सुंदर तरुणींचे आकर्षणकेंद्र होऊ लागला. ही वस्तुस्थिती आहे किंवा नाही हे माहीत नाही. ही आहे एका कंपनीची जाहिरात. जाहिरातवाले मोठे हुशार असतात. आपल्या मालाचा खप व्हावा म्हणून तुमच्या आयुष्यातली मोठमोठी दुःखं हरण करण्याची अभिवचनं देऊन आपला माल तुम्ही विकत घ्यावा ह्याकरिता नाना प्रकारे तुम्हांला गळ घालतात. आयुष्यात तुम्हांला यश का मिळत नाही, तर तुम्ही अमुक मिलच्या साड्या वापरीत नाही किंवा तमुक कंपनीचे बूट घालीत नाही. तुमच्यावर तुमची प्रेयसी प्रेम का करीत नाही, तर अमुक पेस्टने तुम्ही दात घाशीत नाही. तुम्हांला उत्साह वाटत नाही ना, मग खा अमुक कंपनीच्या गोळ्या किंवा प्या तमुक कंपनीचे औषध. तेवढ्यापुरते ठीक असतात हे सारे उपाय. सुंदर साडीनं कोण आकर्षक दिसणार नाही ? पण हे सारं यश तेवढ्या क्षणापुरतंच. यश आणि सुख इतक्या सहजी मिळत नाही आणि टिकतही नाही. दुःखावरचे हे सारे उपाय काही क्षणापुरतेच. दुःख कायमचं जाणारच नाही. मरेपर्यंत दुःख आणि असमाधान

असणारच, त्यावरचा खरा उपाय कोणत्याच कंपनीला अजून सापडलेला नाही ! पण आपणच दुःखावरचं लक्ष काढून घेऊ शकलो तर......

## सत्त्याहत्तर

काही काही वेळा निर्जीव वस्तू सुद्धा आपल्याशी बोलतात, आपल्याला खुणावतात आणि त्यांच्या (असलेल्या वा नसलेल्या) मनातली काही तरी शंका अचानक सांगून जातात. त्या दिवशी संध्याकाळी मला असाच एक विचित्र अनुभव आला. आमच्या दिवाणखान्यात कोपऱ्यावरल्या मेजावर एक काचेचं, हिरव्यागार रंगाचं, उंच नळकांड्याच्या आकाराचं, अतिशय नाजुक असं एक पुष्पपात्र ठेवलेलं असायचं. मोठ्या हौसेनं ते मी दिवाणखान्यातल्या शोभेखातर विकत आणलेलं होतं. त्यात पाणी भरून एक पाणवेलीची मोठी फांदी मी त्या पाण्यात सोडून दिली होती. शीतल हिरव्या रंगाच्या पुष्पपात्रात ती टवटवीत हिरव्यागार रंगाच्या डौलदार पानांची डुलणारी वेल मोठी शोभून दिसायची. वाऱ्याची झुळुक आली की ती शहारून किंचित् यत्किंचित थरथरायची. संध्याकाळची मंद तांबुस सोनेरी किरणं गवाक्षातून आत पसरली की त्या दिव्य प्रकाशात ते काचेचं हिरवं पुष्पपात्र लखलख करून चमकायचं आणि स्वप्नामधल्या पाचूच्या राजवाड्यासारखं भासायचं. संध्याकाळच्या वेळी त्या पुष्पपात्रातून प्रतीत होणारं एक आगळंच मनोहारित्व मी किती वेळा तरी मनसोक्त न्याहाळून पाह्यलं होतं. त्या दिवशी संध्याकाळी मावळत्या सोनेरी किरणांच्या स्पर्शानं त्या पुष्पपात्रावर खुललेली झळाळी डोळे भरून पाहताना एकाएकी ते पुष्पपात्र खिन्न झाल्याचा भास झाला. मला ते कसं तरीच काळंकुट्ट भासलं. टक लावून जणू ते माझ्याकडे पहात असल्यासारखं दिसलं. काकुळतीला येऊन जणू ते मला म्हणत होतं, "मला इथून उचल. मला सुरक्षित स्थळी ठेव." मी एकदम थबकले. दुसरीकडे कुठं ठेवावं म्हणजे ते शोभिवंत दिसेल आणि संध्याकाळच्या सोनेरी किरणांनी असं उजळून निघेल ह्याचा मी खूप विचार केला. दिवाणखान्यात इकडे तिकडे नजर फेकली. पण दुसरी कुठलीच जागा मला ह्या जागेइतकी चांगली वाटेना. मला उगीचच भास झाला असावा असं समजून मी बाहेरच्या ओसरीवर आले. फिरून मनात

तोच विचार आला. फिरून दिवाणखान्यात आले. पुष्पपात्र उदास दिसत होतं. त्याच्यावरचे सोनेरी किरण आता सरकत सरकत निघून गेले होते आणि त्याच्या पोटातून निव्वळ काळोख भरला होता.
मी फिरून ओसरीवर आले. असं काय आज आपल्याला भासतंय हेच मला समजेना. घराला लागून असलेल्या मोकळ्या जागेत लहान मुलं क्रिकेट खेळत होती, त्या खेळातच मन रमवण्याचा मी प्रयत्न केला. क्रिकेटचा चेंडू वेगानं उडत होता, घराच्या भिंतीवर आपटत होता. माझ्या डोक्यात एकदम प्रकाश पडला. पुष्पपात्र मला ' इथून उचल ' असं केविलवाण्या मुद्रेनं का सांगत होतं ते एकदम उमगलं.
मी ते उचलण्यासाठी झरकन आत वळते न वळते तोच क्रिकेटचा चेंडू वेगानं खिडकीतून आत आला, त्या पुष्पपात्रावर आदळला आणि त्या सुंदर हिरव्यागार पुष्पपात्राचा क्षणार्धात चक्काचूर झाला.
काचेचे हिरवेगार तुकडे दिवाणखान्यात इतस्ततः विखुरले गेले आणि ' मला उचल, मला उचल ' हा एकच आक्रोश माझ्या कानात घुमत राहिला.

## अठ्याहत्तर

बघता बघता एकदम मारामारीला सुरुवात झाली. दुपारची वेळ. मी बिछान्यावर पडले होते. बाहेर रस्ते शांत होते. कुठे तरी एक कावळा करकरत होता इतकचं. रस्त्यावरनं कुणी तरी बोलतबोलत आले आणि नेमके आमच्या घरासमोर येऊन थडकले. मी बिछान्यावर पडल्या पडल्या ऐकत होते. कुणी तरी तरुण मुलं एकमेकांना काही तरी सांगत होती. हळूहळू बोलण्याचा सूर एकाएकी बदलत गेला. क्रमाक्रमानं सर्वांचेच आवाज उंचउंच चढत गेले. शब्दावर शब्द, वाक्यावर वाक्यं वेगानं आदळू लागली आणि. एकदम शिव्यागाळीला नि गुद्दागुद्दीला सुरुवात झाली. मी बिछान्यावरून ताडकन उठून खिडकीपाशी आले आणि बाहेर बघू लागले. दोन हडकुळे तरुण माना ताठ करून, छात्या पुढे काढून, अस्तन्या मागे सारून, समोरासमोर आक्रमक पवित्रे घेऊनच एकमेकांच्या डोळ्यांना डोळे भिडवून उभे होते. त्यांच्या डोळ्यांतून खून तळपळत होता. करकरा दात चावीत एकमेकांना खाऊ की गिळू करीत त्यांनी उसळून जी मुसंडी मारली ती एकमेकांचे गळे पकडण्याकरिताच. त्यातल्या एकाने दुसऱ्याला हिसडून दूर झटकले, तोच तो पुन्हा उसळी घेऊन त्याच्या अंगाशी येऊन भिडला, मग काय ठोशावर ठोशे, गुद्द्यावर गुद्दे. एकदा एक दुसऱ्याला रस्त्यावर आडवा पाडी तर एकदा दुसरा पहिल्याला उचलून दूर भिरकावून देईन. त्यात शिव्यांचा अखंड वर्षाव चालूच होता. मारामारीचा आवेग वाढतच होता. जशी दोन हिंस्र जनावरं परस्परांच्या नरडीचा घोट घेण्याकरिता जबडे वासून झुंजत होती, झगडत होती. रक्ताची भूक लागून दोन लांडगे जणू एकमेकांना कचाकच कडकडून चावत होते. एकमेकांच्या शरीरावर त्यांनी जो क्रूर अत्याचार चालवला होता तो बघवत नव्हता. भोवताली तुफान गर्दी जमली होती. मारामारी अगदी निकराला येऊन पोचली होती. शेवटी त्यातला एक तरुण थकून मातीवर धाडकन पडला आणि दुसरा त्याच्या नाकाडावर धाडधाड लाथा हाणून त्याला बीभत्स शिव्या

घालीत चालता झाला. अलीकडे अशा मारामाऱ्यांची दृश्ये रस्त्यावर रोजच दिसतात. कशा ना कशाचा तरी साठलेला संताप एकाएकी क्षुद्र करणावरून भडका घेतो आणि माणसामाणसांमध्ये आग लावून जातो. बघ्ये नुसते जमतात, सारा अनाचार उघड्या डोळ्यांनी पहातात आणि तमाशा संपला की, आपापल्या रस्त्याने चालायला लागतात. एखादा सहन न होऊन मध्ये घुसतो तो तोच त्या आगीत बळी पडतो. मारामारी काही सगळा समाज करीत नाही, शंभरातले दोघेच आग लावतात. पण दुःख ह्याचं वाटत नाही, दुःख वाटतं ते ह्याचं की शंभरातले इतर अठ्ठ्याण्णव ती मारामारी नुसती बघतात, पण थांबवू शकत नाहीत.

## एकुणऐंशी

खूप दिवसांपासून तिला पहावंसं वाटत होतं. तिचं लिखाण अतिशय आवडायचं मला आणि त्यामुळे तिच्याबद्दल मनात एक सुप्त आकर्षण निर्माण झालं होतं. तिला भेटावं, तिला बघावं, तिच्याशी खूप गप्पा माराव्यात, फार काय तिची आणि माझी मैत्री देखील जमावी असं सारखं वाटायचं; पण तिची साधी ओळख सुद्धा नव्हती. मग हे कसं जमावं; पण गमत अशी की काही कामानिमित्त तिच्याकडे जाण्याचा एकदा अचानक योग आला. तिला भेटायचं ह्या नुसत्या कल्पनेनेचे मला इतका आनंद झाला, इतका आनंद झाला की, काही सांगायची सोय नाही. टेलिफोनवरून भेटीचा दिवस आणि वेळ ठरली तोपर्यंत मला धीर निघेना. शेवटी उजाडला एकदाचा तो दिवस. सकाळपासून ‘ तिला आज भेटायचंय ’ हा एकच विचार मनात घोळत होता. मनातून एक सुप्त अहंकार सुखवीत होता की तीही ह्या भेटीकरिता अशीच उत्सुक होऊन माझी वाट पहात बसली असेल. नीटनेटके कपडे करून, हातात जुईचा सुंदर गजरा तिला देण्यासाठी म्हणून घेऊन मी तिच्याकडे पोचले. तिच्याशी काय वाक्यं बोलावी ह्याची जुळवाजुळव करीतच दारावरची घंटा वाजवली. बराच वेळ झाला कुणीच दार उघडायला आलं नाही. मी पुन्हा घंटा वाजवली. आतून कुणी तरी रागारागानं बडबडत दार उघडायला आले. दार उघडलं. गेलं. तर समोर तीच उभी होती. ‘ या ’ रुक्ष कोरड्या आवाजात माझं स्वागत झालं. कपडे मळके, केस विस्कटलेले, हातात उघडं पेन तसंच धरलेलं, चेहरा त्रासिक अशी ती मला सामोरी आली. जणू माझं येणं तिला नको होतं. ती कुठल्या तरी महत्त्वाच्या कामातून नाइलाजाने उठून आली होती. मी दिलेली वेणी तिनं तशीच बाजूच्या टेबलावर तिचा नुसता वासही न घेता ठेवून दिली. तशी बोलली, बराच वेळ. चहाचिवडा आणि केळीही दिली. पण बोलताना तिनं मला माझ्याबद्दल एकही प्रश्न विचारला नाही! तिच्याकडून मी परत निघाले ती सगळा आत्मविश्वास गमावून, हताश मनःस्थितीतच, ह्या

जगात आपल्याला काहीच किंमत नाही असा सल सारखा खुपत होता. त्यानंतर बऱ्याच दिवसांनी एका ज्येष्ठ कलासमीक्षकाला भेटावयास जाण्याचा योग आला. मी भीत भीतच त्यांच्याकडे गेले. गरज मलाच होती. मीच त्यांच्याकडे लेख मागितला होता. त्यातून ते वयाने बरेच मोठे. शिवाय सुविख्यात. मला त्यांना खूप भेटावंसं वाटत होतं, पण त्यांना... कुणास ठाऊक! मी दारापर्यंत जाऊन पोचले तो दार उघडं ठेवून, समोरच्या खुर्चीवर ते स्वच्छ परीटघडीचे कपडे घालून माझीच वाट पहात बसले होते. मला पोहोचायला थोडा उशीर झाला होता. मला पाहताच ते जागचे उठून माझं स्वागत करण्याकरिता पुढं धावले. 'या, या, या,' किती वेळ तरी ते म्हणत राहिले. मी खुर्चीवर बसले तो समोरच्या टेबलावरची उदबत्ती प्रसन्नपणे जळत होती. जणू माझ्या स्वागतासाठीच पेटवून ठेवली होती. मी त्यांच्या समोरच्या खुर्चीवर भीत भीतच बसले. त्या वेळी त्यांनी माझ्याकडे इतक्या कौतुकानं आणि वात्सल्यानं बघितलं की मला वाटलं मी खूप खूप उंच आहे... अगदी आभाळाएवढी—

# ऐंशी

ऊन झपाट्यानं उतरू लागतं आणि सृष्टीला काळोख वेढू लागतो. ती वेळ मोठी चमत्कारिक असते. ह्या वेळी सूर्य मावळून गेलेला असतो. पश्चिमेवर काही वेळापूर्वी चढलेले रागरंग आता झपाट्याने काळवंडू लागलेले असतात. अवकाशात रेंगाळणारा संधिप्रकाश आता विरून चाललेला असतो. एकाएकी वारा थबकतो. झाडावरची पानं सळसळायची थांबतात. पक्षी मुके होतात. सारी सृष्टी स्तब्ध, अबोल, उदास आणि अंतर्मुख झाल्यासारखी भासते. ही वेळ असते काही काही नसण्याची. आपल्या अंतरंगातल्या एका विशाल पोकळीचा साक्षात्कार होण्याची. अशा वेळी हात आपोआप प्रार्थनेसाठी जोडले जातात. अशा वेळी शब्द सारे गळून पडतात. देहामधल्या कणाकणांतून शांततेचा गूढगंभीर काळाभोर प्रवाह पसरत जातो आणि साऱ्या देहाला व्यापून, व्याकळून टाकतो. ह्या वेळी अंतरंगात आर्तता तरळत असते, पण आपण कष्टी नसतो. कुणी तरी मला अलीकडे म्हणाले होते, " त्या संध्याकाळच्या वेळेची मला फार भीती वाटते. मला फार एकटं एकटं वाटतं अशा वेळी. " त्या व्यक्तीला नेमक्या ह्याच वेळी झपाटून टाकणारी हताशपणाची भावना मी समजू शकले, पण मला त्या व्यक्तीची कीवही आली. कारण ह्या एकटेपणातली भव्यता आणि उदात्तता ती समजू शकत नाही, नव्हे ती जाणून घेण्याचं तिला भयच वाटतं. ह्या वेळी माणसाला असहाय्य वाटलं तरी ह्या असहाय्यपणाला भ्यायचं नसतं. एकदा ह्या एकाकीपणाचा स्वीकार करायला आपण शिकलो म्हणजे मग समजतं की, संध्याकाळी हमखास जाणवणारा हा एकाकीपणाच आपणाला अतिशय नम्र करतो, आपल्याहून विशाल अशा एका श्रेष्ठ अस्तित्वामध्ये प्रवेश करायला शिकतो. पण आपण भय सोडून द्यायला हवं. आपण एकाकीपणापासून दूर पळण्याचा प्रयत्न सोडून द्यायला हवा. कारण हा एकाकीपणाच आपली अखंड साथ करीत आला आहे, करणार आहे. ह्या जगात आपण आलो ते एकटेच अन् जाणारही एकटेच नाही का? प्रत्येक संध्याकाळ तेच

सांगते, तेच शिकवते, ‘ एकाकी हो, एकटा हो, ह्या उदासीनतेशी एकरूप होऊन जा... ’

# एक्याऐंशी

सहज विश्रांती घेत पडले होते. नजर उगीचच समोरच्या भिंतीवर रेंगाळत होती. कपाटाच्या नि भिंतीच्या मधल्या फटीत काळोख होता. मी अशीच आपली भिंतीकडे बघते आहे तोच त्या फटीतून एका पालीनं बाहेर डोकं काढलं. आणि पटकन भिंतीवरून ती पुढं आली. मी एकदम दचकले. मी तिच्याकडे बघत होते. नि ती माझ्याकडे बघत होती. आणखी पुढं यायला ती धजावत नव्हती, उठून तिला 'शूत्' करायला माझंही मन धजावत नव्हतं. ती तशीच भिंतीला चिकटून गप्प होती आणि मी ती आता काय करणार आहे हा विचार करीत तिच्याकडे बघत पडले होते. मनात विचार आला ही टीचभर पाल, ही मला काय करणार आहे ? मी तिला भिते तशी तीही मला भीत असेल. लहानपणापासून आपण निरनिराळ्या जीवजिवाणूंना फक्त भ्यायला शिकलोय. दिसली पाल मार किंकाळी, पाहिला उंदीर घे उंच उडी, आलं झुरळ धूम ठोक, चावली मुंगी जा पिसाळून. ह्या इवल्या इवल्या क्षुद्र कीटकांनाही परमेश्वरानं बारकी बारकी दुधारी हत्यारं देऊन ठेवली आहेत आणि त्यांना आपण सतत भीत असतो. किंबहुना फक्त भयाच्या दृष्टिकोणातूनच त्यांच्याकडे बघत असतो. परवा एकदा हिरवळीवर एक लहानगा सरडा मजेत ऊन खात बसला होता. त्याची ती उन्हात बसण्याची ऐटच मी तर थक्क होऊन बघतच राहिले. उगीचच वाटलं की पुढं व्हावं आणि त्याच्या पाठीवरून हात फिरवावा आणि त्याचं कौतुक करावं. पण त्याच्या पाठीवरचे सराटे पाहून हात काही पुढं झाला नाही. महान् संतांनी वाघ-सिंहसुद्धा माणसाळवले आणि आपण मात्र मुंग्या-पालींना भीत जगतो. फक्त एकदाच मात्र मुंगीचं भय वाटलं नव्हतं. गावाबाहेरच्या एका प्रशस्त आमराईत आचार्यजींचं प्रवचन होतं. वातावरण शांत होतं. त्यांच्या मुखातून प्रेममय अमृतवाणी पाझरत होती. भोवतालची हवा प्रेमरसानं आर्द्र झाली होती. तेवढ्यात वरच्या फांदीवरून माझ्या मांडीवर एक लाल मुंगळा टपकला.

मोठ्या मजेत तो माझ्या अंगावरून फिरत होता. पण मी जराही हलले नाही. मनात म्हटलं, " बाबा, मुंगळ्या, मी जोवर चिडून तुला दूर ढकलत नाही, तोवर तू तरी कशाला मला चावशील? तुझ्यावर सुद्धा विश्वास ठेवायला हवा "—आणि खरंच, तो मुंगळा मला न चावता माझ्या अंगावर बागडून मातीत उतरून निघून गेला.

## ब्याऐंशी

बागेतून जाताना नीट लक्ष दिलं नाही म्हणा, किंवा स्वतःच्याच नादात होते म्हणा, कुंडीमध्ये फोफावून पसरलेल्या शोभेच्या निवडुंगाच्या फार जवळून गेले आणि त्याचा काटा हातावर सर्र्कन ओरखडा काढून गेला. ओरखड्यातून रक्तही आलं आणि जखमेची आग आग होऊ लागली. क्षणभर इतका राग आला, असं वाटलं हा निवडुंग उपटून फेकून द्यावा. वास्तविक ह्या जातीचा निवडुंग आपल्या बागेत असावा म्हणून मी किती शोधाशोध केली होती. आणि शेवटी मिळाला होता तो अगदी एका ओळखीच्या ठिकाणीच. त्यांनी हौसेनं लावलेल्या बागेतच आढळला होता. त्यांच्याकडून ह्या निवडुंगाचा एक लहानसा फणा मागून आणून मोठ्या आवडीने मी ह्या कुंडीत लावला होता. माझ्या बागेतल्या कुंडीत त्यानं चांगलं मूळ धरलं होतं आणि चहूबाजूंनी आपले काटेरी पंजे पसरून तो बेसुमार वाढत चालला होता. मोठा शोभून दिसत होता. बागेतल्या ज्या काही मोजक्या झाडांकडे बघून समाधान वाटायचं त्यातला तो एक होता. पण आज त्यानंच मला ओरखाडून रक्तबंबाळ केलं होतं. आधी आपणच काटेरी निवडुंग जमवायचे आणि मग जखमा झाल्या म्हणून त्या निवडुंगावर आपणच चिडायचं! त्याचा काय दोष? परमेश्वरानं त्याला आत्मसंरक्षणासाठी काटे दिलेत. त्याला काटे आहेत हे जाणून आपणच त्याच्याजवळून जपून जायला हवं. त्याला जवळ बाळगला तरी त्याच्यापासून आपण सांभाळूनच रहायला हवं. त्याला काटे आहेत हा दोष त्याचा नाही. दोष आपलाच आहे. कारण त्याला काटे आहेत हे माहीत असून आपणच आंधळ्याच्या चालीनं चालतो.

## त्र्याऐंशी

दवाखान्यातल्या बाकावर रुग्णांची गर्दी डॉक्टरांच्या बोलावण्याची वाट पहात बसली आहे. सकाळची वेळ आहे. खिडकीतून उन्हाचा लांबलचक पट्टा आत पसरला आहे. आणि खोली उजळून निघाली आहे. पण बाकावर बसलेल्या प्रत्येकाची तोंडं काळवंडलेली दिसताहेत. कोणी कण्हतयं, कुणी डोळे मिटून गप्प बसलंय. प्रत्येकाच्या व्यथा वेगवेगळ्या आहेत. पण प्रत्येकजण व्यथित आहे. एक मुसलमान स्त्री मांडीवर तान्हे मूल घेऊन बाकावर बसलीय आणि आपली दुखरी कमर दाबीत ' हाय हाय ' करीत आहे. पण तिच्या मांडीवरचं गोंडस गोरं बाळ मात्र सुखानं सुस्तावून गाढ झोपलंय. बेट्याची सकाळची न्याहरी नुकतीच झाली असावी बहुतेक. पोट तुडुंब भरलेलं दिसतंय. श्वासोच्छ्‌वास संथ चाललाय. अर्धोन्मीलित टपोऱ्या ओठांतून किंचितसं हसू ओघळलंय. सोनेरी जावळ आणि गुलाबी गाल उन्हात कसे गोजिरवाणे दिसताहेत. ते निष्पाप, मुग्ध टपोरं बाळ म्हणजे निष्कलंक, शुद्ध आणि पूर्णतया नैसर्गिक जीवनाचं सात्त्विकसं चित्रच भासतंय. त्याचा गुलाबी गोमटा चेहरा अजून दुःखानं डागळलेला नाही. शरीराचं यंत्र नेमलेल्या गतीनं संथपणे काम करतंय. त्या सबंध खोलीत तो एकच जीव खराखुरा सुखी आणि निर्भय वाटतोय. त्याच्याकडे पाहता पाहता असं वाटतंय ह्याचं की शुद्धत्वच तेवढं वाढावं. ह्याच्यातल्या स्वच्छ, सात्त्विक जीवनाचा काय तो विकास व्हावा. पण तसं कसं होईल ? उद्या हा वाढायला लागेल. त्याला इतर माणसांच्या विचाराचे धक्के बसतील, हा भिऊ लागेल, चिडू लागेल. कदाचित् ह्याचं आजचं सौंदर्य उद्यां बिघडून जाईल. भलतंसलतं अन्न आणि भलते सलते विचार ह्याच्या आहारानं ह्याचा देह आणि ह्याचं मन बेढब होत जाईल...नकोच याच्या भवितव्याचा विचार, ह्या जगात एकदा जीव फेकला गेला म्हणजे त्याचं पुढं काय होईल हे कसं कळावं ? त्यापेक्षा या क्षणी कोवळ्या उन्हात चमकणाऱ्या त्याच्या सतेज निरोगी चेहऱ्याकडे पोट भरून पहावं आणि त्याच्या शुद्ध

सौंदर्याच्या दर्शनानं आपले गढूळ डोळे आणि पापशंकी मन शुद्ध करून घ्यावं हेच बरं.

## चौऱ्याऐंशी

अलीकडेच कळलं की तो नोकरीचा राजीनामा देऊन एकाएकी बेपत्ताच झाला. घरातल्या माणसांना, मित्रमडळींना न सांगता. पण रीतसर निरोप ठेवून तो अचानक गुप्तच झाला. नाही तरी पहिल्यापासून तो काही तरी जगावेगळं करील असं त्याच्या लिखाणावरून वाटतच असे. त्याच्या लिखाणावर नेहमीच उदासीनतेच्या काळ्याभोर सावल्या तरंगत असायच्या. तो साऱ्या जगावरच रुष्ट झालेला होता. त्याला कुणाचंच काहीच पटत नसे. खूप खूप लिहायचा तो. पण सारं विषण्णतेनं माखलेलं. जगातलं दुःख पाहून तो शोकाकुल झालेला असायचा. स्वतःचं, आसपासच्या माणसांचं, नव्हे सगळ्या समाजाचंच दुःख त्याला असह्य झालं होतं. दुःख, दुःख, दुःख.... चोवीस तास तो दुःखाच्या विचारात आकंठ बुडालेला असायचा. दुःखाचं हलाहल प्राशून प्राशून त्याचं हृदय काळं ठिक्कर पडून गेलं होतं. कशाचं म्हणून काडीमात्र सुख त्यानं आपल्या जिवाला लावून घेतलं नाही. ह्या जगात मानवाची चाललेली क्षुद्र धडपड आणि मनुष्यजातीला आपल्या जीवनाच्या खऱ्या उद्दिष्टांचा पडत चाललेला विसर त्याला जाणवायचा आणि त्याचा आत्मा आतल्या आत तडफड तडफड करायचा. तो ह्या जगावर सदैव नाराज होता, रुसलेला होता. आपल्या कवितांतून, कथांतून त्यानं नेहमी दुःखाची चमत्कारिक चित्रं रेखाटली. पण ती कुणाच्या फारशी नजरेत भरलीच नाहीत. त्या दुःखामागची पूर्णतेची ओढ त्या काळोखामागचं प्रकाशाचं प्रेम कुणाच्या लक्षात आलं नाही. जग आपल्या मार्गानं चाललं होतं आणि ह्या जगासमोर मुद्दाम एखाद्या व्यासपीठावर उभं राहण्याचा आणि स्वतःकडे जगाचं लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न त्यानं कधी केलाच नाही. स्वतःच्या बाबतीत तो नेहमीच मुका आणि लाजाळू असायचा. त्या त्याच्या मुकेपणाचंच मला नेहमी भय वाटत आलं. वाटलं.... कधी तरी... कधी तरी.... काही तरी विचित्र घडणार ! आणि तसंच झालं. तो जगातून उठून अचानक गाढ

अंधारात लुप्त झाला. तो काळोखात गेलाय असं आम्हा सर्वांना वाटतंय. पण धगधगत्या प्रकाशाकडेच त्यानं उड्डाण केलं नसेल ना?

## पंचाऐंशी

खूप दिवस होऊन गेले ह्या घटनेला. संध्याकाळी मी काम आटोपून घरी परतले तोच आमची मोलकरीण सांगायला लागली, "बाई, आज दरयावर दुपारच्याला एका मुलाचं प्रेत लागलं. प्रेत फार फुगलं होतं. माशांनी पार कुरतडून काढलं होतं. आपल्या बाबाच्या शाळेमधलाच होता तो पोरगा." "कुठचा पोरगा?" मी घाबरून विचारलं. "असा जाडजूड, तांबडालाल पोरगा होता पहा. पण त्याचे हातपाय पार लुळे होते. खुरडत खुरडत चालायचा. आपल्या वाण्याच्या दुकानापाशीच रहायचा. मी सकाळी दुकानावर सामान आणायला जायची तेव्हा शाळेला निघायचा पहा. शाळेत पोचवायला गडी लागायचा त्याला. पार खुळचटागत दिसायचा. चालताना सारखी धाप लागायची त्याला. आज सकाळचा कपडे करून बाहेर पडला तेव्हा घरच्या मंडळींना वाटलं, गेला असेल शाळेला, पण दुपारच्याला प्रेत किनाऱ्याला लागलं. आणि बोंब झाली तेव्हा समजलं की त्यानं जीव दिला म्हणून." जीव दिला! माझं रक्त एकदम गोठून गेलं. बारा-तेरा वर्षांच्या एका कुरूप, वेड्यावाकड्या मुलानं जीव दिला! माझ्या डोळ्यांसमोर तो मुलगा एकदम उभा राहिला. मीही त्याला शाळेला जाता-येताना अनेकदा पाहिला होता. त्याच्या शारीरिक व्यंगामुळे तो कमालीचा बेढब आणि हास्यास्पद दिसत असे. शारीरिक क्लेशामुळे वेड्यावाकड्या झालेल्या त्याच्या चेहऱ्यावरचे बाल्य पार हरवून गेलेलं भासायचं. त्या वेडपट दिसणाऱ्या पोरानं जीव द्यायचा विचार तरी का आणि कसा केला? केवढं दुःख सोसलं असेल त्या एवढ्याशा जिवानं. कुणी त्याची फार चेष्टा केली असेल का? कुणी त्याला टोचून बोललं असेल का? की शरीराच्या वेदना त्यालाच फार असह्य होत गेल्या? की आपलं सारंच भवितव्य त्याला काळवंडल्यासारखं भासू लागलं? काय घडलं, कुणास ठाऊक. पण एक बारा वर्षांचा खुळचट मुलगा सरळ उठतो आणि समुद्रात उडी घेतो म्हणजे काय! त्याच्या दुःखद शेवटाबद्दल अश्रू ढाळावेत की त्याच्या निधड्या छातीचं

कौतुक करावं ? पण उपयोग काय ? हे अश्रू वा कौतुक त्याला जिवंतपणी लाभलं असतं तर त्यानं जीवच कशाला दिला असता ?

## शहाऐंशी

हवेतील थंडी थोडीशी वाढली आहे. सकाळची वेळ आहे. रात्रभर थंडीनं कुडकुडलेली झाडं सकाळच्या कोवळ्या उन्हानं किंचितशी तरारली आहेत. तरी त्यांच्या अवतीभोवती त्यांच्या फांद्याफांद्यांतून धुकं अजून तरळतंय. पिवळी पडू लागलेली पानं जरासा वारा येताच टपकून खाली पडताहेत आणि रस्त्याच्या कडेला पाचोळ्यावर पाचोळा साठतोय. कुणी तरी झाडत येतं आणि सारा कचरा पार वाहून नेतं. नवी पानं फुटायला वेळ आहे. पण जुनी पानं भराभर गळताहेत. हवेतला गारठा वाढतोच आहे. सकाळची वेळ आहे. समुद्रावर सहलीला निघालेल्या कोवळ्या वयातल्या हसऱ्या किशोरी खिदळत खिदळत रस्त्यावरून पळत चालल्या आहेत. त्यांचे कोवळे तांबुस चेहरे थंडीनं अधिकच लालेलाल दिसताहेत. त्यांच्या सोनेरी मऊ केसांच्या बटा वाऱ्यावर तरंगताहेत. त्यांचे हसरे तांडे जणू वाऱ्याच्या लाटांवर तरळत तरळत विशाल समुद्राच्या विस्तीर्ण किनाऱ्याकडे चालले आहेत. त्या सारख्या हसताहेत, धावताहेत, खिदळताहेत, पळताहेत, नाचताहेत, बागडताहेत, हजारो कळ्या पाकळ्या उमलण्याची वाट पहात उत्सुकतेनं उन्हात नहात बसाव्यात तसे त्यांचे प्रफुल्लित समुदाय दिसताहेत. आजूबाजूच्या झाडांवरची पिकलेली पानं त्यांच्या खांद्यांवर, केसांवर पडतात तेव्हा त्या पिकल्या पानांना त्या मुली सहज भिरकावून देतात. झाडावर आणि झाडाखाली नवीन हिरवे अंकुर जसे उमालताहेत...उमलताहेत. पिवळी पानं गळून पडताहेत... नवी फुटताहेत...

## सच्याऐंशी

फुलपाखरांचे ताटवे किंवा फुलपाखरांचे पीक तुम्ही पाहिलंय का ? थंडीचे दिवस संपत आले की, खंडाळ्याच्या डोंगरात फुलपाखरांचं असं काही अमाप पीक येतं की काही विचारू नका. गवताचं रान पहाटेच्या दवात चिंब भिजलेलं असतं. पहाटेचं उठून पहावं तर सारं काही चिडीचूप असतं. फक्त पहाटेच्या थंडगार वाऱ्याच्या लहरींनी गवत ईषत्‌मात्र थरथरत असतं. फक्त झाडाझुडपांतून गप्प पडलेल्या पाखरांची किलबिल तेवढी ऐकायला येते. हळूहळू सूर्य डोंगराआडून डोकावतो आणि मृदुल अंजिरी प्रकाशाचा कोवळा थर रानावर पसरतो. गवतांच्या पात्यांआड नाजुकशी खुसमुस सुरू होते. परंतु दिसत मात्र काही नाही. काहीसुद्धा नाही. मग उन्हाचं तेज हळूहळू वाढायला लागतं. साऱ्या सृष्टीत लख्ख सोनेरी ऊन भरभरून सांडू लागतं आणि एकाएकी कुणी तरी भसदिशी मूठ मूठ हळद हवेत उधळून द्यावी तसे फुलपाखरांचे थवे गवतांतून उसळून बाहेर उधळतात. नखाएवढी पिवळी पिवळी शेकडो फुलपाखरं पात्यापात्यावर नाचू लागतात. काही नुसतीच पिवळी असतात. काहींच्या पंखांवर काळी कड असते. काहींच्या पंखांवर काळी नक्षी चितारलेली असते. काही केशरी असतात, तर काही मातकट तपकिरी असतात. काही हिरवट, काही निळी-जांभळी तर काही अगदी काळीभोर. काहींच्या पंखांवर तर तऱ्हेतऱ्हेचे रंग ठिपक्या-ठिपक्यांनी पसरलेले असतात. काही इवली इवली तर काही चांगली तळहाताएवढी मोठी. अनंत रंगांची, अनंत आकारांची ही चंचल, चपळ, भित्री आणि वावरी फुलपाखरं साऱ्या रानावर आणि सारी दुपार बागडत असतात. चिमटीत नुसती दाबली तर मोडून पडतील इतकी नाजुक, पण सबंध रानावर आपलंच राज्य असल्याच्या दिमाखात दिवसभर मिरवतात. संध्याकाळ झाली की, त्यांचे थवे पुन्हा गवतामध्ये हरवून जातात. ते रात्रभर मुळीच दिसत नाहीत. त्यांच्यामागे किती धावा, पण ती कुठून येतात नि ती कुठं जातात ह्याचा पत्ता म्हणून लागत नाही, पण

दुपारच्या उन्हात ती आपल्या अस्तित्वाचा पूर्ण आनंद लुटतात. अवघं एका हंगामाचं आयुष्य. पण उन्हात बागडत, फुलांतला मध चोखत इतकं स्वच्छ आणि सुंदर जीवन जगतात अगदी जन्मल्यापासून तो नष्ट होईपर्यंत.

०

## अठ्ठ्याऐंशी

आजचा दिवस छान आहे ! हवा तितकाच थंड, हवा तितकाच उबदार. हवेत थंडी आहे, पण असायला हवी तितकीच आणि उन्हाची ऊबही आवश्यक तेवढीच आहे. त्यामुळे सगळ्या शरीराला उत्तेजित वाटतंय. रक्ताच्या कणाकणांतून उत्साह उसळतोय. धावावंसं वाटतंय, उधळावंसं वाटतंय. हसावंसं वाटतंय. खिदळावंसं वाटतंय. खूप खूप काही तरी करावंसं वाटतंय. वाटतं, की एखाद्या चांगल्या कार्याचा आरंभ आज व्हावा. आजची हवाच तशी आहे. सुखदायक आणि कर्तृत्वाला आव्हान देणारी. आपल्यापाशी एक शरीर आहे, त्यात जिवंत चैतन्य भरलेलं आहे आणि आपण मनात आणू ते करायचं सामर्थ्य त्या शरीरात आहे असं वाटायला लावणारा हा दिवस आहे. रस्त्यावरून माणसंसुद्धा चाललीयत ती कशी जोषात. सगळ्यांच्या चेहऱ्यावर ह्या हवेनं आरक्त छटा आली आहे. रस्त्यावरती ऊन खात बसलेला एक भिकारीसुद्धा कसा मजेत हसतोय. एक म्हातारा हमाल पाठीवरचं जड ओझं अलगद उचलून धावत सुटलाय. चार-पाच कुणबिणींचं टोळकं एकमेकींच्या अंगावर चापट्या मारीत कसल्याशा गमती एकमेकींना सांगून पोट धरधरून हसताहेत. नेहमी उग्र दिसणाऱ्या पोलीसदादाच्या ओठावरसुद्धा गाड्यांना ' पुढं जा ' अशी खूण करताना गोडसं हसू उमटतंय. आज माणसांच्या जगात कुठेच द्वेष दिसत नाही. संतापाची तर इतकीशी सुद्धा निशाणी दिसत नाही. आजची हवा मस्त आहे. वाटतंय की अशी हवा जेव्हा पहिल्यांदा पृथ्वीवर पसरली असेल त्याच दिवशी माणसातला माणूस प्रथम जागा झाला असेल !

## एकुणनव्वद

हळूहळू चढणीचा रस्ता आक्रमीत आम्ही पठारावर येऊन पोचलो, तो नजर पोचणार नाही इतक्या दूरपर्यंत पठाराचा विस्तार पसरलेला दृष्टीस पडला. केव्हा ना केव्हा तरी पृथ्वीवरच्या घडामोडींमध्ये एखादं विस्तीर्ण माळरान वर उचललं गेलं असावं आणि हे पठार तयार झालं असावं. त्यालाही केव्हा ना केव्हा तरी तडे गेले असावेत आणि मधल्या दऱ्या आणि पलीकडच्या असंख्य टेकड्या बनल्या गेल्या असाव्यात. हे पठार म्हणजे खरोखर एक आश्चर्य होय. डोंगराच्या माथ्यावर इतकं सुरेख, सखल मैदान क्वचितच पहावयाला सापडेल. आम्ही अंगात वारं भरल्यासारखं पठार तुडवीत चालू लागलो. सबंध पठारावर फक्त गवत उगवलं असेल तेवढंच. बाकी काहीही वनस्पती पहायला सापडत नव्हती. पठारावरच गवत बेभानपणे तुडवीत अंगावर चालून येणाऱ्या थंडगार वाऱ्याची मौज लुटीत आम्ही सारखे पुढंच चालत होतो. एक गुळगुळीत लांब– रुंद पसरट शिळा पाहून आम्ही समोरच्या डोंगराची शोभा पहाण्याच्या हेतूनं खाली बसलो. बाजूला उगवलेलं सुकलेलं गवत उपटीत असताना एकदम नजर एका चिमुकल्या रोपाकडे गेली. करंगळीएवढ्या उंचीचं एक हिरवंगार रोप त्या गवतात उगवलं होतं. त्याची इवलाली हिरवी पानं जोडीजोडीनं फुटत गेली होती आणि माथ्यावरती एक चिमुकलं पिवळंधमक फूल उगवलं होतं. वाऱ्यावर मजेत डुलत होतं. इवल्याशा शेवंतीच्या फुलासारखं दिसत होतं. एवढंसं रोप आणि त्यावरचं नखाएवढं फूल पण उमलल्याचा केवढा आनंद झाला होता त्याला. फुलण्याचं केवढं सुख अनुभवीत होतं. वर विशाल निळं आकाश, पलीकडे प्रचंड डोंगरांच्या रांगा, हे विस्तीर्ण पठार, त्यावर वाहणारा वारा भणभणता आणि ह्या सगळ्या अफाट पसाऱ्यात उमललेलं एक सुंदर नाजुकसं फूल; पण अस्तित्वाचा अधिकार जितका ह्या विस्तीर्ण पठाराला होता तितकाच त्यालाही देण्यात आला होता.

## नव्वद

त्या शाळेपाशी क्षणभर माझी पावलं थबकली. आतून येणारे प्रार्थनेचे सूर कानी पडत होते. असंख्य मुलं एका सुरात प्रार्थना गात होती. अनेक आवाज, परंतु एखाद्या धीरगंभीर प्रवाहासारखे एकरूप होऊन निनादत होते. क्षणभर मनात विचार आला— सगळे आवाज एक झाले आहेत. परंतु साऱ्यांची मनं एकाच भावनेनं एकवटली आहेत का? आपलं जीवन शुद्ध व्हावं ही आंतरिक तळमळ सगळ्यांची सारखीच उत्कट आहे का! ज्या प्रभूकडे ही बालकं मांगल्याची मागणी करीत आहेत त्यांच्या स्वरूपाचं सगळ्यांना आकलन झालं आहे का? की, ही नुसतीच शब्दांची पोपटपंची आहे? मी शाळेत शिकत होते तेव्हाचे दिवस आठवले. सकाळी शाळा सुरू होण्यापूर्वी आधी प्रार्थनेची घंटा वाजायची आणि मग आम्ही साऱ्या मुली रांगेनं प्रार्थनेसाठी सभागृहात जात असू. संगीताचे शिक्षक पेटी वाजवायला सुरुवात करायचे आणि सगळ्या मुली एकदम यांत्रिकपणे प्रार्थना म्हणावयास सुरुवात करावयाच्या. सगळ्या मुली एकदम गाणं म्हणताहेत, तो आवाज सभागृहात घुमतो आहे ह्याचीच मौज वाटायची. उगीचच एकमेकींकडे लक्ष जात रहायचं. पण प्रार्थना? तिचा अर्थ आम्हांला कुठं कळत होता? प्रार्थनेतला भाव गीतातून कुठं उमटत होता? ती खरी प्रार्थना नव्हतीच मुळी. सामुदायिक प्रार्थनेतून फक्त समूहाची शक्ती जाणवते, समूहाचं ऐक्य जाणवतं. पण खरी प्रार्थना सुरू होते ती एकट्याची आणि एकान्तातच. एकाएकी, एकदम आपल्या असहाय्यपणाची जाणीव होते, जेव्हा जागी होते, हृदयात खूप कालवाकलव, आपल्याहून प्रचंड अशा एका शक्तीचं अस्तित्व समोर दिसू लागतं आणि नकळत त्या शक्तीला जेव्हा संपूर्ण शरण जावंसं वाटतं त्याच वेळी खऱ्या प्रार्थनेला आरंभ होतो.

## एक्याण्णव

समोर पसरली होती लांबलचक दरी आणि तिच्यात निळसर धुकं ओथंबून राहिलं होतं. दरीपलीकडे डोंगरांची अफाट रांग पसरलेली होती. मोजता येणार नाहीत इतके अगणित डोंगर रांगेत होते. पाठीमागे पश्चिमेला सूर्य मगाच मावळून गेला होता आणि समोर डोंगरामागचं पूर्वेकडचं आकाशही फिकट गुलाबी छटांनी माखलेलं होतं. त्या पार्श्वभूमीवर डोंगरांच्या रांगा मोठ्या सुंदर दिसत होत्या. त्यांच्या विशालपणामुळे मनवर उगीचंच दडपण पडल्यासारखं वाटत होतं. स्वतःच्या क्षुद्रपणाची जाणीव जागी होत होती. वाटत होतं, वर्षानुवर्षे वादळाला आणि पावसाला उन्हाला आणि वाऱ्याला टक्कर देत वर्षानुवर्षे, शतकानुशतकं हे डोंगर इथं उभे आहेत. कुठं ह्यांची अगाधता, कुठं ह्यांचा कणखरपणा आणि कुठं आमची क्षुद्रता, कुठं आपली दुर्बळता. किती किती क्षुद्र आहोत आपण आणि आपलं मन. जे लहानसहान गोष्टींनाही डगमगतं, दडपून जातं आणि क्षुद्र गोष्टीसाठी क्षुद्र कांगावे करण्यात व्यर्थ आयुष्य दवडतं. स्वतःमधल्या उणीवांच्या जाणीवेनं डोळे भरून आले आणि समोरच्या डोंगरांकडे मी किती तरी वेळ भरल्या डोळ्यांनीच पहात राहिले. पहाता पहाता एकदम वाटलं, मी डोंगरांना पाहू शकते, त्याचा मोठेपणा जाणू शकते, भारावून जाऊ शकते, पण डोंगर मला पाहू शकत नाहीत. माझी दुःखं जाणू शकत नाहीत, त्यांच्यावर कशाचा काहीच परिणाम होत नाही. हाच त्याच्या—माझ्यातला फरक नाही का ? डोंगर विशाल असतील अमर असतीलही ! मी फार लहान असेन, मर्त्यही असेन. डोंगरांचा मोठपणा माझ्यात नसेलही, पण अशी एक महानता माझ्यातही आहे की, जिच्यामुळेच मी माणूस आहे आणि डोंगर....निच्चळ डोंगरच आहेत.

## ब्याण्णव

मोठ्या हौसेनं त्यांनी गुलाबांची बाग केली आहे. लखनौ, काश्मीर, बंगलोर अशा दूरदूरच्या ठिकाणाहून त्यांनी उंची उंची गुलाबाची कलमं मागवून त्याची मेहनतीनं मशागत करवून हा समोर दिसणारा उत्फुल्ल ताटवा उभा केला आहे. बघताच मन मोठं खूष होतं. जिकडं पहावं तिकडं गुलाबाची फुलं, लाल, गुलाबी, केशरी, पिवळी, मिश्र रंगांची अशी चांगली तळहाताइतकी पूर्ण उमललेली असंख्य असंख्य फुलं. वाऱ्यावर कशी एकसारखी डुलताहेत. माझ्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून ते मला म्हणतात, "जा बेटा हवी तेवढी फुलं काढून घ्या." त्याचा चेहरा जणू म्हणतोय– हा सुगंध मी पिकवलाय, पण तो सारा तुम्हाला खुला आहे. घ्या लुटून. हवा तेवढा आणि पूर्ण समाधान मिळेपर्यंत. मी धावतच बागेत शिरते. पण फुलं तोडावीशी वाटतच नाहीत. त्यांचा झाडावरच वास हुंगते. 'या मालिक ! क्या खुशबू है !' एकेक गुलाब न्याहाळीत मी वेड्यासारखी बागेतून फिरत रहाते, तोच एका गुलाबाच्या फुलाकडे माझं लक्ष जातं. फूल आत्ताशी कुठं उमलतंय. पाकळी पाकळी फुललीय. सुगंध दरवळतोय. आणि मधल्या केसरांवर एक चिमुकली मधमाशी गुंग होऊन गडबडा लोळतीय. सुगंधानं कशी धुंद झालीय. तिचे चिमुकले पंख सारखे फडफडताहेत. आनंदानं सारखं 'गुणगुण गुणगुण' असं गुंजन चाललंय. तिचा इवलासा देह अतीव सुखानुभूतीनं थरथरतोय. गुलाबपुष्पाच्या शय्येवर ती सुगंध पीत, मधु चाखीत, एक श्रेष्ठ ब्रह्मानंद लुटत राह्यलीय. मला तिचा हेवा वाटतो. कितीही सुगंध मी हुंगला तरी इतकी अथांग तन्मयता ह्या माझ्या जड देहाला कशी साधेल ? एका कोमल गुलाबपुष्पाच्या त्याहूनही कोमल अंतरंगात शिरून त्याच्या सूक्ष्म गंधाचं रहस्य जाणून घ्यावयाला मधमाशीइतकीच तरलता जवळ हवी......

## त्र्याण्णव

मध्यरात्रीची वेळ. कशानं कुणास ठाऊक, दचकून मी जागी होते. कुठं खुट्ट म्हणून कसला आवाज नसतो. बाहेर वारा पडल्यामुळे पानसुद्धा हालत नाही. एक विचित्र शून्यता अनुभवला येते. आणि मग त्या शांत वातावरणात कानावर पडते ती घड्याळाची टिक्‌टिक्. ती मात्रा अखंड चाललेली असते. तो यांत्रिक ध्वनी क्षणभरही थांबायला तयार नणतो. टिक्... टिक्... टिक् रात्रीच्या निःशब्द पोकळीचं जणू हृदयच त्या घड्याळाच्या रूपानं ठकठकत असतं. हे घड्याळ सारखं चालूच आहे ह्याचं क्षणभर आश्चर्य वाटतं. सकाळी एकदा चावी दिली होती आणि त्याला गती देऊन ठेवली होती. ते आपलं काम इमानानं करीत राह्यलंय. एकाएकी लक्षात येतं की आपल्याला ह्या क्षणी जाणवत नाही तरी पण आपल्या शरीरातलं हृदय नावाचं एक यंत्रही आज अखंडपणे चाललंय. कान देऊन लक्षपूर्वक ऐकल्यास त्याचीही ठक्‌ठक् अव्याहत गतीनं एका विशिष्ट तालावर चालूच आहे हे समजतं. पण हे यंत्र कुणी सुरू केलं? ह्या यंत्राला कायमची चावी कुणी देऊन ठेवलीय? दुरून समुद्रावरून लाटांचा घोषही कानावर पडतो आहे, तिथंही भरती-ओहोटीचं यंत्रवत् काम चालूच आहे. न थांबता, न थकता. हजारो वर्षांपूर्वीचं हे यंत्र कुणी सुरू करून ठेवलंय? कुणी? कुणी? कुणी? उत्तर माहीत नाही. त्या उत्तराची कल्पनाही येणं अशक्य आहे. तरी पण एका विराट सर्वश्रेष्ठ शक्तीचं दडपण मनावर आल्यावाचून रहात नाही.

## चवऱ्याण्णव

आज आंघोळीला उशीर झाला होता. म्हणून घाईघाईनं मी उभ्याउभ्याच आंघोळ उरकून घेत होते. बादलीत पाणीसुद्धा उपसून घ्यायला वेळ नव्हता. टबमध्ये साचवलेलं थंड पाणी तसंच तांब्यातांब्यानं भडभडा ओतून घेतलं. भरभरा अंगाला साबण लावला. तोंडाला साबण लावताना भरपूर फेस केला आणि मग डोळ्यांत साबणाचा फेस जाऊन झोंबू नये म्हणून डोळे घट्ट मिटून घेतले. तोंड धुण्यासाठी म्हणून तांब्या उचलू गेले तो तांब्याच हाती लागेना. डोळे तर घट्ट मिटून आंधळेच करून घेतले होते. तांब्या टबच्या कडेला ठेवला होता. अंदाजानं चाचपडत त्या दिशेनं हात हळूहळू पुढं नेले. तो काय आश्चर्य ! हात नेमके अचूक तांब्यापाशी गेले. माझी मलाच गंमत वाटली. म्हणजे, हातांनी हाताचं काम तर उरकलं होतंच, पण शिवाय, डोळ्यांचंही काम करून टाकलं होतं. म्हणजे डोळे मिटले की हात उघडतात तर ! आपलं शरीर मोठं विलक्षण आहे नाही ? वेळ पडली तर एक इंद्रिय दुसऱ्या इंद्रियाचं कामही खुषीनं, आपणहून करतं. डोळे बंद झाले की सर्वांगाला डोळे फुटतात. कान बधिर झाले की डोळेसुद्धा शब्द जाणून घेतात, हात तुटले तर, पाय लिहितात, पाय तुटले तर हात रस्ता चालतात. सगळं खरं. पण तशीच वेळ आल्याशिवाय आपल्या इंद्रियांचं सामर्थ्य आपल्याला कळू नये हे आपलंच दुर्भाग्य !

## पंचाण्णव

प्रवास करीत असताना क्षणभर आमची गाडी झाडांच्या सावलीत थांबली. एकाला एक लागून पाचसहा सिल्व्हर ओकची झाडं उंचच उंच वाढली होती. त्यांची उंची न्याहाळून बघताना दृष्टी सहजच आकाशाकडे गेली. आकाशाचा निळाभोर रंग इतका आर्द्र आणि घनदाट वाटला म्हणून सांगू. एखादं निळंभोर अथांग सरोवर उलट तरंगत असल्यासारखं भासलं. हवेतल्या थंडीमुळे ऊन जाणवत नव्हतं आणि ते ऐन दुपारचं ऊनही आकाशातून दिव्य करुणेसारखं हळुवारपणे पाझरत असल्यासारखं वाटलं. वातावरणात एक अपार शांति दाटून आली होती. इतक्यात जोराचा वारा आला. सिल्व्हर ओकची पालवी थरथरली आणि सुकलेली पानं गिरगिरत खाली मातीवर येऊन पडली. जणू कुणाचे तरी अदृश्य हात सिल्व्हर ओकची झाडं गदगदा हलवीत होते आणि शुष्क पिवळ्या पानांना झाडांवरून झाडून टाकीत होते. निस्सीम निळ्या आकाशाखाली, सिल्व्हर ओकच्या शांत राईत एकाएकी कुणाचे तरी प्रिय अस्तित्व जवळ वावरत असल्याचा भास झाला. दिसत तर कुणी नव्हतं. पण वरच्या-निळ्या सौंदर्यातून, वाऱ्याच्या लहरीलहरीतून, पानांच्या सळसळण्यातून, भोवतालच्या सुखद हवेतून कुणी तरी शरीराला आणि मनाला स्पर्श करीत असल्याचं जाणवलं. कुणी तरी आपल्या जवळपास आहे, कुणी तरी आपल्यावर फार फार प्रेम करतंय असं वाटलं आणि डोळे एकाएकी भरून आले. खूप रडू आलं आणि खूप खूप आनंद वाटला......

## शहाण्णव

टेकडीवरती लहानसं देऊळ दिसलं आणि देवळाकडे जाणारी नागमोडी पायवाटही दिसली तेव्हा आम्ही सगळे एकदम बोलून गेलो, " चला जाऊ या का त्या देवळाकडे ?" —आणि मग तडक आम्ही त्या टेकडीच्या देवळाचीच वाट धरली. टेकडीच्या माथ्यावर कुणी तरी आप्तांच्या स्मरणार्थ गणपतीचं एक लहानसं पण मोठं सुबक देऊळ बांधलं होतं. देवळाशेजारीच पुजाऱ्यासाठी एक लहानशी खोली बांधण्यात आली होती. आम्हांला बघताच एक म्हातारा हडकुळा पुजारी हसत, हसतच बाहेर आला. लगेच त्यानं आम्हांला देवळाकडे नेलं आणि गणपतीचं दर्शन घडवलं. देवळाची सगळी माहिती त्यानं दिल्यानंतर आम्ही देवळाच्या बाहेर आलो. मग त्यानं आम्हांला आपल्या खोलीकडे नेलं आणि थंडगार पाणी प्यायला दिलं. त्या गोड पाण्यानं तहान शमली आणि तरतरी आली. आम्ही टेकडीवर उभं राहून भोवतालची शोभा बघू लागलो. आसमंतात असंख्य टेकड्या पसरलेल्या होत्या आणि खाली मनुष्य व रस्त्यांचे लहान लहान तुकडे आणि असंख्य शेते दृष्टोत्पत्तीस येत होती. ह्या टेकडीवर ह्या देवळाखेरीज आणि पुजाऱ्याच्या एका खोपटाखेरीज काही काही नव्हतं. फक्त कापराचं एक एकाकी झाड खोपटासमोर उंचच उंच वाढलं होत. हवा फार थंड होती आणि भणाणा वाहणारा वारा अंगाला झोंबत होता. अशा हवेत ह्या टेकडीवर एकटं रहायचं म्हणजे कठीणच. आम्ही पुजाऱ्याला विचारलं, " दादा, तुम्ही एकटेच रहाता ? रात्रीचं भय वाटत नाही." " माझं कुणी नाही ह्या जगात. " पुजारी हसून म्हणाला, " दिवसचे दिवस मी खाली गावातही उतरत नाही. देवापाशीच बसून राहतो. अचानक कुणी दर्शनाला आलं तर देवापाशी हजर रहायला नको का ?" आम्ही सारे थक्कच झालो त्याची कहाणी ऐकून. रात्रीच्या वेळी ह्या टेकडीवरून जेव्हा भयाण वारे रों रों वाहू लागतात, त्या वेळी दिव्याची वातही शिल्लक राहणेची शक्यता उरत नाही, त्या वेळी हा पुजारी इथं इतक्या उंचावर अंधारात एकटा अगदी

एकटा कसा पहारा करीत असेल ? बोलायला कुणी नाही,
कसली करमणूक नाही आणि सोबतीला फक्त हा अंग कापीत जाणारा
भिन्नाट वारा. तेव्यात लक्ष गणपतीच्या मूर्तीकडे गेलं आणि एकदम
वाटलं की दगडाची मुकी का होईना पण ही लहानशी मूर्ती माणसाला
एकटेपणात केवढा आधार देऊ शकते ! कारण...
कारण तिच्याविषयी माणसाच्या मनातली श्रद्धा. मूर्तीत काय आहे ?
काहीसुद्धा नाही.

## सत्याण्णव

डाकबंगल्यात आम्ही सर्व मंडळी व्हरांड्यात बसून जेवण घेत होतो. खानसाम्यानं उत्कृष्ट बेत केला होता. अन्नाचा खमंग वास दरवळत होता. सर्व मंडळींना बाहेरून भटकून आल्यामुळे जबरदस्त भुका लागल्या होत्या आणि ताव मारून सारेजण जेवत होते. अन्नाच्या वासानं व्हरांड्याजवळ काही गावठी कुत्री जमली होती आणि आशाळभूतपणे जेवणाऱ्यांच्या तोंडाकडे पहात होती. एखादं आगाऊ कुत्रं उडी मारून व्हरांड्याच्या पायरीवर चढून येत होतं— पुढं पुढं सरकत होतं. दया येऊन कुणी ना कुणी त्या कुत्र्यापुढं पोळीचे तुकडे उडवी आणि ती कुत्री आधाशासारखी ते तुकडे ओढून वकाबका खात. बहुतेक सर्व कुत्र्यांना थोडंफार खायला मिळालं होतं. तेवढ्यांत आमचं लक्ष दूरवर आशेनं रेंगाळणाऱ्या एका कुत्र्याकडे गेलं. त्याला भूक लागली होती आणि त्याला एखादा तुकडा मिळाला तर हवा होता, पण त्याला पुढं येता येत नव्हतं. इतर कुत्र्यांसह स्पर्धा करता येत नव्हती. कारण त्या कुत्र्याचे मागचे दोन्ही पायच तुटले होते आणि त्याला चालायला फार कष्ट पडत होते. मातीवरून खुरडत खुरडत ते पुढं येण्याचा प्रयत्न करीत होतं. आमच्यातल्या कुणाला तरी दया आली आणि त्यानं उठून, त्या पांगळ्या कुत्र्याजवळ जाऊन त्याला पोळीचा तुकडा दिला. पण ते कुत्रं पोळी खाईना. भीतीनं आणि संशयानं ते पोळी देणाऱ्याच्या तोंडाकडे पाहू लागलं. त्यानं कुत्र्याला ममताळुपणानं थोपटण्यासाठी त्याच्या पाठीवर हात ठेवला तोच ते कुत्रं झपाटल्यासारखं केकाटत सुटलं आणि दूर पळून जाऊ लागलं, पण त्याला धड पळताही येईना. त्याची ती हीनदीन दशा पाहून सर्वांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले एखाद्या अपघातानं वा आजारानं ह्या देहात एकदा व्यंग निर्माण झालं म्हणजे एखाद्या दरिद्री कुत्र्याच्या मनावरही क्रूर आघात होऊ शकतो, मग माणसाची काय कथा !

## अठ्याण्णव

आता थंडी संपत आली आहे, नव्हे जवळ जवळ संपलीच आहे. थंडी ऐन भरात होती तेव्हा मैदानावरच्या ह्या झाडाची पालवी साफ झडून गेली होती. निव्वळ फांद्यांचा सांगाडा उरला होता. ऐसपैस पसरलेल्या लांबलचक फांद्या एकही पान त्यावर न उरल्यामुळे काटक्यांच्या अर्थशून्य पसाऱ्यासारख्या दिसायच्या. सकाळच्या दाट धुक्यात हे निष्पर्ण झाड अतीव करुण आणि एकाकी दिसायचं. पहाटेच रस्ता झाडायला आलेले झाडूवाले खाली पडलेला पाचोळा ह्याच झाडाखाली जमवायचे आणि शेकोटी पेटवून शेकत बसायचे आणि शेकोटीचा धूर ह्या सुकलेल्या झाडाला वेढा देत देत आकाशाच्या दिशेनं उंच उंच जायचा. क्षणभर वाटायचं, जीवन संपलेल्या ह्या खिन्न झाडाची ही चिता तर पेटवलेली नाही ना? दुपारच्या उन्हात तर हे झाड अगदीच अनाथ आणि पुरतंच उघडं पडल्यासारखं दिसायचं आणि रात्रीच्या अंधारात एखाद्या भुतासारखं भयाण वाटायचं. आणि मनात विचार येई पुन्हा ह्या झाडाचं जीवन कधी सुरू होणार? आता थंडी संपत आली आहे. हवेत उष्मा जाणवू लागलाय. आज सहज ह्या झाडाकडे माझं लक्ष गेलं. तर फांदीफांदीच्या टोकाटोकावर पोपटी लुसलुशीत पालवी फुटलेली दिसली. सगळं झाड पोपटी पालवीनं ओतप्रोत दाटून आलेलं होतं. त्याच्या सुकलेल्या खोडातून भरू लागलेल्या नव्या जीवनरसाचे उकळते स्रोत जणू पानापानांतून उसळून बाहेर पडले होते. झाडात पुन्हा चैतन्य संचारलं होतं. किती सुंदर दिसत होता हा जीवनाचा नव्याने झालेला आरंभ. पण त्यासाठी ह्या झाडाला एक लांबलचक हिंवाळाभर थांबून वाट पहावी लागली होती. एक दीर्घ एकाकीपण एकट्यानं शांतपणे सोसावं लागलं होतं. त्या एकान्तातच जणू जीवनाचा एक नवा साक्षात्कार घडून आला होता.

०

## नव्याण्णव

खरोखरी मी का लिहिते? म्हणजे मला का लिहावंसं वाटतं? इतकं मी लिहिलं तरी मनाचं समाधान का होत नाही? लिहिण्याचा इतका उत्साह अजून का वाटतो? लिहायचं म्हटलं म्हणजे हात का स्फुरण पावतात? लेखणी का सरसावते? खरं म्हणजे, मी लिहिते ते फारसं काही मोटं नसेल, अगदी अल्प असेल—खरं म्हणजे मी काही कुणी विद्वान पंडित नाही, कोणत्या विषयाचा माझा गाढ व्यासंग आहे म्हणावं, तर तसं काही नाही. (फारसं मला कळतं म्हणावं तर तेही नाही!) ना मी कुणी भाषाप्रभू, ना माझ्यापाशी अलौकिक बुद्धिमत्ता, ना शैलीची मजजवळ असामान्यता, ना लेखनातले नाना प्रयोग करण्याची ताकद. ह्यातलं आपल्यापाशी काहीच नाही. अगदी काही सुद्धा नाही. तरीसुद्धा मी लिहिते. लिहिण्यातला आनंद अजूनही लुटावासा वाटतो, नव्हे त्या आनंदाची चटक काही कमी होत नाही. खरंच मी का लिहिते? माझ्या लेखणीनं जगात कसलीच उलथापालथ होणार नाही किंवा साहित्यात फारशी मोठी क्रांती घडणार आहे असंही नाही. तरीही मी लिहिते. मी लिहिणार का? कशासाठी? असं सारखं लिहावंसं का वाटतं? काही लिहिलं नाही तर चैन पडत नाही, असं का? एखाद्या लहानशा घटनेनंही मनातले भाव उसळून येतात, बुद्धी जागी होते, शब्द उचंबळून येतात. का? एखादी क्षुल्लक वस्तू बघताच तिच्यात दडून राहिलेला अमर्याद अर्थ गवसतो, तिच्यामधली अद्भुत रहस्यं सापडतात आणि मग आनंदानं ओरडून सांगावंसं वाटतं की 'मला सापडलं', 'मला सापडलं'. ह्या सापडण्याला अंत नाही. ह्या ओरडून सांगण्याला खंड नाही. हे असंच चालायचं. पण असं का? की ह्याचसाठी माझी योजना आहे? विश्वाच्या ह्या प्रचंड चक्रात माझ्या वाट्याला हीच अल्पशी कामगिरी आली आहे का? ती मला केलीच पाहिजे. त्यावर माझा उपायच चालत नाही. 'नाही' 'नाही' म्हटलं तरी शेवटी लिहावंच लागतं. असं का? असं का? ह्या प्रश्नाला उत्तर सापडतच नाही. हा एक प्रश्न आहे इतकंच!

## शंभर

आजचा दिवस. फक्त आजचा दिवस. प्रियकर प्रेयसीला म्हणतो—
आजचाच दिवस थांब. माझ्यासाठी थांबा. उद्या? उद्या कुणास
ठाऊक. उद्या कदाचित तू येणार नाहीस. आलीस तरी अशी
भेटणारही नाहीस. कदाचित उद्या मी नसेन, किंवा असलोच तरी
असा असेन का? आज जीवन जसं भासतंय तसं ते उद्या भासेलच
कशावरून? म्हणून म्हणतो आजचाच दिवस. खरा आहे तो आजचा
दिवस. आत्ताचा क्षण. आता आपल्या हातात आहे ते आपलं,
आपल्या मालकीचं आयुष्य. फक्त आजचाच दिवस...
आजचाच दिवस, मी मला म्हणते. आजचाच दिवस मला, असं लिहू दे,
लिहीत राहू दे. एखादा प्रियकर प्रेयसीला ज्या भावनेनं म्हणतो त्याच
भावनेनं मी स्वत:ला म्हणते....आजचाच दिवस मला लिहू दे.
उद्या? उद्या मन असं भरून येईल की नाही कुणास ठाऊक?
उद्या असं सुचेल का? असं जमेल का? कुणास ठाऊक!
म्हणून आजचाच दिवस, फक्त आत्ताच मला लिहू दे– लिहीत राहू दे.
फक्त आजचाच दिवस.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2002
23208
निबंध
६४५९